)६६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ९५३४
REFBK-0015297

# श्री आनंद भारती चरित्र



-: लेखक :-

हणमन्तराव गो. मोरे.

82007

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परं ब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः ॥

पारेग
9363
20-8-69

# श्री आनंद भारती चरित्र

[ ' श्री गुरुलीलामृत ' संक्षिप्त सारासह ]

लय,
अनुक्रम ........ वि. पारेग
क्र. 1437 नों: दि: 10/6/70

-: लेखक :-

हणमंतराव गोविंदराव मोरे
( ' काबुलीवाला ', ' नंदादीप ' या पुस्तकांचा कर्ता )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 94207

-: प्रस्तावना :-

ह. भ. प. प्रा. शं. वा.
उर्फ सोनोपंत दांडेकर एम. ए.

REFBK-0015297

श्री

चेंदणी कोळीवाडा,
ठाणें

[ किंमत २ रूपये ]

प्रकाशक :–
प्रकाश गो. मोरे
रवीन्द्र कला प्रकाशन
७६९, शहाजी नगर,
पो न्यू पॅलेस,
कोल्हापूर, ३

ब्लॉक्स् :–
रॅपिड प्रोसेस वर्क्स, मुंबई

हक्क :–
सर्व हक्क लेखकास्वाधीन

छपाई :–
श्री. श्रीपतराव लोंढे,
किरण प्रेस, गंगावेश, कोल्हापूर,

# कृतानेक साष्टांग दंडवत —

मला लहानपणापासून परमेश्वराच्या चिंतनाचें वेड. दिवसांतून एकदां निदान संध्याकाळीं तरी नामस्मरण केल्याशिवाय मनाला समाधान लाभत नाहीं. मी असा नामस्मरणाला बसलों कीं, कोणी एका साधुपुरुषाची प्रतिमा माझ्या मनोपटलावर भासमान होत असे. न कळत मी त्या अदृष्य विभुतीस हात जोडत असे.

पांच वर्षांपूर्वी माझें ठाणें येथील चेंदणी कोळीवाड्यांत रहाणारे मित्र श्री. जयवंतराव पांडुरंग कोळी यांच्या एकदां मी घरीं गेलों. त्यांच्या दारांत एक तसबिर होती. त्या तसबिरीस पहातांच मी हात जोडलें. ती विभुती दुसरी तिसरी कोणी नसून माझ्या हृदयसिंहासनावर विराजमान होणारी साधुपुरुषाचीच प्रतिमा होती. श्री कोळी यांना मी त्यांच्याविषयीं माहिती विचारली आणि त्याचवेळीं श्री. आनद भारती महाराजांचें चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचें मनाशीं ठरविलें.

परंतु श्री आनद भारती महाराजांचें सत्शिष्य कै. गोपाळराव नाना ठाणकर यांनीं पूर्वी मुंबईहून प्रसिद्ध होत असलेल्या 'कोळी शिष्ट' मासिकां-तून प्रसिद्ध केलेल्या दोन छोटया लेखांकाव्यतिरिक्त महाराजांचेविषयीं कोणत्याहि प्रकारची माहिती चरित्रलेखनासाठीं अस्तित्वांत नव्हती. तरीहि --

" गुरुरायाचरणीं मस्तक ठेविला ।  
आपल्या स्तुतीला द्यावी मती ।। "

अशी सद्गुरुंचीच प्रार्थना करून चरित्रलेखनास त्यांचा आशिर्वाद मागितला. ह. भ. प. कै. गोपाळराव नाना ठाणकरांचे सुपुत्र श्री. दत्तात्रय गोपाळराव ठाणकर आणि श्री. जयवंतराव पांडुरंगराव कोळी यांच्याशीं विचारविनिमय

करून शेवटीं ठाण्यांतील कांहीं वयोवृद्ध मंडळींच्या मुलाखती घेऊन माहिती जमविण्याचे ठरविलें, त्याप्रमाणें ठाण्यामध्ये महाराजांच्याविषयीं माहिती सांगणारे वयोवृद्ध सर्वश्री हरि शनवार नाखवा, पुंडलिक विठु नाखवा, काशिनाथ चिमाजी वारे, श्रीमती जानकीबाई फकीरा नाखवा, राधाबाई केरोबा सहानी, गोपिकाबाई गोपीनाथ राऊत सर्वश्री वसत भास्कर सहानी, दत्तात्रय रामचंद्र ऊर्फ मामा विद्वास तसेंच श्रीलक्ष्मीनारायण मदिराचे पुजारी कै. गोपाळराव विद्वांस यांचें सुपुत्र श्री. राम विद्वांस ह्या थोर भक्तमंडळींना श्री. दत्तात्रय ठाणकर व श्री. जयवंतराव कोळी यांचे-- समवेत भेटून त्यांच्याकडून माहिती मिळविली आणि शुभमुहूर्तावर चरित्र--लेखनास सुरुवात करून चरित्र पूर्ण केलें. पुढें ठाण्यांतील कांहीं थोर मंडळींचा महाराजांच्या चरित्रांत त्यांनीं कै. गोपाळराव महादेव विद्वास यांच्याकडून लिहवून घेतलेल्या 'श्रीगुरुलीलामृत' या ग्रंथाचा संक्षिप्त सारहि सामाविष्ट करावा असा आग्रह पडला, म्हणून माझ्या अल्पबुद्धिनुसार 'श्रीगुरुलीलामृत' या ओवीबद्ध ग्रंथाचा संक्षिप्त सारहि लिहून तोहि येथें सादर करीत आहे.

"रविशशी जेथें तेजें सामावती । तेथें माझी मती कोणीकडे ।।"

श्री आनंद भारती महाराजांचे अलौकिक चरित्र लिहावयास थोरा-मोठ्या संत भक्ताचीच लेखणी हवी होती. माझ्यासारख्या अल्पबुद्धी पामरानें काय लिहावे ? पण तरीहि मी माझ्या श्रद्धायुक्त अंतःकरणाने हा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. माझें चरित्र लेखन पूर्ण होतांच मी ठाण्यास श्रीआनंद भारती महाराजांच्या समाधीवर माझें हस्तलिखित समर्पण केले. त्यानंतर अक्कलकोट येथें जाऊन सद्गुरुंचे सद्गुरु श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या चरणी पण हस्तलिखित ठेविलें. श्रीक्षेत्र आळंदीस जाऊन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचाहि आशिर्वाद घेतला. तेथेंच ह. भ. प. संत प्रा. सोनोपंत दांडेकर यांच्या दर्शनाचा लाभ घडला. आणि श्री ज्ञानेश्वरांनी सांगितल्याप्रमाणें-

"जे जे भेटिजे भूत । तें तें मानिजे भगवंत
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ।।"

थोर थोर पुण्यवंतांना, भक्तांना हस्तलिखित दाखवून त्यांनीं प्रेमपूर्वक केलेल्या सूचना स्वीकारून प्रसिद्धीच्या मार्गास लागलों. चरित्राची छपाई करवीरसारख्या पुण्यक्षेत्रीं–दक्षिण काशीस झाली ही भाग्याचीच गोष्ट. कित्येक ठिकाणीं ( काशाय = काषाय, पुनरागमण = पुनरागमन ) असें छोटे-मोठे मुद्रिनांचे दोष राहिलें, पण ही सद्‌गुरुंचीच कृपा समजून स्वस्थ राहिलों आणि शेवटीं आज हा प्रसिद्धीचा–अमृताचा–सोनियाचा दिवस लाभला–ही पण सद्‌गुरुकृपाच !

ह. भ. प. प्रा. शं. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर यांनीं दयार्द्र अंतः-करणानें जी प्रस्तावना ह्या पुस्तकास लिहिली, त्याबद्दल त्यांचें आभार तरी कसें मानावें ? त्यांच्या अलौकिक प्रस्तावनेनेंच ह्या पुस्तकास मोल लाभलें आहे त्यांचा मी आजन्म कृतज्ञ आहे.

श्री. आनंद भारती चरित्र–लेखनासाठीं आणि सदर पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं गुरुभक्त दत्तात्रय गोपाळराव ठाणकर, श्री. जयवंतराव पांडुरंगराव कोळी आणि श्री. आनंद भारती समाज, ठाणें यांनीं जे अविश्रांत श्रम घेतलें त्याबद्दल त्याचें आभार मानावें तितकें थोडेंच ! ह्या थोर लोकांचे साहाय्य लाभलें नसतें, तर सदर पुस्तक प्रसिद्धहि झालें नसतें.

संतवाङ्मयाचें आणि नाट्यवाङ्मयाचें प्रगाढ व्यासंगीं माझें मित्र श्री. विनायकराव भास्करराव ताम्हनकर यांच्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सर्वश्री गुणाजीराव सावंत, वासुदेवराव चव्हाण, अनंतराव चव्हाण, मनोहर देसाई, आर. टी. अहिरे, सखाराम पेवेकर आणि आप्पासाहेब रणपिसे यांच्या सहकार्याबद्दल त्यांचें मी आभार मानतों.

पुस्तकाची छपाई कोल्हापूरच्या ‘ किरण प्रेस ’ व ‘ सागर प्रिंटिंग प्रेस ’ नें आणि कव्हर छपाई व आंतील ब्लॉक्स ‘ आल्हाद प्रिंटर्स ’ नें मोठ्या आपुलकीनें केली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ‘ जय शिवराय ’ कोल्हापूरचें संपादक श्री. शामराव माने आणि ‘ उमा प्रेस ’ चें श्री. पां. य. गुणे यांच्या सहकार्याबद्दलहि मी आभारी आहे.

आतां सद्गुरु श्री आनंद भारती महाराजांचें चरणांवर त्यांचेंच हे चरित्रपुष्प अर्पण करून श्री ज्ञानराज माऊलीच्या शब्दांनीं त्यांची प्रार्थना करतो.

" भरोनि सद्भावाची अंजुळी । मियां वोवियाफुले मोकळी
अर्पिली अंघ्रियुगुली । विश्वरुपाच्या ।। "

गुरुदेव टागोर पुण्यदिन
मुंबई दि. ५ जुलै १९६६

— हणमन्तराव गो. मोरे

# —: प्रास्ताविक :--

ठाण्यांत सुमारे पाऊणशे वर्षापूर्वी होऊन गेलेले कोळी समाजांतील साधु श्री आनंद भारती महाराज यांचे हे अल्पचरित्र 'काबुलीवाला', 'नंदादीप' इत्यादि पुस्तकांचे कर्ते श्री. हणमन्तराव गोविंदराव मोरे यांनीं लिहिले आहे. श्री आनंदभारती महाराज यांना होऊन साठ वर्षे झाली व त्यांचे आयुष्य ठाण्यासारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीं गेले असतांहि त्यांचे समग्र चरित्र लिहिण्याचे कोणाच्या लक्षांत आले नाहीं. नाही म्हणावयास महाराजांचे सत्‌शिष्य श्री. गोपाळराव ठाणकर यांनीं मुंबईत प्रसिद्ध होत असलेल्या 'कोळीशिष्ट' (?) या मासिकांत महाराजांच्या चरित्रासंबंधीं दोन लेखांक लिहून प्रसिद्ध केले होते व त्याचप्रमाणें त्यांचे कांहीं अभंग, कटाव व कविताहि प्रसिद्ध केल्या होत्या. (?) पण संपूर्ण चरित्र लिहिण्याचे तसेंच राहून गेले होते. श्री. मोरे यांनीं आपला उद्योगधंदा संभाळून चरित्राकरितां माहिती गोळा करण्याचे काम मोठ्या चिकाटीनें करून हे चरित्र ते प्रसिद्ध करीत आहेत. याबद्दल ते खरोखरच अभिनदनास पात्र आहेत.

श्री आनदभारती महाराज यांचा जन्म धीवर (कोळी) कुळांतील नाखवा घराण्यांत इ. स. १८३१ मध्यें झाला. महाराजांचें पूर्वज फत्ते-मारीच्या व मासेमारीच्या व्यवसायावर जीवन जगत असत. महाराजांच्या वडिलांचे नांव गुलाम नाखवा होतें व महाराजांचें मूळ नांव 'पांडू' होतें. वडिलांची गरिबी असल्यामुळें महाराजांना शाळेंतील शिक्षण फारसे घेतां आले नाहीं. वडिलांचाच धंदा त्यांना पत्करावा लागला.

यानंतर त्यांच्या आयुष्यांत ज्या दोन घटना घडल्या त्या योगानें त्यांच्या जीवनास अकल्पित असें अध्यात्माचें वळण मिळालें. पहिली घटना अशी कीं, ते एकदां समुद्रावर सफर करीत असतां मोठें वादळ झालें. महाराज मुख्य तांडेल असल्यानें नावेतील सर्व मंडळींच्या रक्षणाची जबाबदारी आपलीं हें जाणून महाराजांनीं श्रीसमर्थ अक्कलकोट महाराजांची मोठ्या कळकळीनें प्रार्थना केली कीं, समर्थाच्या कृपेनें हें वादळ शांत होऊन सर्व

माणसांचे प्राण वाचावेत व पुढें अशी प्रतिज्ञा केली कीं, असें झालें तर सर्वसंग परित्याग करून माझें उर्वरित आयुष्य आपल्या व परमेश्वराच्या सेवेंत घालवीन. योग असा कीं, थोडक्याच वेळांत वादळ शांत झालें व नांव सुखरूपपणें तीरास लागली, हें पाहून अर्थातच सर्वांनाच आनद वाटला.

दुसरी घटना अशी कीं, प्रथमपासूनच साधु व देव यांवर महाराजांची श्रद्धा असल्यानें वरील घटनेंनंतर महाराज मंडळींसह अक्कलकोटास समर्थांच्या दर्शनास गेलें. समर्थांनीं वादळाची खूण सांगून प्रेमाने त्यांना जवळ घेतले व त्यास उपदेश करून अनुग्रह केला. महाराजांना कृतार्थ वाटले. त्यानंतर महाराज अक्कलकोटास दोन तीन वेळां गेले व शेवटीं आपणांस भगवी वस्त्रें देऊन आपणांवर अनुग्रह करावा अशी समर्थांची विनवणी केली. श्रीसमर्थस्वामी महाराजांनीं या ठाण्याच्या शिष्याची ( त्यावेळचें नांव पांडु–त्याची ) निष्ठा पाहून त्यास आपल्या बिछान्या–खालीं ठेवलेली भगवी वस्त्रें दिली व म्हणाले, " घ्या हा आनंद घ्या आणि आतां ' आनंद भारती ' व्हा, " असा आशीर्वाद दिला. आपला इष्ट हेतु सिद्ध झाला म्हणून पांडूस परमानंद होऊन तो ब्रम्हानंदांत नाचूं गाऊं लागला. तेव्हांपासून ' पांडू ' चा " आनंद भारती " झाला.

आधी मनुष्यांत परमार्थविपयक बुद्धी व वैराग्य उत्पन्न होणें कठीण. ती उत्पन्न झाल्यावर योग्य मार्गदर्शक गुरु भेटणें त्याहून कठीण. या दोन्ही गोष्टी दुर्लभ आहेत, त्यास पूर्व सुकृत फार मोठें लागते. एतद् विषयक श्रीमत् शंकराचार्यांचे पुढील उद्गार प्रसिद्ध आहेत–

" दुर्लभ त्रयमेवैतन् ईश्वरानुग्रहकारकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ।। "

श्री आनंद भारती यांच्या जीवनांत या दोन्हीहि गोष्टी घडून आल्या एवढेंच नव्हे तर फार महत्त्वाची गोष्ट ही कीं, श्रीगुरुपासून जो आध्यात्मिक लाभ झाला, त्याचा ' क्षेम ' त्यांनीं फार उत्तम रितीनें केला. यानंतर ' भजनपूजन ' वा जगास 'सदुपदेश' या व्यतिरिक्त त्यांनीं कांहीं केलेंच नाहीं. यामुळें कालान्तरानें त्यांचें अक्कलकोटच्या श्री समर्थ स्वामी–

महाराजांच्याप्रमाणें श्री आनंद भारती महाराज हेही ' समर्थ ' झालें. त्यांनीं अनेकांना सन्मार्गाला लावलें.

इतर साधूंच्या चरित्रांत जसें आपण पाहतों तसें यांच्याहि चरित्रांत आढळून येतें. ठाण्यांतील नास्तिक निंदकांनीं यांची निंदा करून यांच्या धवल कीर्तिवर डाग पाडण्याचा प्रयत्न केला. "जग हे सगळे 'वन्ही' झालें तरी साधूनें 'पाणी' व्हावें" या श्रीमुक्ताबाओंच्या उक्तीप्रमाणें महाराज शांत राहून आपलें कार्य करीत असत. कालांतरानें निंदक दुर्जनांना प्रचित येऊन ते महाराजांना शरण आलें. अशी उदाहरणें चरित्रांत दिलीं आहेत. ज्यांना खोल कार्यकारण भाव समजत नाहीं, ते अशा घटनेस 'चमत्कार' म्हणतात, साधू चमत्कार करीत नाहीत, ते घडतात व त्यास योग्य कारणहि असतें. दुर्दैवानें बहुतेक लोक असें समजतात की, साधूंचें मुख्य लक्षण म्हणजे चमत्कार करणें'. साधूचा मुख्य गुण आत्मज्ञान व दैवसंपत्तीच्या गुणांची जोपासना. निळोबानीं म्हटल्याप्रमाणें–

" नेणती कांहीं टाणाटोणा । नामस्मरणावांचोनि ।। "

श्री आनंद भारती महाराज ' मोक्षाय व जनहिताय ' असें जवळजवळ सत्तर वर्षे जीवन जगून इ. स, १९०१ मध्यें मार्गशीर्ष शु।। ५ सोमवार रात्री समाधीस्त झालें. आजहि कोळी समाज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त चंपाषष्ठीस मोठा उत्सव करीत असतों.

महाराजांनीं हयात असतांना आपलें सद्गुरु श्री अक्कलकोट स्वामी महाराज यांच्या पादुका आणून त्यावर लहान मठ बांधला. पुढे पांच वर्षांनीं आपल्या भक्तमंडळींच्या सहकार्यानें महाराजांनी माघ शु।। ३ शके १८०१ (इ. स. १८७९) या तिथीस श्रीदत्तात्रेयाची मूर्ति व श्री सितळादेवीची मूर्ति स्थापून मठास श्रीदत्तमंदिराचें सुंदर स्वरूप आणले. महाराजांच्या मृत्यूनंतर ह्या मंदिराचा श्रावण शु।। १४ बुधवार शके १८४३ ( इ. स. १९२१ ) मध्यें समस्त कोळी जातीने पंचवीस हजार रुपये जमवून जीर्णोद्धार केला. आज ठाण्यांत जे प्रसिद्ध दत्तमंदिर आहे. ते महाराजांच्या हस्तेच उभारलेले आहे.

महाराजांचे कार्य त्यांच्या आयुष्यापुरतेंच झालें असें नाहीं. त्यांच्या मार्गदर्शनानें योग्य वळण लागलेल्या ठाणे येथील कोळी समाजानें ठाण्यामध्यें चेंदणी कोळीवाडा येथें असलेली ' श्री आनंदभारती समाज ' ही भव्य इमारत बांधून महाराजांचें दिव्य स्मारकच उभारलें असें नव्हें तर तद्द्वारा समाजाचें कार्य करण्याचें व्रत अखंड चालू ठेवण्याची इच्छाच प्रकट केली व आनंदाची गोष्ट अशी ,श्री आनद भारती समाज ' या नांवाखाली ही संस्था भजन, पुस्तकालय, व्यायामशाळा क्रिकेट, पतपेढी, महिला मंडळ इत्यादि पद्धतीनें समाजाची सेवा उत्कृष्ट रितीनें करीत आहे. दरवर्षीं चंपाषष्ठीस आनंद भारती महाराजांच्या पुण्यतिथीचा महोत्सव ह्या संस्थेतर्फे मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातों.

श्री आनंद भारती महाराजांच्या या चरित्रापासून बोध घेण्यासारखे पुष्कळ आहे. त्यांतील एक दोन गोष्टींचा उल्लेख करून हे प्रास्ताविक संपवितो. पहिली गोष्ट माणसास कोठें जन्म येईल हें त्याच्या हातांत नसतें. 'दैवायत्तं कुलेजन्म' पण जन्मल्यानंतरचें पौरुष त्याच्या हातांतलें आहे. म्हणून मानवी जीवनांत खऱ्या अर्थानें जन्माच्या जातीस, कुळास फारसें महत्त्व नाहीं. महत्त्व मानव आपलें आयुष्य कसें घालवितो याला आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी या विचाराचें ज्ञानेश्वरी अध्याय ९ मध्यें फारच उत्कृष्ट विवेचन केलें आहे. ते म्हणतात--

" म्हणौनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ।। "
" राजाज्ञेची अक्षरें आहाती ।। तियें जामा एका जया पडती ।
तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तु ।।
" वांचूनि सोनें रुपें प्रमाणनोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे ।
तेंचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवी ।।
" तैसे उत्तमत्व तैंचि सरे । तैंचि सर्वज्ञता सरे ।
जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ।।
" म्हणौनि कुळजाति वर्ण । हें आघवेंचि गा आकारण ।
एथ अर्जुना माझे पण । सार्थक एक ।।
" जरी मियां चाड तरी भक्ती । न विसंबिजे गा ।।
" अगा कुळाचिया चोखटपणा नलगा । आभिजात्य झणीं श्लाघा ।

व्युत्पत्तीचा वाउगा । सोसु कां वाहवा ॥
" कां रुपवयसा माजा । अथिलेपणें कां गाजा ? ।
एक भाव नाहीं माझा । तरी पाल्हाळ तें ॥

श्रीआनंदभारती यांचा जन्म उच्चवर्णांत झाला नव्हता. त्यांचा धंदा हलक्या प्रतीचा होता, ते शिकलेलीही मुळीच नव्हतें. अशा स्थितींत ईश्वरभक्ति करून त्यांनीं असें उच्चस्थान प्राप्त करून घेतलें कीं, ठाण्यांतील व त्याच्या आसपासची त्यांच्या सान्निध्यांत येणारी शिक्षित, अशिक्षित स्त्रीपुरुष, सर्व उच्चनीच जातीची मंडळी त्यांच्यापुढे नतमस्तक होत. केवढें ईश्वरभक्तीचें सामर्थ्य ! श्रीआनंदभारती महाराजांचें जीवन म्हणजे वर दिलेल्या ज्ञानेश्वरींतील ओव्यांचा प्रत्यक्ष पुरावाच आहे.

त्यांच्या जीवनांतील दुसरी गोष्ट म्हणजे ते आपल्या मोक्षाची साधना सिद्ध करूनच थांबलें नाहींत, त्यांनीं आपलें जीवन तुकोबांनी म्हटल्याप्रमाणें 'तुका म्हणें आतां । उरलों उपकारा पुरता ' जनहितायच घालवलें.

श्री आनंद भारती महाराजांच्या या छोटया चरित्राबरोबर त्यांचेंच शिष्य कै. गोपाळराव विद्वांस यांनीं लिहिलेलें 'श्रीगुरुलीलामृत' अध्याय १ ते २१ (सार) छापलें आहे. तेंहि संतचरित्रपरच आहे. त्याच्याहि वाचनानें दैव व संत यावरील निष्ठा वाढेल असेंच आहे.

परमार्थाची प्राप्ति करून घेऊन तो क्रिया करून दाखवणाऱ्या श्री आनद भारती महाराजांचे चरित्र लिहून तें प्रकाशित करून श्री. मोरे यांनीं मोठी संतसेवा केली आहे. त्यांची ही संतसेवा भगवच्चरणारविंदी रुजु होवो.

" तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें
जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ "

— ज्ञानेश्वरी अ. १२–२२७.

श्रीक्षेत्र आळदी
आळंदी देवाची, पुणें.

**— शं. वा. दांडेकर.**

[५३८ ... १८।६।७०
ग्रंथालय
९५२८७.

# ठाण्याचा थोडा पूर्व इतिहास, तत्कालीन समाज आणि श्री आनंद भारतींचे जन्म व बालपण

—=*=—

इ. स. पूर्वी २००० पासून ठाणें हे गांव आस्तित्वांत आलें आहे. त्या वेळीं ठाण्यास 'बिंबस्थान' म्हणत असत. त्या बिंबस्थानामध्यें ८४ पाखाड्या होत्या. महागिरी व चेंदणी ( सध्यांचा चेंदणी कोळीवाडा ) या पाखड्याचा त्यांतच समावेश होत होता. ठाण्याच्या तत्कालीन बिंबराजाच्या यशस्वी कारकीर्दीवरूनच ठाण्याचें नांव 'बिंबस्थान' असें पडलें. बिंब राजाच्या कारकीर्दीपासून ठाण्यामध्यें कोळी लोकांची वस्ती आहे. समुद्रांत जाऊन मासें मारणें आणि नावाडीपणा करणें हा त्या कोळी लोकांचा धंदा असे आणि ह्यावर ते आपली गुजरान करीत असत.

त्या काळीं ठाण्याच्या चेंदणी भागांतील कोळी लोक दर्यावर्दीपणांत इतकें पुढारलेलें आणि प्रवीण होतें कीं, त्यांची त्याबाबतीत बरोबरी करणें कोणासहि शक्य नव्हतें. आपल्या धंद्यानिमित्त हे कोळी लोक आपापली जहाजें घेऊन भारताच्या दक्षिण टोंकापर्यंत आणि इतरत्र दुरवर निधड्या छातीने जात असत. तत्कालीन राजे लोकांना ह्या कोळी लोकांची पुष्कळशी मदत होत असे. परंतु समुद्रांत जाऊन मासें मारणें आणि ते विकून आपले पोट भरणें अथवा फत्तेमारी करुन ( म्हणजे नेहमीच्याच सफरी करुन ) मिळणाऱ्या पैशावर पोट भरणें, हे दोनच मार्ग कोळी समाजापुढें होते. आणि मोठ- मोठ्या सफरीवर जाण्याकरितां मोठमोठी जहाजें किंवा गलबतें घेण्याकरितां त्यांच्याजवळ पुरेसा पैसा नव्हता. पैशाच्या अभावामुळें त्यांना आपल्या साधनसामुग्रींत वाढ करतां येत नव्हती. अधिकाधिक मासें मिळविण्यासाठीं हवी असणारी साधनें त्यांना खरेदी करतां येत नव्हती. त्यामुळें आजतागायतहि हे लोक आहे त्याच स्थितींत दिवस काढीत आहेत.

भारताचा पूर्व आणि पश्चिम किनारा आपल्या सरकारनें केवळ ह्याच कोळी समाजाच्या कर्तबगारीचें विशाल क्षेत्र म्हणून राखून ठेवून ह्या समाजास त्यांच्या धंद्याच्या प्रगतीकरितां पैसा आणि योग्य ती साधन सामुग्री पुरविली तर ह्याच समाजांतून उद्यांच्या समृद्धिसंपन्न भारताच्या मोठमोठ्या गलबतांवरील आणि आरमारी जहाजावरील कप्तान तयार होतील आणि आजचा हा दरिद्री समाज भारतांत भूषणभूत होईल.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत ह्या भागांवर फिरंगी लोकांचा अंमल होता, त्यावेळीं येथील कोळी लोकांनी त्यावेळच्या राजकर्त्या पेशव्यांना मदत केली. परंतु पेशवे सरकारांना आपल्या राज्यकारभारांतून फिरंग्यांच्या हालचालीकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. आणि ह्यांचेंच फिरंग्यांनी फायदा घेऊन वसई, वरळी, चिंबई, माहिम, शिव, शिवडी, धारावी ते ठाण्यापर्यंत दाटीवाटीनें पसरलेल्या सर्व कोळी समाजावर अतोनात जुलूम केला. फिरंग्यानी ह्या कोळी लोकांना आणि इतरहि अनेक जातींच्या लोकांना जुलूम जबरदस्तीनें बांटविण्याचा सपाटा चालविला.

त्यावेळीं पुरातन काळापासून अस्तित्वांत असलेल्या जव्हार संस्थानच्या एका कोळी राजाचें राज्य या भागांवर होते. त्या कोळी राज्याच्या राज्यांतील प्रजा शूर, धाडसी व आपापल्या धर्माविषयीं व जातींविषयीं अभिमान बाळगणारी होती. अतोनात जुलूम जबरदस्ती करूनहि त्या प्रजाजनांस बाटविणें फिरंग्यास कठीण जाऊं लागले. म्हणून त्यानीं त्यांच्या विहिरींत पाणवठ्याच्या जागेंत वगैरे ठिकाणीं पाव टाकणें, मांस टाकणें, घरावर मांस टाकणें, वगैरे क्षूद्र व धर्मभावना दुखविणाऱ्या मार्गांचा अवलंब करून संबंध ठाणे तालुका, वसई, माहिम इत्यादि ठिकाणीं धर्म उच्छेदाचा कहर मांडला. असल्या क्षूद्र उपायानीं बाटल्याचा आरोप ते लोकांवर करुं लागले. ह्या आरोपांमुळें चेंदणो भागांतील कोळी लोकांना पण आपण बाटलो असे वाटूं लागले, पण तरीहि कोणीहि ख्रिश्चन धर्माचें रीतीरिवाज, आचार विचार कांहीं पाळले नाहींत. हिंदु धर्मांच्या रीतरिवाजा प्रमाणें वागणें, हिंदु देवदेवतांस पुजणें, त्यांच्या जयंत्या साजऱ्या करणें गौरीगणपती, दसरा दिवाळी सारखे सण करणें वगैरे हिंदुधर्मियाप्रमाणें ते

वागत असत, तसेंच हिंदु धर्मांच्या तीर्थांना पण ते जात असत. तरीहि ख्रिस्ति धर्मप्रसाराच्या वेडानें वेडावलेले धर्म प्रसारक ( पाद्री ) ह्या लोकांच्या जन्म संस्काराच्या वेळीं, लग्नकार्याच्यावेळीं व मृत्यूच्या वेळीं त्यांच्याकडे येत आणि त्या त्या वेळीं त्या लोकांच्यावर आपापलें धर्म संस्कार करण्याचें जुलुम जबरदस्तीनें लादत असत.

अशाहि विकटावस्थेत ह्या हिंदु लोकांनीं विशेषत: आपला हिंदुत्वाचा अभिमान, राहणी व पेशा सोडला नाहीं. हा जुलूम जबरदस्तीचा काळ कित्येक वर्षे असाच चालू राहिला. परंतु इ. स. १७३९ मध्यें पोर्तुगीजांशी झालेल्या संग्रामांत ह्या लोकांनी वसई व साष्टी तालुका घेतला, त्यामुळें इंग्रजासहि धास्ती पडली. पुढे पुढें त्यांनीं फिरंग्यांचा जुलून टाळण्यास प्रारंभ केला, तरीहि फिरंग्यांचे पाद्री लोक त्यांच्याकडे यायचें थांबेनात, म्हणून त्याबाबतींत पाद्री लोकांबरोबर ह्या लोकांचे खटकें उडूं लागले. हे तंटे विकोपास गेल्यामुळें शेवटीं त्या वेळच्या ठाण्याच्या कलेक्टरास मध्यस्थी करावी लागली आणि त्यांनीं पाद्री लोकांस सांगितलें की, येथील लोकांवर तुम्ही जुलूमानें तुमचें धर्मसंस्कार लादूं नयेत.

पण पूर्वीच्या अज्ञ समजुतीप्रमाणें आपणाला लोकांनीं वाटलेला समाज म्हणून समाज–बाह्य ठरवूं नये, म्हणून त्या लोकांनीं त्या वेळचें श्रीमंत शंकराचार्य, शृंगेरीमठ ह्यांच्या हस्ते तेथील कांहीं धार्मिक ब्राम्हण मंडळीच्या साह्यानें मोठा शुद्धिसमारंभ घडवून आणला त्यानंतर हे सर्व लोक हिंदुबांधवांत मिळून मिसळून हिंदू या नात्यानेंच राहात आले आहेत. त्यांनीं बांधलेली प्रशस्त देवालयें त्यांच्या हिंदुत्वाची साक्ष यायला आजहि अस्तित्वांत आहेत. तसेंच त्यांनीं पूर्वीच्या दोन देवालयांचा जवळ जवळ ६० हजार रुपये खर्चून जीर्णोद्धार केला. नाखवा, तांडेल व खलाशी ह्यांनीच ह्या कार्यास जास्तीत जास्त मदत केली आहे. तेच त्या देवाल–यांत कायमचें पुजारी असून तेच सर्व धार्मिक उत्सव देवळांत करीत असतात. देवळांतील सर्व खर्चाच्या उत्पन्नाकरितां त्यांनीं चाळी बांधून भाड्यानें दिल्या आहेत.

आज ठाण्यामध्यें विशेषत: कोळी समाजांत आणि भंडारी समाजांत ( इतरत्रहि ) श्री सद्‌गुरु आनंदभारती महाराजांची तसबीर दृष्टीस पडणार

नाहीं असें एकहि घर सांपडणें कठीण आहे. प्रत्येकजण मोठ्या भक्ति-भावानें श्री आनंद भारती महाराजांना भजत आहे ठाणें येथील श्री आनंद भारती समाज, चेंदणी कोळीवाडा यांची व्यायामशाळेची इमारत म्हणजे तर महाराजांचे अलौकिक स्मारक होय. आज ठाण्यामधील श्रीदत्त मंदिर आणि श्री लक्ष्मीनारायण मंदीर म्हणजे महाराजांच्या अलौकिक भक्तिविजयाच्या कीर्तिपताकाच होत ! कोळी समाजांत महाराजांचा जन्म झाला, पण आज सर्व धर्मियांत महाराजांचें भक्त पसरलेलें पाहून वाटतें--

**जाति न पूछ साधु की, पूछो लीजिये ज्ञान**
**मोल करो तलवार का, पड रहने दो म्यान ॥**

हे संत कबीराचे उद्‌गार किती सार्थ आहेत !

महाराज धीवर ( कोळी ) कुळांतील नाखवा घराण्यांतील ( कांठीचे घराणें ) होत. त्यांच्या नाखवा घराण्यांतील त्यांचे पूर्वज फत्तेमारीच्या व मासेमारीच्या व्यवसायावरच जीवन जगत असत. बहुतेक सर्वच लोकांचे जीवन दर्यावरच्या सफरी आणि मासेमारी ह्यावरच अवलंबून असे. त्या काळीं त्यांचा समाज म्हणावा तितका सुधारलेला नव्हता. शिक्षणाचाहि योग्यतो प्रसार झाला नव्हता. त्यामुळें त्यांच्या वडिलांना तोच व्यवसाय पत्करणें भाग पडलें. महाराजांचा जन्म त्याच नाखवा घराण्यांत शके १७५३ मध्यें ( इ. स. १८३१ ) ठाणें येथील चेंदणी कोळीवाड्यांत झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गुलाम नाखवा असें होते. ते दुरवरच्या सफरी तसेंच मासेमारीचा धंदा पण करीत असत. पण तरीहि त्यांच्या घरची स्थिती गरीबीचीच होती. महाराजांचे मुळचें नांव पांडु होतें. आपल्या मुलानें शिक्षण घेऊन सुशिक्षित होण्यापेक्षा आपल्या आहे ह्या धंद्यातच लक्ष घालून त्याची वाढ करावी आणि सुखानें जगावें असें त्यांच्या वडिलांना वाटत असे. त्यामुळें बालपणीं शिक्षण घ्यावयाच्या वयांतच त्यांच्यावर उद्योगधंदा चालू करण्याची जबाबदारी पडली. त्यांनीं आपल्या धंद्यांत लक्ष घालण्यास सुरूवात केली.

तरी पण अगदी बालपणापासूनच त्यांचे सर्व लक्ष ईश्वराच्या उपास-नेंनच गुंतले होते. परमेश्वराच्या नामसंकीर्तनांतच दिवसाचा बराचसा वेळ निघून जात असे. ' भक्तिविन कोई तर नही जावे ' हे लहानपणापासूनच

त्यांच्या मनावर बिंबून गेले होते. आपल्या मासेमारीच्या धंद्याकरितां ते रोज होडींत किंवा पडावांत बसून दर्यावर जात-येत असत. तरीहि प्रातःकाळी समुद्र स्नान, प्रातःस्मरण व आपली नेहमीची भजने व प्रार्थना केल्याशिवाय ते दिवसाचे कोणतेंच नवीन काम सुरू करीत नसत. ते आपल्या उद्योग-धंद्यानिमित्त ठाण्यातच नव्हे तर इतर कोणत्याहि ठिकाणीं जरी गेले तरीहि ते आपला नित्यक्रम कधींहि विसरत नसत. परमेश्वराची आराधाना माणसानें नैमितिक न करतां ती सदा सर्वदा केली पाहिजे अशा मताचें ते होते. त्यामुळें दिवसानुदिवस त्यांचे मन परमेश्वराच्या ध्यान पूजनांत स्मरण चिंतनांत अधिकाधिक ओढ घेऊं लागलें. त्यांचें मन जरी परमेश्वराच्या मनन चिंतनांत गुंग होत होतें. तरी शरिरानें धंद्याच्या गोष्टी चालूंच होत्या फत्तेमारीवर ते हळूं हळूं मुख्य तांडेल झालें. मुख्य तांडेल म्हणजे जहाजाचा मुख्य अधिकारी होय.

## तारुण्याचा पूर्वभाग

सध्यां ठाणें रेल्वे स्टेशन लाईनच्या बाजूनें दक्षिणेकडे एक छोटासा रस्ता आहे, तो ' श्री आनदभारती रस्ता ' म्हणून ओळखला जातो, त्या रस्त्याच्या पूर्वेस श्री पुंडलिक विठू नाखवा ( आनद भारती महाराजांचें पुतणें ) यांचे घर आहे, तेच महाराजाचे मुळचें घर होय. महाराजांचें बालपण तेथेंच गेले. त्या घराच्या माळच वर जाऊन लहान असतांना महा-राज भजनें म्हणत बसत असत. शेजारपाजाऱ्यांना व घरच्या मंडळींना त्यांच्या भजनाचा त्रास वाटूं लागला. त्यांनीं त्यांना उपद्रव देण्यास सुरूवात केली. त्यामुळें सध्यां श्री आनंद भारती रस्याच्या पूर्वेस असलेल्या श्री. राम-भाऊ कोळी यांच्या घराशेजारींच एक छोटीशी झोंपडी त्यांनीं बांधली आणि त्या झोंपडींतच ते राहूं लागलें त्या झोंपडोत ते त्यांचें चुलतबंधु श्री शनवार नाखवा यांना बरोबर घेऊन व आजुबाजूची लहान मुलें जमवून भजनें म्हणत बसत असत. पण त्यांचा धंदाहि चाललेला होताच- त्यांना फत्तेमारीस दुरवर जावें लागत असें, पण तरीहि त्यांच्या परमेश्वराच्या उपासनेंत कधीं खंड पडत नसे.

माणूस कोठेंहि असला किंवा कोणत्याहि परिस्तींत असला तरीं त्यानें परमेश्वराचें भजन-पूजन-चिंतन सोडूं नये, असे ते म्हणत असत. ते ज्यावेळीं

भजन पूजनांत गुंग होत असत. त्यावेळीं ब्रह्मानंदी टाळी लागल्याप्रमाणें त्यांची अवस्था होई, त्यांना मग वेळेचे इतर कशाचेहि भान रहात नसे. पण त्यांची परमेश्वरावरील भक्ति आणि त्यांचा दिवसानुदिवस विरक्त होत चाललेला स्वभाव पाहून त्यांच्या घरच्या मंडळीना त्यांच्या विषयीं काळजी वाटूं लागली. त्यामुळें त्यांचे लग्न करावें आणि त्यांचा संसार सुखाचा झालेला पाहावा, अशी त्यांच्या घरच्या मंडळीची इच्छा झाली. पण महा–राजांना आपण लग्न करावें आणि संसार थाटून रहावें ही कल्पना पसंत नव्हती. त्यामुळें लग्न करण्यास त्यांनीं विरोध केला. पण तरीहि त्यांनीं गृहस्थाश्रमी व्हावें म्हणून त्यांच्या घरी त्यांचा विरोध असतांहि लग्न ठरविलें आणि शके १७७३ साली ( इ. स. १८५१ ) त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षीच त्यांचे लग्न झाले. पण त्यांचे सर्व लक्ष परमेश्वर नामस्मरणांत गुंत–ल्यामुळें त्यांना संसार सुखांत केव्हाहि गोडी वाटली नाही. त्यामुळें त्यांना संतान वगैरे कांही झाले नाहीं. त्याच सुमारास म्हणजे इ. स. १८५१ सालीं दुर्दैवाने त्यांच्या मातोश्री निधन पावल्या. तरीहि आपल्या वडिलांना त्याचे दुःख वाटूंनये म्हणून त्यांनीं वडिलांनीं दुसरे लग्न करावें म्हणून आग्रह धरून त्यांचे लग्न करून दिले आणि त्यानंतर आपली सावत्र आई, वडील व आपल्या पत्नीसह त्यांनीं कांहीं काल घालविला.

## अहो संतकृपा झाली

पुढें एकदां महाराज एक मोठें जहाज घेऊन पुष्कळ मंडळींना बरोबर घेऊन एका दुरच्या सफ़रीस निघाले. सफरीस निघतें वेळीं दर्या शांत होता. वारेहि अनुकुल वहात होते. सर्वांना सफरीतून पुष्कळसा पैसा घेऊन सुख-रूपपणें परत येण्याची आशा वाटत होती. पण एकाएकी आकाशांत कृष्णमेघ जमा होऊं लागलें. वीजा चमकूं लागल्या. सागरानें आपलें शांतगंभीर स्वरुप टाकून देऊन रौद्र स्वरुप धारण करण्यास सुरवात केली. लाटांचा खळख-ळाट वाढूं लागला. लाटा मोठ–मोठ्या होऊन कर्णकठोर गर्जना करीत एकमेकींवर आपटूं लागल्या. जहाज हेलकावे खाऊं लागलें. जहाजावरील लोक हवालदिल झाले. महाराज मात्र त्या वादळाच्या भीषण वेळींहि शांत-चित्तानें ‘ श्री हरिविजय ’ ग्रंथ वाचनांत गुंग झालें होते. लोकांनीं त्यांना

भीत भीत वादळ झाल्याची बातमी सांगितली महाराज जहाजाचें मुख्य तांडेल असल्यानें सर्व लोकांचे संरक्षण करण्याची जबाबदारी महाराजांचींच होती. दुर्दैवाने वादळांत आपले जहाज बुडालें तर आपल्या बरोबरचें कितीतरी लोक बुडून मरण पावतील आणि त्यांचे संसार उध्वस्त होतील. त्यांच्या कुटुंबांतील लोक देशोधडीला लागतील, हे महाराजांस कळून चुकलें.

त्यांनीं 'श्रीहरिविजय' ग्रंथ आपल्या समोर ठेविला आणि हात जोडून प्रार्थना केली, " श्रीअक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज, हे उठलेले वादळ शांत करा आणि आमचें सफरीस चाललेले जहाज सफरीतून सुखरुपपणें परत येऊं दे, मीं सर्वसंग परित्याग करून माझें आयुष्य तुमच्या सेवेंत आणि परमेश्वरोपासनेंत घालविन. " एकादा दैवी चमत्कार व्हावा, त्याप्रमाणें महाराजांचें शब्द ऐंकून वादळ ताबडतोब शांत झालें. सर्व लोकांनीं सद्गुरु अक्कलकोट स्वामीचा आणि महाराजांचा (' पांडुबुवा ' या नांवानें) जयजयकार केला. महाराजांच्या पुण्याईनें आणि श्री स्वामीसमर्थ महाराजांच्या आराधानेने बुडणारी फत्तेमारी वांचली. सर्वश्रेऽठ तुकाराम महाराजांनीं म्हटले आहे ते बरोबर आहे–

**तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं ।**
**ओळगति चारी ऋद्धि सिद्धि ॥**

## अक्कलकोट येथें सर्व शिष्यांना समुद्र स्नान

त्याचवेळीं अक्कलकोट येथेंहि एक मोठा चमत्कार घडून आला. सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज आपल्या शिष्यगणांसमवेत श्री हरिभक्तीवर विवेचन करीत बसलें होतें. एकाएकी ते विवेचन करतां करतां थांबले आणि ओरडलें, " अरे तो पहा, समुद्रात पांडु बुडाला ! " शिष्यांनीं आजुबाजूस पाहिलें, पण पांडुहि नव्हता अणि समुद्रहि नव्हता. अक्कलकोटास समुद्र येणार तरी कसा ? सद्गुरू महाराजांनीं हवेतच हात मारलें आणि पांडुला वांचविल्यासारखे केले. त्यानंतर त्यांनी हवेतच हात मारुन स्वतःच्या ओंजळींतून समुद्राचें खारे पाणी सांडून दाखविलें. स्वतःच्या हातांनीं हवेंत भरुन भरुन ओंजळीं स्वतःच्या डोकीवर ओतून त्यांनी स्नान केलें आणि आपल्या शिष्यांनाहि समुद्रस्नानाचा आग्रह करुन त्यांनाहि स्वतःच्या ओंजळीनें

समुद्रस्नान घातले. अक्कलकोट येथेंच महाराजांच्या हस्तें समुद्रस्नानाचा लाभ झालेला पाहून सर्व शिष्यगणांस परमावधीचा आनंद झाला.

## सर्व संग परित्याग करुन महाराजांचें अक्कलकोटास प्रयाण

त्या वादळानंतर जहाजाची फत्तेमारी व्यवस्थितपणें पार पडली. फत्तेमारीनतर जहाजावरील लोक आपापल्या घरीं आलें. महाराज मात्र आपल्या घरीं गेलें नाहींत. त्यांनीं आपणांस मिळालेलें पैसें आपल्या घरी देण्याकरितां शेजाऱ्यांजवळ दिलें आणि त्यांच्याकडून आपण सद्‌गुरू श्री स्वामी समर्थ महाराजाच्या दर्शनास अक्कलकोटास जात असल्याचा निरोप घरीं कळविला. त्यावेळीं श्री सद्‌गुरू अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांचे संत–महात्म्य चोंहिकडें प्रसिद्धीस आलें होतें. ठाण्यांतील बरीचशी मंडळीं त्यांच्या दर्शनास वरचेवर अक्कलकोटास जात–येत असत. महाराजांचा जन्मजात भक्तिमार्गाकिडे आत्यंतिक ओढा असल्यामुळें त्यांचीहि श्री अक्कलकोट–निवासी महाराजांच्यावर भक्ति व निष्ठा होती. त्याच्या दर्शनास जाऊन आपण सद्‌गुरू कृपेचा लाभ घ्यावा आणि कृतकृत्य व्हावे असें महाराजांना वाटत होते. त्यांच्या दर्शनाचा त्यांना कितीतरी दिवसापासून निदिध्यास लागून राहिला होता.

महाराजांचें लग्न त्यांच्या ऐन जवानीत विसाव्या वर्षीच झाले होते. पण त्यांचें भक्तिमार्गी मन संसारांत मुळीं सुद्धा रमलें नाहीं. त्यांचा दिवसाचा बहुतेक सर्वच वेळ भजन–पूजनांत जात असे. त्यांची चित्तवृत्ति दिवसानुदिवस विरक्त बनत चालली होती. त्या निदिध्यासांतच ठाणें येथील श्रीमारुतीच्या देवालयांत महाराजांना साक्षात्कार झाल्याप्रमाणें श्री स्वामी समर्थ महाराजांचें प्रत्यक्ष एकाएकी दर्शन घडले. आपल्या संसारी जीवनाची त्यांना पूर्ण उपरति होऊन सद्‌गुरु दर्शनाचा लाभ घडल्यानें त्यांना परमानंद झाला. आपल्या संसार–सुखाचा त्याग करून आपण सद्‌गुरुसेवेंतच आपलें जीवन व्यतीत करावें असें त्यांना अगदी मनोमन वाटूं लागलें. पण संसाराचा त्याग सहजासहजी करतां येणें त्यांना कठीण होतें. कारण ते आपल्या घरांतील कर्ते पुरुष होतें. घरची सर्व जबाबदारी

त्यांच्यावरच होती. त्याच्या वडिलांची आणि सावत्र आईचीहि त्यांच्यावर अनिवार माया होती. त्यांनी आपल्या आईवडिलांची समजूत घातली. त्यांनी आपल्या सावत्र आईस त्यांच्या पहिल्या घरच्या मुलास आणून दत्तक घेऊन त्यांचें लग्न करण्यास सांगितले आणि आई व वडिलांचें सांत्वन केले पुढें ( मागील अहो संतकृपा झाली ह्या भागात सांगितल्याप्रमाणें ) महाराज दुखेरच्या फत्तेमारीस निघालें असतां त्याचे जहाज समुद्राच्या मध्यभागीं असतां जोरानें वादळ होऊन बुडूं लागलें, त्यावेळीं महाराजांनीं श्री स्वामी-समर्थ महाराजांचे जहाज सुखरुपपणें फत्तेमारी पार पडून परत येऊं दें म्हणून प्रार्थना केली. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेनें वादळ शांत झाले. फत्तेमारी सुखरुप पार पडून जहाजावरील सर्व लोक आपापल्या घरीं आलें, पण महाराज मात्र अक्कलकोटास सद्‌गुरुच्या दर्शनासाठीं निघून गेलें.

## सद्‌गुरुंचा अनुग्रह

**" जया सद्‌गुरू पावला । धन्य तोची जगीं झाला ।।"**

महाराज ज्यावेळीं अक्कलकोटला जाऊन श्री स्वामीसमर्थ मठामध्यें पोंहचलें, त्यावेळीं श्री स्वामीसमर्थ महाराज आपल्या इतर शिष्यासमवेत नामसंकीर्तनांत देहभान विसरुन गुंग झाले होते. पण महाराज दरवाजांत येतांच श्री स्वामीसमर्थ महाराज त्या समाधींतून एकदम जागे झालें आणि उठून उभे राहिलें. महाराजांनी ( पांडुबुवांनी ) धावत येऊन भक्तिभाव-पूर्वक त्यांच्या पायांना कडकडून मिठ्ठी मारली. महाराज सद्‌गदीत कंठानें म्हणालें, " सद्‌गुरु महाराज, मला आतां संसार नको. कांहीं नको. आतां आपली सेवा हा माझा संसार. आपण मला आशिर्वाद द्या." श्री स्वामीसमर्थ महाराजांनी त्यांना प्रेमपूर्वक आशीर्वाद दिला आणि उठवून आपल्या हृदयाशीं कवटाळलें. सारे शिष्य विस्मयानें पाहातच राहिलें. श्री स्वामी-समर्थ महाराज म्हणालें, " अरे कोळयाच्या पोरा, माझ्या सागराला एवढा घावरतोंस तुला तर या दुनयेचा सागर तरुन जायाचा आहे." श्री स्वामी-समर्थं महाराजांनी त्यांना उपदेश करुन अनुग्रह केला. महाराजांना आपले जीवन कृतार्थ झाल्यासारखें वाटलें.

त्यानंतर महाराज दोन तीन वेळां अक्कलकोटास श्री स्वामीसमर्थ महाराजांच्या दर्शनास गेलें. शेवटीं त्यांनीं आपल्या वडिलांना आपल्या

सावत्र मातेसह घेऊन अक्कलकोटची वारीं केली. त्यांनी आपल्या बरोबर " भगवी केलेली वस्त्रे घेतली होतीं. तीं त्यांनीं मठात जाऊन श्री स्वामीना न कळत त्यांच्या बिछान्याखाली ठेविली होती. श्रीस्वामीसमर्थ महाराज कांहीं वेळानंतर येऊन आपल्या बिछान्यावर बसले. महाराज त्यांच्यपुढें येऊन हात जोडून उभे राहिलें महाराजांची भक्तिमार्गावरील अन्यान्य निष्ठा, गुरुभक्ति आणि दत्तपंथाचा स्वीकार करण्याचा दृढनिश्चय पाहून श्री स्वामी-समर्थांना परम आनंद झाला. महराजांच्या मनांतील सर्व गोष्टीं अन्तर्ज्ञानाने जाणून घेऊन त्यांनीं आपल्या बिछान्याखाली भगवी वस्त्रे स्वतःच्या हातानें काढून मोठ्या प्रेमानें हातांत घेऊन त्यांनीं महाराजांना " घ्या हा आनंद घ्या आणि आतां 'आनद भारती ' व्हा, " असा हसून आशीर्वाद दिला, महाराजांनीं समर्थांचे पाय धरले. मग श्री स्वामीसमर्थांनीं त्यांच्या शिरावर आपला वरदहस्त ठेवून त्यांना अनुग्रह दिला. भगवी वस्त्रे परिधान करून आनंद–भारती " ब्रह्मानदानें परमेश्वराची भजनें गात नाचूं लागले.

श्रीस्वामीसमर्थ महाराजांसारख्या सद्गुरूंचा कनुग्रह आणि आशिर्वाद लाभल्यानें महाराजांचें जीवन कृतार्थ झालें. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पहिल्यावेळीं देहूहून पंढरपूरास विठ्ठलाच्या दसर्शनास गेले, तेंव्हां पंढरीचा पंढरीनाथ भेटल्यानंतर

**" ऐसे स्थळ नाहीं कोठे ।**
**तुक्याला विठ्ठल भेटे ॥ "**

अशी अभंगवाणी त्याच्या मुखांतून बाहेर पडली आणि पुढें पंढरपूर सोडून लौकर परतावेसे त्यांना वाटेंना, तशीच महाराजांचीहि स्थिती झाली. अशा थोर संतमहंताच्या भेटी होऊन जीवन कृतार्थ व्हावयास परमेश्वराची कृपाच व्हावी लागतें, म्हणून तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे–

**" बहु अवघड आहे संत भेटी ।**
**परि जगजेठी कृपा केली ॥ "**

श्री स्वमी समर्थांसारखे सद्गुरू महाराजांना लाभले हे त्यांचे सद्भा–ग्यच होय. त्यामुळें महाराजांना श्री सद्गुरुना सोडून त्यांचा निरोप घेऊन परतावे असे वाटेना, सद्गुरुंच्या सेवेत, त्यांचा सदुपदेश श्रवण आणि चिंतन करण्यांत आणि भजपूजनांत महाराजांचा सर्व वेळ सार्थकीं पडूं लागला.

त्यावेळीं त्यांना वेळेचे, भूकेचे किंवा दुसऱ्या कशाचेहि भान रहात नसे. सद्‌गुरुच्या प्रभावाने आणि स्वतःच्या आत्मबलानें ते अगदी तन्मनीय अवस्थेला जाऊन पोंहोचले होते, अशा प्रकारे त्यांची अकरा वर्षे कधी निघून गेली. पण त्याननर महाराजांना श्री स्वामी समर्थांची आज्ञा होतांच ते अक्कलकोटहून मुंबईस कांदेवाडी येथील श्रीस्वमोसुतांच्या मठामध्ये येऊन राहिलें. तेथे आल्यानंतर दर गुरुवारीं श्री स्वामींच्या आज्ञेनुसार ते भिक्षा मागून राहात असत, मात्र त्यांच्या भजनपूजनाचा नित्यक्रम संतत चालू होताच.

## ठाण्यास पुनरागमण

परंतु श्रीस्वामीसुतांच्या मठामध्यें रहात असतांना श्री आनंद भारती महाराजांना श्रीस्वामीसमर्थांचा एकदां दृष्टांत झाला आणि त्यांनीं त्यांना पुन्हा ठाण्यास परत आपल्या वसाहतींत जाऊन राहण्याची आज्ञा केली त्यामुळें महाराज पुन्हां ठाण्यास आलें. ठाणे रेल्वे स्टेशनच्या उतरेकडें ( श्रीदत्तमंदीर जवळच्या ) एका औदुंबराखाली त्यांनीं एक छोटी झोपडी बांधली आणि त्या झोंपडीत राहिल्यानतर रात्रदिवस ते नामसंकीर्तन करुं लागलें. तसेच दुपारच्या वेळीं आणि रात्रीसुद्धां ते ठाण्यामधील श्रीकौपिनेश्वराच्या देवळांत जाऊन एकांतांत धार्मींक ग्रथाचे वाचन, मनन आणि चिंतन करीत बसत असत. दिवसांतून कांहीं वेळ त्या ठिकाणीं ते समाधीस्थ पण बसत असत. महाराज औदुंबराखालीं ज्या पर्णकुटीमध्यें राहात असत, त्या पर्णकुटीमध्यें त्यांच्याबरोबर 'काशी' नांवाची गाय, 'कल्याणी' नांवाची एक कुत्री आणि एक मधुरभाषी गोडसा पोपटहि होता. त्या प्राणिमात्रांवर महाराजांचें जिवापाड प्रेम असे अणि त्या प्राणिमात्राचेंहि महाराजांवर अतोनात प्रेम असें. त्यांना स्वतःच्या हातानें जेवू घातल्याशिवाय महाराज स्वतः अन्नाला स्पर्श करीत नसत ते मुक जिवहि नामसंकीर्तनांत गूंग असल्यासारखें भासत असत. त्या ठिकाणीं पण महाराज दर गुरूवारीं भिक्षा मागण्यास जात असत. त्यावेळीं त्यांच्याकडे पुष्कळ मंडळी येत जात होतीं. त्यामध्ये भारतानद, जती, हरि व चंचल भारती ( हिरा पाटील ) ही मंडळीं स्वतःस महाराजांचें शिष्य समजत असत. त्या मंडळीना व लहान लहान मुलांना बरोबर घेऊन भगवे निशान घेऊन महाराज

भजनें म्हणत म्हणत रस्त्यानें भिक्षा मागत जात असत. ते कोणाच्या दारांत उभें राहात नसत. कोणी भिक्षा वाढलीच, तर ती मोठ्या प्रेमानें घेत आणि त्यांस आशिर्वाद देत. महाराजांना थोडीशी भिक्षा मिळाली तरी ते खुश असत, पण कोणी अधिक भिक्षा घातली तर ते नाखुष होत असत. ते भिक्षा घेत भजनें म्हणत रस्त्यानें चालत असतां समोरून दुसरा कोणी दीनदुबळा भिकारी दिसला कीं, त्यांस मोठ्या आपुलकीनें बोलावून महाराज स्वतःच्या झोळीमध्यें हात घालून त्यांस आपणांजवळ जमलेली भिक्षा देत असत; ते पाहून काहीं कांहीं लोकांना आश्चर्य वाटे आणि महाराजांच्या-विषयीं त्यांच्या मनांत असलेला आदर वाढत असे. कित्येक लोक महाराजांची 'कोष्टीबुवा' म्हणून चेष्टाहि करीत असत. महाराजांची चेष्टा करण्याच्या उद्देशानें ते लोक महाराजांच्या झोळीमध्यें माती, दगड-धोंडे, मांस, हाडे, वहाणा वगैरे गलिच्छ वस्तू टाकीत असत, पण महाराज त्यांच्या-वर कधींच रागवत नसत. 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास' अशीच त्यांची थोर सहिष्णुवृत्ति होती. त्यांना त्या लोकांच्या कमकुवत मनाचीं कींव वाटून ह्या लोकांचे कसें होणार ह्या विचारानें वाईट वाटे. असें दुर्जन लोक महाराजांना पदोपदी भेटत होतें पण महाराजांची कीर्तिदुंदुभी गाजविण्यास हे दुर्जनच कारणीभूत झालें. संत कबीर महाराजांनीं म्हटलेंच आहें—

**" सज्जनसे दुर्जन भले । कीं परनिंदा करत,**
**सज्जनकू उधारत । आपन नरक पचत ॥ "**

## पांडुरंग मास्तरांना दत्त दर्शन घडविलें

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' म्हणतात त्याप्रमाणें साधु-संतजनांचें जीवन हे जगाच्या उद्धारासाठींच असतें. त्यांना स्वतःचें जीवन असे नसतेंच मुळीं. पण आपले सारे जीवन जगासाठीं झिजवूनहि त्यांना जग सदोदित डोक्यावर घेऊन गौरव करते असें नाहीं. तर बऱ्याच लोकांना त्रास त्यांना संतत भोगावा लागतो. स्तुतीपेक्षां निंदाच त्यांना अधिक ऐकावी लागते. पण ते स्तुतीमुळें कधीं हरकून जात नाहींत कीं, निंदेमुळें दुःखी-कष्टी होत नाहीत. त्यांच्या ह्या थोर हृदयाची ओळख जगाला कधीं कधीं फार उशिरा पटतें मात्र आमच्या सद्गुरूआनंद भारती महाराजांची

अशा प्रकारची ओळख ठाणेकरांना आणि महाराजांच्या भक्त मंडळींना लौकर पटली आणि सर्वजन महाराजांच्या भजनीं लागले, ह्या मंडळींत पांडुरंग मास्तर कळवेकर म्हणून एक गृहस्थ होतें.

ठाणे स्टेशनच्या उत्तरेस आज ज्या ठिकाणीं श्री दत्तमंदिर आहे, त्या ठिकाणीं असलेल्या औदुंबराच्या झाडाखालीं एक छोटीशी पर्णकुटी बांधून महाराज एकांतात राहात असत. गुरूवार दुपारची वेळ होती. महाराज जेवण करीत बसलें होतें. इतक्यांत बाहेरुन त्यांची आवडती 'कल्याणी' नांवाची कुत्री तेथें आली आणि महाराजांच्या पानांतच तोंड घालून जेवूं लागली. त्यावेळीं महाराजांच्याकडे पांडूरंग मास्तर कळवेकर नेहमींप्रमाणें आलें होते. महाराजांच्या पानांत कुत्री जेवत असून तिला हांकून न देतां महाराज स्वस्थ चित्तानें जेवत असल्याचें पाहून पांडुरंग मास्तरांना त्या कुत्रीचा विलक्षण संताप आला. त्यांनीं जवळची एक कांठी घेऊन ती कुत्रीच्या पाठीवर मारली. कुत्री ओरडूं लागली. महाराजांना ह्या गोष्टीचा अतिशय संताप आला, ( संतजनांना संताप कधींच येत नाहीं, त्यांची वृत्ति कधीं कधीं वज्रासम कठीण होत असली तरी ती भक्तजनांच्यावर रागविण्यासाठीं नव्हे तर परमेश्वर त्यांना लौकर दर्शन देत नाहीं म्हणून परमेश्वरावर रागविण्यासाठीं. पांडुरंग मास्तरांच्या भाग्योदयाचीच वेळ त्यावेळीं आली होती म्हणूनच महाराजांना संताप आला. ) महाराज रागारागानें उठलें आणि त्यांनीं पांडुरंग मास्तरांच्या श्रीमूखांत जोरानें भडकावली. पांडूरंग मास्तर कोलमडून खाली पडले, त्यांची शुद्ध हरपली. परंतु थोड्या वेळानें जेंव्हां त्यांनी डोळें उघडलें, तेंव्हां महाराज जेवत होतें त्यांच पानामध्यें–

**" काशायवस्त्रं करदंडधारिणं ।**
**कमंडलु पद्मकरेण शंखम ।**
**चक्रं गदाभूषितं भूषणाढ्यं ।"**

अशी ती त्रिगुणात्मक श्रीदत्तात्रेयांची त्रिमूर्ति जेवत असल्याचें दिसलें. पांडूरंग मास्तरांनीं हात जोडलें. श्री दत्तात्रेयांच्या दुर्लभ दर्शनानें त्यांना ब्रह्मानंद झाला. त्यांना आपलें जीवन कृतार्थ झाल्याचा परमानंद झाला. त्यांनीं पुन्हां त्या मूर्तिसमोर आपले डोकें टेकलें. तेंव्हां महाराजांनीं त्यांना मोठ्या प्रेमानें हृदयासी कवटाळून धरलें आणि त्यांना आशीर्वाद दिला.

## जमला भक्तांचा मेळा

**" आनंदले माझें मन । प्रेमें पाझरती लोचन ।। "**

श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांना विठोबाचें दर्शन झालें, तेंव्हां त्यांचें मन आनंदलें, त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागलें. आपणांस विठ्ठल भेटल्याची बातमी त्यांनीं भेटेल त्याला सांगण्यास सुरुवात केली होती. त्याचप्रमाणें पांडूरंग मास्तर कळवेकरांनीं त्यांना महाराजांच्या कृपेनें श्रीदत्त महाराजांचें दर्शन घडल्याची बातमी सर्वांना सांगीतली अर्थात्च महाराजांची थोरवी पटून बरेच लोक त्यांच्या भजनी लागलें. महाराजांच्या सन्यांम्त जीवनास सुरूवातीपासून विरोध करणारी आणि त्यांची पावलोपावलीं निंदा नालम्ती करणारी त्यांच्या कोळी जमातींतील मंडळी महाराजापुढें नतमग्तक होऊन त्यांच्या कृपाप्रसादासाठी भक्ति भावपूर्वक ये जा करूं लागली

**संतांचीया गांवीं प्रेमाचा सुकाळ ।**
**नाहीं तळमळ दुःख लेश ॥**

अगदी अशीच परिस्थिती महाराजांच्या औदुंबराखालील पर्णकुटी-मध्यें होती. सर्व भक्तमंडळी आणि महाराज परमेश्वराच्या भजन पूजनांत ब्रह्मानंदी टाळी लागलेले असत, एकदा भजनरंगी रंगल्यानंतर भजनपुजनांत कोणालाच जेवण-खाण्याच्या किंवा झोंपण्याच्या वेळेचें भानच राहात नसे. जीवनाच्या जन्ममरणाच्या फेऱ्यांत आपल्या हातून सत्कृत्यें घडावीत. परमे-श्वराची सेवा घडावी आणि त्याकरितां महाराजांचा सदुपदेश आणि सत्कृपा आपणांस लाभावी, म्हणून पुष्कळ भक्तमंडळी महाराजांच्याकडे नित्य येत असत. त्या भक्तमंडळींत नारायण पांडू नाखवा, गोपाळराव नाना ठाणकर, बळीराम भंडारी (पाटील) नथु भडारी, रघु राऊत, आत्मा-राम कांवळें, हिराजी भास्कर मेस्त्री (वारे), हरिश्चंद्र पाटील, बाबू उर्फ महादेव, रघुनाथ राजे तसेच केरबा दामोदर सहानी, भास्कर रामकृष्ण सहानी, मॅजिस्ट्रेट साहेब गोविंदराव, माधवराव गाडगीळ, बापूजी बदला-पूरकर, केशवराव काका वगैरे कोळी, भंडारी आणि ब्राह्मण मंडळी पण होती (यांच्याखेरींज इतर कितीतरी थोर मंडळीं महाराजांच्या भक्तमंड-ळीमध्यें होती पण सर्वांचाच नामनिर्देश करणें जवळ-जवळ अशक्य आहे, क्षमस्व. )

## श्रीदत्त मंदिराची स्थापना

श्रीआनंदभरती महाराजांच्या भक्तमंडळींत आणि ठाण्यामध्यें श्रीसद्गुरु स्वामी समर्थ महाराजांचें शिष्य असंख्य होते. आपण सर्वांनीं मिळून अक्कलकोटास जावून तेथून श्री सद्गुरुंच्या पादुका आणून त्यांची ठाण्यामध्यें स्थापना करावी, असें ह्या मंडळींना वरचेवर वाटत होतें. शेवटीं त्यानीं ही गोष्ट श्री आनंदभारती महाराजांना विचारली. महाराजांना अत्यंत आनद झाला. त्यानंतर नारायण पांडू नाखवा, श्री आनंद भारती महाराज आणि इतर भक्तमंडळी आपणाबरोबर पादूका घेऊन श्री सद्गुरूंच्या आज्ञे-साठीं अक्कलकोटास गेली. महाराजांसह सर्वांनीं श्रीस्वामीसमर्थ महारा-जांच्याकडे ठाण्यामध्यें पादुका स्थापण्यासाठीं आज्ञा मागितली. श्री स्वामी-समर्थ महाराज पादुका जवळ घेऊन त्या नारायण नाखवांना अनुग्रहपूर्वक परत देत मोठ्या प्रेमानें म्हणाले, " लेव गंगासिंग, जाव बेदरका किल्ला बनाव. " सर्व मंडळी श्री सद्गुरूचा भक्तिभावपूर्वक निरोप घेऊन ठाण्यास परत आली आणि हल्लीं ज्या ठिकाणीं श्री दत्तमंदिर आहे त्या ठिकाणी त्यानीं मठ बांधून श्रींच्या पादूकांची स्थापना १८६६ मध्यें मोठ्या उत्साहानें केली. त्या मठामध्येंच श्री आनद भारती महाराज येऊन राहूं लागलें.

त्या मठामध्यें रहात असतांनाच पुढें पांच वर्षांनीं आपल्या भक्तमंड-ळींच्या सहकार्याने महाराजांनीं माघ शु. ३ शके १८०१ रोजीं श्रीदत्तात्रे-याची मूर्ति आणि श्री सितळादेवीची मूर्ति स्थापून मठास त्यांनीं श्रीदत्तमंदि-राचें स्वरूप आणलें. महाराज आपल्या भजनपूजनासाठीं श्रीदत्तमदिरांत जरी वास्तव्य करीत असलें, तरीहि आपल्या सद्गुरूंच्या भेटीसाठीं ते अधु-नमधून अक्कलकोटास जात असत. महाराजांच्या बरोबर मंदिरांत त्यांचें भरतानंद, जती, हरि व चंचल भारती (हिरा पाटील) हे शिष्यहि राहात असत. पुढें श्रावण शुद्ध १४ बुधवार शके १८४३ मध्यें समस्त कोळी जातीने पंचवीस हजार रुपयें जमवून ह्या मंदिराचा जिर्णोद्धार केला.

## नदीच्या पाण्यावर बद्ध पद्मासन

श्री आनंद भारती महाराजांच्या शिष्यांपैकीं त्यांचे कांहीं ब्राह्मण जातीतील शिष्य नगर जिल्ह्यांतील पारनेर या गांवचें होतें. महाराजांनीं

कांहीं दिवसांकरितां पारनेर मुक्कामीं येऊन आपणांवर अनुग्रह करावा आणि गुरु उपदेश करावा असा त्या शिष्यांनीं महाराजांच्याकडे आग्रह धरला शेवटी एकदां त्या शिष्यांच्या बरोबर महाराज पारनेर मुक्कामी गेलें. तेथें ते रोज प्रात:काळीं आपल्या शिष्यांसमवेत नदीवर जाऊन स्नान करीत पारनेर मुक्कामी महाराजांच्या भजन पूजनांत कधींहि खंड पडत नसें. ते कोठेंहि गेलें असलें तरी आपले नित्यक्रम यथासांग पार पाडीत असत.

पारनेर मुक्कमीं असतांना, एके दिवशीं सर्व शिष्यांसमवेत महाराज नदीवर स्नानासाठीं गेले. तेथें नदीवर स्नान करीत असतां कांहीं ब्राह्मण पाण्यावर उताणे पडून व आडवे पडून पोहण्याचें प्रकार करूं लागलें होतें. महाराजांनीं ते त्यांचे प्रकार पाहिलें आणि स्वत: नदीच्या पाण्यावरून अधातरी चालत जाऊन मध्यभागीं पाण्यावर 'बद्ध पद्मासन' घालून पाटांवर बसतात त्याप्रमाणें पाण्यावर अधांतरीं बसलें. महाराजांचा हा अपूर्व सिद्धीचा प्रकार पाहून नदीवर पोहण्यास आलेली सर्व मंडळी दिग्मूढ झाली महाराजांचे अलौकीक सामर्थ्य त्या सर्वांनीं ओळखलें. नदीच्या पात्रातून महाराज बाहेर येतांच सर्वांनीं त्यांचे पाय धरलें आणि त्यांचा कृपा प्रसाद मागितला. महाराजांनी– " असा धरी छंद । जाई तुटोनिया भवंबाध " असा सर्वांना उपदेश केला. जन्ममरणाच्या चौऱ्याऐंशी लक्ष वेळेच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन परमेश्वर चरणांजवळ मुक्ति मिळविण्यासाठीं परमेश्वराच्या नाम संकीर्तनाचा असा एकच छंद धरा, इतर छंदाची कांहींच जरूरी नाहीं, अशा प्रकारें त्यांनीं सर्वांना उपदेश केला. महाराज शिष्य परंपरेच्या विरोधी मताचे होतें. मोठ्या संतमहंतांनीं शिष्य करावेंत, आपणास शिष्य कशाला, असे ते म्हणत असत. पण तरीहि–

**" नलगे मुक्ति धनसंपदा ।**
**साधुसंग देगा सदा ॥**

अशीच त्यांची वृत्ति होती. त्यांच्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या कोणासही ते उपदेश करीत असत. पारनेरच्या शिष्यमंडळींच्या आग्रहानें महाराज कांही दिवस तेथें राहिलें आणि त्यानंतर ठाण्यास परत फिरलें.



श्रीं दत्तमंदीर, चेंदणी कोळीवाडा ठाणे

## परम शिष्या द्वारकाबाई

सतश्रेष्ठ तुकाराम महाराजांना बायको, मुलें वगैरे सर्व होती. पण ते 'जनहि सारे दिल्या घेतल्याचें' होते, जवळचें असें त्यांना कोणीच नव्हते, म्हणून—

**"तुका म्हणे माझें नव्हतील कोणी ।**
**तुज चक्रपाणी वांचूनिया ॥"**

असें म्हणून ते पांडूरंगालाच शरण गेलें. द्वारकाबाईना पण जवळचें असें कोणी नव्हतें, म्हणून त्यांनीं परमेश्वराला जवळ केलें.

द्वारकाबाईना त्यांच्या बालपणापासूनच भजन--पूजनाचा नाद लागला होता. त्यांच्या बालपणांतच त्यांचें लग्न झालें. पण लग्न झाल्या-नंतर दुर्दैवानें एक वर्षातच त्यांचा नवरा समुद्रांत दुरच्या सफरीला गेला असतां बुडून मरण पावला. त्यामुळें त्यांच्या दुःखी—दुर्दैवी जिवाला परमे-श्वराशिवाय अन्य ठिकाणीं गोडी वाटेना. त्याचवेळीं श्री आनंद भारती महाराज आपल्या शिष्यांकरवीं श्रीदत्तमंदिर बांधून त्या मंदिरांत राहात होतें. त्यांना द्वारकाबाईनीं गुरू मानलें. त्या रोज प्रातःकाळीं ऊठून श्रीदत्त-मंदिराची आंतील व बाहेरची जागा झाडून स्वच्छ करीत. त्यानंतर स्नान-संध्या उरकून पूजा—अर्चा करीत. त्या अतिशय सोवळ्यानें राहात असत. त्यांच्या अंगावर नेहमी पांढरी वस्त्रे असत. त्यांची बहुतेक सर्व वेळ भजन-पूजनांत जात असे त्यांचीं वृत्ति अत्यंत परोपकारी असून नेहमीं दानधर्म करण्याकडे त्यांचा ओढा असें. द्वारकाबाईनी त्र्यंबकेश्वर, नाशिक, म्हाळूंगे पंढरपूर, अक्कलकोट, आळंदी वगैरे ठिकाणच्या यात्रा केल्या होत्या. द्वार-काबाईचे देहावसान त्यांच्या वार्धक्यांत सन १९४३ मध्यें वयाच्या ५५ व्या वर्षीं झाले. महाराजांनीं सन१९०१ मध्यें समाधी घेऊन आपले जीवितकार्य संपविले. त्यानंतर द्वारकाबाई रोज श्री लक्ष्मीनारायण मंदिरांत जाऊन महाराजांच्या समाधीचें दर्शन घेऊन येंत असत.

## बुधाजी भक्त

बुधाजी अप्पा सधन कुटुंबांत जन्मलें होते. त्यांचे बालपण सुखांत गेलें होतें. त्यांचे पुढें लग्न झालें, पण त्यांचा पहिलाच मुलगा दुर्दैवाने

काळानें ओढून नेला, त्यानंतर त्यांचे संसारांतील लक्ष उडालें आणि ते भक्तिमार्गास लागलें आणि–

**" तुका म्हणे नाहीं जाणत आणिक ।**
**तुजविण एक पांडुरंगा ॥"**

अशीच त्यांची स्थिती झाली. बुधाजी अप्पांना पांडुरंगा खेरीज जवळचें आणि मायेचें असें दुसरे कोणीच राहिले नव्हतें. द्वारकाबाईच्या प्रमाणेंच त्यांनाहि परमेश्वराच्या भक्तीचें वेड लागलें. श्री आनंद भारती महाराजांचे अलौकिकत्व पाहून बुधाजी भक्तांनी त्यांचे शिष्यत्व पत्करलें. द्वारकाबाई ज्या वेळीं महाराजांच्याकडे आल्या, त्याच वेळीं बुधाजी महाराजांच्याकडे आलें आणि श्री दत्तमदिरांत राहू लागलें. बुधाजी अत्यंत साधे–भोळे आणि श्रद्धाळु गृहस्थ होतें. सर्व दिवस भजन पूजनांत आणि महाराजांची सेवा करण्यात ते घालवित असत.

**" हा संसार हीं निःसार ।**
**एक दिन मातीला मिळणार ॥"**

म्हणून महाराजांनीं आपल्या निर्वाणीच्या वेळीं बुधाजींना उपदेश केला आणि ते म्हणालें कीं, म्हणून प्रत्येकानें परमेश्वराचें अहोरात्र चिंतन केले पाहिजे, त्याला शरण गेलें पाहिजे, पापी वृत्ति सोडून माणसानें आयुप्यांत सत्कृत्यें करून पुण्यसंचय केला पाहिजे. श्री आनंदभारती महाराजासारखें सद्‌गुरू लाभल्यानें आपलें जीवन कृतार्थ झालें आहे, असें बुधाजी नेहमी म्हणत असत. पुढें सन् १९३६ मध्यें त्यानीं रामनाम घेत घेतच देह ठेविला. बुधाजी भक्तांनींहि पुष्कळ तीर्थयात्रा केल्या होत्या.

## महाराजांचें काशीविश्वेश्वरासह ठाण्यास दर्शन.

द्वारकाबाईनीं पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. पण एकदां काशीस जाऊन काशी विश्वेश्वराची यात्रा करून यावी, अशी त्यांची दृढ इच्छा होती. त्यांनीं सहज बोलतां बोलतां एकदां महाराजांच्या जवळ काशीयात्रेची गोष्ट काढली. महाराजांनी मोठ्या आंनदानें आपली संमत्ती देऊन त्यांना जाण्याची तयारी करण्यास सांगितलें. त्यानंतर एके दिवशीं आपलें सद्‌गुरू श्रीस्वामीसमर्थ महाराज यांची मनोभावें प्रार्थना करून आणि आपल्या भक्त

ठाणे, ग्रंथसंग्रहालय
वि:
नों: दि:



बुधाजी, महाराज आणि द्वारकाबाई

मंडळींचा निरोप घेऊन महाराज परम शिष्या हरिभक्त परायण द्वारकाबाई सह आपल्या इतर शिष्यासमवेत श्रीकाशी विश्वेश्वरास गेलें. सर्व भक्त मंडळींनी आणि शिष्यांनीं महाराजांना मोठ्या प्रेमाने निरोप दिला आणि त्यांना लौकर परत येण्याविषयीं विनंती केली.

पण श्रीकाशी विश्वेश्वरास जाऊन पुढें बरेच दिवस झालें तरी महाराज व इतर शिष्य परत आलें नाहींत त्यामुळें ठाण्यांतील त्यांची भक्त मंडळी बेचैन झाली. त्यांना काळजी वाटूं लागली. परतु ही काळजी दुबळीच होती. संतमहंताची ख्याली–खुशालीची काळजीं सामान्य माणसांनीं–पामरांनी तीं काय करायची ? ज्यांनीं आपला सर्व भार परमेश्वरावर सोपविला आहे, त्यांचा संपूर्ण भार वाहाण्यास तो परमेश्वरच समर्थ असतो. पण इकडे ही भक्तमंडळी महाराजांच्या काळजींत होती, तर तिकडे मात्र महाराजांना श्री क्षेत्र काशीमधून लौकर परतावेंसे वाटेना. खरेंच आहे, संत नामदेवांनीं सुद्धा म्हटलें आहें.

**“ नामा म्हणे विठोबा दीनाचें माहेर ।**
**सदा पंढरपुर गाऊं गीतीं॥**

माहेरीं आलेल्या सासुरवासिणीला जसें माहेर लौकर सोडावेसें वाटत नाहीं. तसेंच पांडुरगाच्या पंढरपुरला–

**वाट पाहे उभा भेटीची आवडी ।**
**कृपाळु तांतडी उतावीळ ॥”**

अशा त्या दीनवत्सल पांडुरंगाला भेटावयास गेलेल्या भक्तांना पण तेथून लौकर परतावेंसे वाटत नाहीं ! महाराजांचेंहि तसेंच झालें; त्यांना श्रीकाशी-विश्वेश्वराच्या भेटीनंतर लौकर परतावेसेंच वाटेना.

पुढें एके दिवशी, बहुतेक, गुरुवारच असावा तो. सर्व भक्तमंडळी ठाण्याच्या श्रीदत्तमंदिरांत रात्रीं भजनास बसली होती. भजन रात्रीं बारा वाजतां संपलें.

**“ तुका म्हणे आतां उदार तूं होई ।**
**मन ठेवी पायीं संताचिया ॥”**

म्हणून भजनमंडळींनीं आत्मियतेने शेवटीं मागणें मागितलें आणि समोर हात जोडलें तो . . . श्रीकाशीविश्वेश्वराची मूर्ति समोर असून मूर्तीच्या

बाजूस महाराज हात जोडून बसले असून द्वारकाबाईहि बाजूस असल्याचें दृष्य सर्वांना दिसलें . . . सर्वांनीं तो दैवी चमत्कार पाहून लोटांगणें घातली. श्री काशीविश्वेश्वराचें दर्शन झाल्यानें प्रत्येक जण स्वत:ला धन्य समजूं लागला.

त्यानंतर पुढील गुरुवारीं महाराज परम शिष्या द्वारकाबाई व इतर शिष्यांसह श्री काशीविश्वेश्वराहून परत आले. सर्व भक्तमंडळींना परम आनंद झाला. त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं श्रीदत्तमंदिरांत श्री काशीविश्वेश्वरासह महाराजांचें दर्शन झाल्याचें महाराजांना सांगितलें, तेंव्हां ती श्रीसद्गुरूंचीच कृपा असे महाराज म्हणालें. सर्व भक्तमंडळींना महाराज काशीस असतां इकडे ठाण्याच्या श्रीदत्तमंदिरांत श्रीकाशीविश्वेश्वरासह महाराजांचें दर्शन घडल्याची बातमी सर्व ठाण्यामध्यें पसरली, त्यामुळें अधिकाधिक लोक श्रीदत्तमंदिराकडें येऊं लागलें. आणि श्रीदत्तमंदिरांत भजनें अगदी जोरांत रंगूं लागली. ते पाहून महाराजांना आनंद झाला.

## नाम सप्ताह महाप्रसादाची अपूर्वाई

श्री आनंदभारती महाराज ठाण्याच्या श्रीदत्तमंदिरांतच राहात असल्यामुळें श्रीदत्तमंदिरांत दिनरात्र भजनपूजनादि कार्ये चालत असत. आषाढी एकादशीचा नाम सप्ताह, मार्गशीर्ष शु. ६ चंपाषष्ठी उत्सव, मार्गशीर्ष शु. १५ ची श्रीदत्तजयंती वगैरे धार्मिक उत्सव, ह्या मंदिरांत होत असत. महाराजांच्या शिष्य मंडळीमध्यें द्वारकाबाई प्रमाणेंच श्रीमती सखुबाई (सखी), श्रीमती देवकीबाई आणि श्रीमती पोशीबाई सखाराम ह्यांना पण महाराजांचें शिष्यत्व लाभलेलें होतें.

आषाढ महिना सुरूं झाला होता. एकदां दुपारीं त्या भगिनींनीं विचार केला, आतां चार दिवसांवर आषाढी एकादशी आली आहे, चालूं वर्षापासून प्रत्येक नामसप्ताहाच्या शेवटीं एक दोन दिवस अगोदर शिधासामुग्री जमवून सर्वांना महाप्रसाद करावा, नाम सप्ताह होईल आणि चार गरीब लोकांच्या मुखांत अन्नहि पडेल. अन्न म्हणजे साक्षात् परब्रम्ह ! ह्या परब्रम्हाची स्वत:स आणि दुसऱ्यांना प्राप्ती करून देणें, ह्या सारखें

१५२९७

पुण्यकृत्य नाहीं. नेहमीच्या शंभर–दिडशें शिष्य मंडळीनेंच जेवण करण्याचें त्यांनीं ठरविलें.

अखेर सर्व तयारी झाली आणि तो आषाढी एकादशीचा दिवस पण उजाडला. जेवणाच्या वेळीं ठरल्याप्रमाणें शंभर–दिडशें लोकांचा स्वयंपाक तयार झाला. पण श्रीदत्तमंदीरांत नामसप्ताहानिमित्त भोजन आहे, हे कळ" ताच गांवांतील पांच–सातशें लोक जेवणाच्या वेळीं त्या ठिकाणीं जमा झालें. किती तरी गोरगरीब लोक आणि आंधळे–पांगळे, भिकारी त्या ठिकाणीं जमा झालें होतें. श्रीसत्यनारायणाच्या प्रसादा एवढें जरी भोजन प्रत्येकांस वांटायाचे म्हटलें तरी केलेला स्वयंपाक तेवढ्या लोकांना पुरणें अशक्य होतें. त्यामुळें पांच–सातशें लोक जमलेलें बघून श्रीमती सखुबाई, देवकीबाई आणि पोशीबाई यांच्या तोंडचे पाणीच पळालें. आतां ह्या लोकाच्या जेवणाची सोय कशी काय करायची, ह्या विवंचनेंत त्या पडल्या. त्या सर्वजणीं मिळून महाराजांच्याकडें गेल्या आणि त्यांनीं ह्या विवचनेंतून मार्ग काढण्यास महाराजांची विणवणी केली. महाराज थोडावेळ ध्यानस्थ बसलें. महाराजांनीं देवकीबाईना जाऊन तुळशीची पानें आणून ती केलेल्या स्वयंपाकाच्या भांड्यांत टाकण्यास सांगितली आणि जेवणाच्या पंक्ति वाढण्यास लोकांना सांगितलें. त्या तुळशीची पानें घेऊन आल्या आणि महाराजांच्या आज्ञेनुसार त्यांनी तीं तयार असलेल्या जेवणाच्या भांड्यांत टाकली. त्यानंतर त्यांच्या शिष्यांनी जेवणाच्या पंक्ति वाढण्यास सुरू केल्या. जेवढें. लोक जेवून जायचें, तेंवढेंच लोक पुन्हां यायचें. दुपारीं बारा वाजल्यापासून रात्रींपर्यंत हजारोंनीं लोक अगदी यथेच्छ पोटभरून जेवलें, त्यांना तो शंभर दिडशें लोकांकरितां तयार केलेला स्वयंपाक पुरला आणि तरीहि शिल्लक राहिला.

हजारोंनीं लोक जेवून गेलें, एवढें अन्न तरी कोठून आलें? ते शिजवलें तरी कधीं? एवढ्या लोकांना ते पुरलें तरी कसें? ह्या गोष्टीचा विचार करीत थक्क होऊन लोक आपापल्या घरी गेलें. महाराजांच्या सर्व शिष्य-मंडळीना तर पांडवांच्या बारा वर्षांच्या वनवासांत त्यांचें सत्त्वहरण करण्यास दुर्योधनाच्या सांगण्यानें आपल्या सहस्त्र शिष्यांसह जेवणास गेलेल्या दुर्वास-ऋषींनां फक्त द्रौपदीच्या थाळींतील एकच भाजीचें पान स्वतः खावून

दुर्वासांना त्यांच्या शिष्यांसह जेवण्यापूर्वीच इच्छातृप्त भोजनाचें समाधान देणारा श्रीकृष्ण श्री सद्गुरू आनंद भारती महाराजांच्याजागी दिसूं लागला!

ज्या परमेश्वरानें एकनाथासाठीं गंगानदीच्या कावडी स्वतःच्या खांद्यावरून वाहिल्या– कबीराचें शेलें विणून त्याच्या घड्याहि घातल्या– सांवता माळ्याच्या शेतांतील भाजी खुडून त्याच्या जुड्या बांधल्या– नरसी मेहतांच्या हुंड्या पटविण्यासाठीं गड्याचें काम केलें– चंद्रभागेमध्यें जनाबाईची लुगडीं धुतलीं– चोखा मेळ्याचीं ढोरें ओढलीं . . . तो . . . तो परमेश्वर अशा प्रसंगी डोळें झांकून कसा बसेल? म्हणूनच तो दयाघन श्रीआनंद भारती महाराजांच्या हांकेला धांवत आला आणि त्यानेंच हा . . . अपूर्वाईचा सोहळा साजरा केला, म्हणून म्हटलें पाहिजे . . . .

**हेंचि दान देगा देवा ।**
**तुझा विसर न व्हावा ॥**

## श्री गुरुलिलामृत कर्ते गोपाळराव विद्वांस

श्रीसद्गुरु आनंदभारती महाराजांच्या कृपेनें आणि त्यांच्याच मार्गदर्शनानें 'श्री गुरुचरित्रा' वरुन ज्यांनीं 'श्रीगुरुलीलामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला, ते श्री गोपाळराव महादेव विद्वांस हे पुण्यांतील एक विद्वान धार्मिक ब्राम्हण होतें. पुराणांतरीं प्रसिद्ध असलेल्या परशुराम ऋषींची तपोभूमि जी, 'श्री परशुराम क्षेत्र' म्हणून सांगितली जातें, त्या भूमीतील हे विद्वांस घराणें सुप्रसिद्ध होय. परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली आणि भगवान् श्रीविष्णूंनीं आठवा अवतार श्रीरामाचा घेतल्यानंतर त्यांना आपली सर्व शस्त्रे, अस्त्रें आणि आपला मंगलदायक आशीर्वाद देऊन परशुराम केळशीं ( सध्यां रत्नागिरी जिल्हयांत समुद्र किनारीं असलेल्या ) ह्या गांवीं आलें आणि तीच आपली तपोभूमि म्हणून निवडून ते त्या ठिकाणीं तप करीत ध्यानस्थ होऊन बसलें. हे परशुराम क्षेत्र उर्फ केळशी गांव होय. गोपाळरावांचें विद्वांस घराणें मूळचें इथलेंच.

गोपाळराव विद्वांसांच्या प्रसिद्ध घराण्याच्या तिसऱ्या पुरुषांस तत्कालीन पेशव्यानीं केळशी गांवचें सुप्रसिद्ध वेदशास्त्रपारगत वैदिक ब्राम्हण म्हणून आपल्या दरबारीं पुण्यांस आणलें. श्रीमंत पेशव्यांनीं विद्वांसांना



‘श्री गुरुलीलामृत’ कर्ते गोपाळराव विद्वांस

आपल्या दरबारांत मोठी मानाची जागा देऊन शास्त्र पुराणांच्या संशोधनांचें आणि धार्मिक प्रकारचे कार्य त्यांच्या हातीं सोपविलें. त्यांच्या पुढील पिढ्यांचीं उपज–निपज पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरींच झाली. गोपाळ-रावांचें वडिल महादेवराव विद्वांस स्वतःच्या कर्तबगारीवर एग्झिक्युटिव्ह इंजिनियर झालें पुढें गोपाळरावहि पब्लिक वर्क्स डिपॉर्टमेंट मध्यें ओव्हरसियर झालें. त्यांचें वडिल आणि ते स्वतःहि पण आपल्या मनमिळावू प्रेमळ स्वभा-वामुळें आपापल्या व्यवसायाच्या ठिकाणीं लोकप्रिय झालें होतें. दोघांहि पिता–पुत्रांना सामाजिक आणि धार्मिक कार्यांची मनापासून आवड होती. कोण्या मोठ्या सद्गुरूंची आपल्यावर कृपा व्हावी आणि आपलें जीवन धन्य व्हावें असें गोपाळरावांच्या सारखें मनांत येई. गोपाळराव सद्गुरुच्या शोधार्थ लागलें. 'साधवो नहि सर्वत्र' म्हणतात, म्हणून अशा सद्गुरुंना शोधावें लागतें. अनुग्रहासाठीं त्यांच्या सेवेला लागावें लागतें; तेव्हां कोठें ते पावन झालें तर व्हायचें.

## श्री आनंद भारती महाराजांची भेट

संतश्रेष्ठ तुकोबाराय म्हणतात–

"बहु अवघड आहे संत भेटी।
परी जगजेठी कृपा केली॥"

संतांच्या भेटीचा लाभ होणें बहुत कठिण. गोपाळ विद्वांसांवर त्या जगजेठींनीं कृपा केलीं, म्हणूनच त्यांना संतांची भेट झाली. परमेश्वर कृपेनें तो जो योगायोग घडून आला तोहि मोठा चमत्कारिक होय !

पुण्यामध्यें सहज एकदां आपल्या कामानिमित्त तें एका सोनाराच्या घरीं गेलें. त्यावेळीं सोनाराच्या घरीं त्यांना श्री आनंदभारती महाराजांचा फोटो दृष्टीस पडला. त्यांनीं कां कोण जाणे एकदम भक्तिभावानें त्या फोटोसमोर जाऊन फोटोस नमस्कार केला. त्या सोनारास त्यांनी महारा-जांची माहिती विचारली. सोनारानीं श्री आनंदभारती महाराज मोठे थोर सिद्धपुरुष असून ते ठाण्यामधील श्री दत्तमंदिरांत असून दिनरात्र परमेश्व-राच्या उपासनेंत दंग असल्याचें सांगितलें. गोपाळराव विद्वांसांनीं त्या सोनारास त्याच रात्रींच्या गाडीनें पुण्याहून निघून ठाण्यास जाण्याची तयारी

करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते दोघे रात्रीं पुण्याहून निघून पहाटेस ठाण्यामध्यें आलें. ठाण्यामध्यें आल्यानंतर ते श्रीदत्तमंदिरांत गेलें. त्यावेळीं महाराज ध्यानस्थ बसलेलें होतें. गोपाळराव विद्वांस आणि सोनार हे दोघेजण महाराजांच्या जवळ जाऊन त्यांचे पाय धरणार तोंच महाराजांनीं उठून त्यांना श्रीदत्तात्रेयांच्या मूर्तीच्या आणि श्रीसद्‌गुरु स्वामीसमर्थ महाराजांच्या पादुकांना वंदन करण्यास सांगितलें. महाराज कोणासहि आपल्या पाया पडूं देत नसत, तरीहि आपणांकडे येणाऱ्या प्रत्येकाची मोठ्या आस्थेवाईकपणें ममतेने चौकशी करून ते त्यांना उपदेश करीत असत. महाराजांनीं गोपाळरावांना आणि त्या सोनारांस पण उपदेश केला.

त्यानंतर गोपाळराव महाराजांच्याकडे वरचेवर येत जात असत. त्यांच्याप्रमाणेंच पुण्याचें कित्येक लोक महाराजांचें भक्त झालें. मध्यंतरी कांहीं काल पुण्याच्या श्रीमार्कंडेश्वराच्या मंदिरांत महाराज जाऊन राहिले. गोपाळराव विद्वांसांचा धर्मग्रथांचा चांगला अभ्यास झालेला होता. तसेंच त्यांना लेखनाची आणि वाचनाची पण अतिशय गोडी लागली होती. गोपाळरावांनीं पुण्यांतील श्रीगणेशोत्सवामध्यें होणाऱ्या मेळ्यांत तत्कालीन इंग्रज सरकारवर टीका असणारी पदें स्वतः लिहून तीं बसविली होती. एकदां ते आपली पदें घेऊन महाराजांच्याकडे गेलें आणि त्यांना त्यांनें तीं वाचून दाखविली. पदें ऐकून झाल्यानंतर महाराज हंसलें आणि म्हणालें "इंग्रजांच्यावर अशा प्रकारची टीका करून तुम्ही रोषास पात्र कां होतां? आज इंग्रज भारतावर सत्ता गाजवताहेत. पण थोड्याच दिवसांत ते निघून जातील. साहित्याचा उपयोग सत्कारनीं करा. उद्यांच्या पिढीसमोर कांहीं तरी उज्वल कल्याणकारी साहित्य ठेवा.

**'रामनाम गर्जे वाचे । काळ आज्ञाधारक त्याचें ।**
**धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी ॥'**

असें आपल्या तुकोबांनीं गाथेंत गायिलें आहे. अशी पदें रचा. रामनामाचा जप करा. त्यांतच तुमचे कल्याण आहे आणि देशाचेंहि कल्याण आहे."

गोपाळराव विद्वांसांनीं महाराजांचा उपदेश शिरसावंद्य मानला. महाराजांच्या ते भजनीं लागलें. आपल्या सरकारी नोकरीनिमित्त त्यांना

वरचेवर पुणें सोडून बाहेरगांवी जावें लागें, तरीहि आठवड्यांतून निदान दोन वेळां तरी महाराजांच्याकडे येऊन त्यांचें दर्शन घेतल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

**देह असो माझा भलतीया ठायीं ।**
**परी चित्त तुझें पायीं पांडुरंगा ॥**

ते सरकारी नोकरी करीत होतें, तरी त्यांची चित्तवृत्ति पांडुरंगाच्या भक्तींनच दंग झाली होती. सद्‌गुरू श्री आनंद भारती महाराजांचा त्यांना कधींच विसर पडत नसें. आपल्या मनाला ते . . . .

**मना तेथें धांव घेंइ । राहे विठ्ठलाचें पायीं ॥**

असेंच वजावित असत.

## श्री स्वामी समर्थांच्या दर्शनास अक्कलकोटास

चैत्र कृष्ण त्रयोदशी शके १८०० मंगळवारीं चतुर्थ प्रहरीं एका वट-वृक्षाखालीं अक्कलकोट येथें श्रीसद्‌गुरू स्वामीसमर्थ महाराजांनीं समाधी घेऊन आपल्या अवतार कार्याची समाप्ती केली. त्यांचें हजारों– लाखों शिष्य आणि भक्त शोक सागरांत बुडून गेलें ! श्रीसद्‌गुरूनीं अनेंक शिष्यांचा उद्धार केला होता.

**अनेक शिष्याप्रति बोधिलें । ते ब्रम्हसुखे निवालें ॥**

त्यांच्या कृपाप्रसादानें जे कांहीं शिष्य ब्रम्हपदाला पोंहचलें होतें, त्यान श्रीआनंदभारती महाराजांचें स्थान अग्रगण्य होतें. श्री आनंदभारती महाराजाना ठाण्यास जेंव्हां श्रीसद्‌गुरूंच्या समाधी गमनाची दुःखद वार्ता समजली, तेव्हां त्यांना अतिशय दुःख झालें. महाराजांना इतकें दु:ख कधींच झालें नव्हतें. आपण श्री सद्‌गुरूंच्या समाधीगमनाच्या वेळी त्यांच्याजवळ हजर नव्हतों याचें महाराजांना फारच वाईट वाटलें.

थोड्याच दिवसांत श्रीआनंद भारती महाराज श्री स्वामी समर्थांच्या समाधीच्या दर्शनास अक्कलकोटला गेलें. ज्या वटवृक्षाखालीं स्वामी समर्थांनीं समाधी घेतली होती, त्या वटवृक्षाखालीं त्यांच्या शिष्यमंडळींनीं एक मठ बांधला होता. त्याठिकाणीं श्रींच्या पादुका ठेविल्या होत्या. महाराज तेंथें येऊन पोंहचतांच ते अगदी एखाद्या लहान मुलासारखें धाय मोकलून रडलें त्यांनीं श्रींच्या पादुकांवर मस्तक ठेविलें.

॥ सद्गुरराये कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांही

ह्या गोष्टीचेंच महाराजांना राहून राहून वाईट वाटत होतें. त्यानतर महाराज तेथें जवळ जवळ सहा महिनें राहिलें. त्याच वटवृक्षाखाली बसून तें आपले भजन–नामस्मरण करीत असत. त्यानंतर पुढें एक दिवस समाधी-जवळ जाऊन श्रीसद्गुरूंची आज्ञा घेऊन ते अक्कलकोटहून परत ठाण्यास आलें. महाराज सहा महिन्यानंतर परत ठाण्यास आल्याचा त्यांच्या भक्त मंडळींना अतिशय आनंद झाला.

## काय सांगो आतां संताचे उपकार

या सुखदु:खांनीं भरलेल्या जगांत सज्जन लोक फारच थोडें आहेत, पण दुर्जन मात्र पावलोपावलीं आढळतात. सज्जनांना दुर्जन बनविण्याच्या नाना कल्पना, नाना प्रकार ते योजित असतात, तर त्या दुर्जनांना सज्जन कसें बनवावें, हीच सज्जनांना एक काळजी लागून राहिलेली असतें.

**असत्य वचन कठारता परस्त्री जोरु समान ।**
**इतने उपर नरक न मिळे तो तुलसीदास जमान ॥**

असें दुर्जनाविषयीं संत तुलसीदास म्हणतात. दुर्जन लोक स्वत:च्या कर्मानेंच नरकवास भोगतात. पण कित्येकदां संतांची निंदा करणाऱ्या ह्या दुर्जनानांहि आपल्या कृतकर्माचा पश्चाताप होतो आणि ते संतांना शरण जातात. अशा वेळीं त्यांचे अनंत अपराध पोटांत घालूनहि त्यांना स्वर्गगति प्राप्त करुन देण्यासाठीं संत धडपडत असतात.

श्रीआनंदभारती महाराजांच्या जीवनचरित्रांतहि किती तरी दुर्जन माणसें येऊन गेली. त्यांचे शिष्य आणि भक्त जरी असंख्य होतें, तरी त्यांची निंदानालस्ती करणारे लोकहि कांहीं थोडेथोडके नव्हतें. पण त्या त्या लोकांना शेवटीं पश्चाताप करावा लागला. आपल्या झाल्या अपराधाची महाराजांच्याजवळ कबुली देऊन महाराजांची क्षमा मागावी लागली. त्यानंतर महाराजांनीं त्यांचें कल्याणच केलें. संतजनांना स्वप्नांतहि कोणाचें कधीं वाईट चिंतितां येत नाहीं, दुसऱ्यांचें सदैव चांगले करण्यांशिवाय त्यांना दुसरे कांहीच करतां येत नाही. द्वारकाबाईना बालपणींच वैधव्य प्राप्त झाल्यानें आणि त्यांना परमेश्वराच्या भक्तीचें वेड असल्यानें त्या श्रीदत्तमंदिरांत बुधाजी भक्ताबरोबरच राहावयास आल्या. त्या रात्रंदिवस महाराजांच्या



महाराजांचे सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज

सेवेंत आणि परमेश्वराच्या नामसंकीर्तनांत असत. त्यामुळें लोकांनीं महाराजांच्या चारित्र्याविषयीं संशय बाळगून त्यांच्यावर नाहीं नाही ते घाणेरडे शितोडें उडविलें पण एखाद्या पापी माणसानें गंगा नदीमध्यें आपली चूळ भरून टाकली म्हणून कां गंगानदीचें पावित्र्य नष्ट होणार आहे?

श्रीआनंदभारती महाराजांची संतत निंदा करणाऱ्या गृहस्थामध्यें आत्माराम कांबळे म्हणून एक भंडारी जातींचे गृहस्थ होतें. विशेष म्हणजे आज महाराजांच्या भक्तापैकीं बहुसंख्य भक्त भंडारी जातीचेंच आहेत. एके दिवशीं त्यांनीं द्वारकाबाई आणिमहाराज यांचे घाणेरडे संबध असल्याच्या अफवा उठविण्यास सुरूवात केली, त्यांबाबतीत त्यांना कांहीं लोकांनी विचारलें, तर ते सांगूं लागलें, ' तो बुवा आणि ती सुस्वरूप जवान बाई रात्रंदिवस एकत्र असतात. ती द्वारकाबाई बाल विधवा झाल्यापासून बुवांकडेंच आहे. त्यांच्या हातून कांहीं पाप घडत नाहीं कशावरून ? ' ज्या दिवशीं हे आत्माराम कांबळे लोकांना आपल्या पापी आणि सडलेल्या मनांतील विचार ऐकवूं लागले. त्याच दिवशीं पुष्कळ लोकांनीं त्यांना तुम्हीं असें बुवांच्या विषयीं घाणेरडे बोलूं नका, तुम्हांला त्याचा पश्चाताप करावा लागेल वगैरे समजुतीच्या गोष्टीं त्यांना सांगून पाहिल्या. पण गाढवापुढें ते गीतापठणच ठरलें.

आत्माराम कांबळे मध्य रेल्वेच्या परेल वर्कशॉपमध्यें काम करीत होते. दुसऱ्या दिवशी नेहमींप्रमाणें सोमवारी सकाळीं ते कामास गेले, पण हजर होतांच मुख्य अधिकाऱ्याच्या शिपायानें त्यांना दुसऱ्या दिवसांपासून नोकरीवरून कमी करण्यांत आल्याचा हुकूम हातीं दिला. मोठ्या दुःखी अंतःकरणानें ते ठाण्यास आपल्या घरीं आलें. आपण उद्यांपासून नोकरीवरून कमी झाल्याची दुःखद बातमी त्यांनीं आपल्या शेजार–पाजाऱ्यांना सांगितली आणि ते रडूं लागलें. शेवटीं त्यांचे एक शेजारीं त्यांना म्हणालें, " तुम्हाला राग येणार नसला तर थोडे स्पष्ट बोलतों. " " बोला, स्पष्ट बोलण्याचा राग कसला " ? आत्मारामपंत त्यांना म्हणालें. शेजाऱ्यानीं सांगितलें, ' आत्मारामपंत तुम्हीं निष्कारण काल त्या देवमाणसावर जे शितोडे उडविले त्याचाच हा परिणाम ! द्वारकाबाई आणि महाराज यांचें

गुरुशिष्याचें पवित्र नाते आहे, त्याला तुम्हीं पातकाची काळोखी फांसली, परमेश्वराला हे कसें पाहावणार ?''

"अहो, पण ते काय खोटें आहे?" आत्मारामांनीं खोडसाळपणें विचारलें. "अजूनहि ते पापी विचार मनांतून काढून टाका आणि दत्ताच्या देवळांत जाऊन महाराजांचे आणि द्वारकाबाईचें पाय धरा आणि त्यांची क्षमा मागा. त्यांची कृपा झाली, तर नोकरीवर हजर होण्याचा हुकूम तुमच्या घरीं चालत येईल."

आत्मारामपंत कांबळे यांनीं पुष्कळ विचार केला. आपण महाराजांच्या सत्चारित्र्यावर निष्कारण पापी शितोंडे उडविलें असें त्यांना वाटूं लागलें त्याना पश्चाताप झाला, ते सरळ श्रीदत्तमंदिरांत गेले आणि त्यांनीं महाराजांचें आणि द्वारकाबाईचें पाय धरलें. आणि म्हणालें, " महाराज माझ्यावर दया करा. मी चुकलों आहे, मला क्षमा करा."

" जा, आपली चुक कबूल करुन क्षमा मागतों, त्याला परमेश्वरच क्षमा करून आपल्या हृदयाशी धरतों. मी कसली क्षमा करणार ? " महाराज बोलले.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशीं आत्मारामपंतांच्या हातीं ऑफिसचा लखोटा पोस्टानें येऊन पडला. त्यांना पुन्हां दुसऱ्या दिवसापासून नोकरीवर घेतल्याचें त्यांत लिहिलें होतें. त्यांनीं श्रीदत्तमंदिरांकडें आपलें तोंड फिरविलें आणि हात जोडलें. त्यांच्यावर महाराजांचीच कृपा झाली होती आणि त्यानंतर–

**" हाचि माझा नेम धर्म । मुखीं विठ्ठलाचें नाम ॥**
**हीच माझी उपासना । लागे संताच्या चरणां ॥"**

अशींच त्यांची वृत्ति झाली. रोज सकाळ संध्याकाळ ते श्रीदत्तमंदिरांत जाऊन दत्तात्रेयांच्या मूर्तीचें आणि महाराजांचें दर्शन घेऊ लागलें. सप्ताहांत आणि भजनांत तर हातांत विणा घेऊन अगदी तल्लीन होऊन ते नाचूं लागत. आत्मारामांच्या आत्म्याला राम भेटला, त्यांचें जीवन धन्य झालें.

## दर्यावर रुमाल टाकून पार झालें

नगर जिल्ह्यांतील पारनेर गांवच्या भक्तांप्रमाणेच वसईकडील उत्तनगांडे गांवच्या भक्तांनींहि श्री आनंदभारती महाराजांच्या जवळ

आग्रह धरला. महाराज उत्तनगोंडेस जावयास निघाले; पण दर्यापार करण्यास जवळ होडगे वगैरे कांहीं साधन नव्हतें. शेवटी महाराजांनीं आपल्या डोक्यास बांधलेला रुमाल सोडला आणि तो दर्यावर टाकला. तो रुमाल दर्यावर होडग्याप्रमाणें तरंगू लागला. महाराज त्यावर जाऊन बसले. रुमालानें पैलतीराकडे आपोआप कूच केलें. आजूबाजूच्या लोकांनीं तो अपूर्व सिद्धीचा प्रकार पाहून विस्मयानें तोंडांत बोटें घातली आणि एकमुखानें महाराजांचा जयजयकार केला.

महाराज सुखरुपपणें पैलतीरांस त्या रुमालावरुन जाऊन पोहचले. त्यानीं रुमाल उचलला आणि पूर्ववत डोक्यास गुंडाळला. उत्तनगोंडें येथील लोकांनीं मोठ्या आग्रहाने–प्रेमाने महाराजांना चार दिवस ठेवून घेतले. महाराजांनीं त्यांना पुष्कळ उपदेश केला–

" माणसाला नरदेहाची प्राप्ती चौऱ्याऐंशी लक्ष वेळेनंतर एकदांच होत असतें. पण ज्याच्या कृपेनें माणसाला नरजन्म लाभतो, त्या परमेश्वराला मात्र माणूस विसरतो. माणसाचें पूर्ववय म्हणजे बालपण शिक्षणात जातें, खेळण्यांत जातें, तसेंच उनाडक्या पण करण्यांत जातें. तरुणपण उद्योगधद्यांत जाऊन संसाराच्या मायेच्या पाशांत मनुष्य बद्ध होतो, त्यानंतर वार्धक्यांत मुलाबाळांच्या कौतुकांत आणि सुखसोहळ्यात माणूस दंग असतो. अगदी मरणाची अखेरची घडींहि आपल्या इस्टेटीच्या वांटणींत आणि निरोप घेण्यांत जातें. आणि परमेश्वराचें नांव घ्यायचें राहून जातें. म्हणूनच माणसानें नामस्मरण करीत राहिले पाहिजे. ज्या नामाच्या प्रभावानें वाल्या कोळ्याचा महर्षि वाल्मिकीं झाला. त्या नामाचा प्रभाव कां थोडा–थोडका आहे ? या जन्ममरणांच्या फेऱ्यांत मुक्ति मिळवायची असेल तर सदा-सर्वदा नामच जपलें पाहिजे.

**नामाविण कांहीं जगीं थोर नाहीं । चारी मुक्ति देई नाममात्र ॥**

## तुझा विसर न व्हावा

**' हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥'**

परमेश्वराला प्रसन्न करून घेऊन माणसानें परमेश्वराजवळ काय मागावयाचें असेल तर ते हेच कीं, परमेश्वराच्या नामसंकीर्तनाचा माणसाला

विसर पडूं नये. श्री आनंदभारती महाराज आपल्या भक्तमंडळींना हाच उपदेश करीत असत. श्रीदत्तमंदिरांत आणि इतर कुठें भजन असलें कीं, महाराज 'हेचि दान देगा देवा' हा संतश्रेष्ठ तुकोबारायांचा अभंग मोठ्या भक्तिभावानें आळवून आळवून म्हणत. महाराजांच्या तोंडून हा अभंग ऐकला कीं, भजनात असणारें कांहीं वर्षेहि हातानें टाळ्या वाजवून 'हेचि दान देगा देवा' म्हणत.

श्रीदत्तमंदिरास एकदां असाच नामसप्ताह चालला होता. नामसप्ताहाच्या अखेरच्या दिवशीं भजनाचा मोठा कार्यक्रम होता. पुष्कळ लोक मंदिरांत जमलें होतें; आजुबाजूचे चांगले भजन म्हणणारे भजनीक जमलें होतें. त्या दिवशीं महाराजांनीं स्वतः रचलेले अनेक अभंग आपल्या गोड आवाजांत गायिलें. त्यापैकीं शेवटचा अभंग गातांना महाराजांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या आणि महाराज ध्यानस्थ झालें. त्यावेळीं श्रीदत्तमंदिराच्या गाभाऱ्यातून 'ग्यानबा तुकाराम – ग्यानबा तुकाराम' हा घोष ऐकूं येऊं लागला. मंदिरांत जमलेल्या भजन मंडळींनीं हा विस्मय–जनक प्रकार पाहून लोटांगणें घातली ! सर्व मडळीं भारावून गेली. सर्वांनीं मोठ्या आवाजांत 'ग्यानबा तुकारामा' चा एकच जल्लोष चालविला. शेवटीं पहांटे भजन संपले. अशा प्रकारच्या अपूर्व भजनामृताची गोडी चाखत मंडळीं आपापल्या घरीं गेलीं खरोखरच–

'पावन ते कुळ । पावन तो देश
जेथे हरिदास । जन्म घेती ॥'

## विद्वांसांना 'श्रीगुरुलीलामृत' लिहावयास सांगितलें

ज्या 'श्रीगुरुलीलामृता' ची रचना श्री आनंद भारती महाराजांनीं गोपाळराव महादेव विद्वांस यांच्याकडून करवून घेतली, त्या ग्रंथाचा मूळ आधारग्रंथ श्रीदत्तभक्तांचा 'गुरुचरित्र' ओवीबद्ध, दीर्घ आणि बहुसंख्य लोकांना समजण्यास कठीण असा आहे. त्या गुरुचरित्रप्रणीत भक्ति सांप्रदादायाचा आबालवृद्धांना दत्त भक्तांना मार्ग आक्रमितां यावा, त्यांच्यामध्यें श्रीगुरुभक्तीची आवड निर्माण होऊन भक्तिमार्गाचा प्रसार व्हावा. या उदात्त हेतूनें महाराजांनीं 'श्रीगुरुलीलामृत' विद्वांसाकरवीं पूर्ण करून

मराठी संतवाङमयाच्या साहित्य-संभारांत एक मोलाची भर घालून फार मोठे आदर्श कार्य केले आहे.

**' शके अठराशें सतरा भीतरीं । श्रावणमास इंदुवासरीं ।**
**कृष्ण चतुर्दशीचें अवसरीं । झाला लेखना आरंभ ॥६॥'**

– श्रीगुरुलीलामृत ( अध्याय एकविसावा )

श्री आनंदभारती महाराजांनीं गोपाळराव महादेव विद्वांस यांचीं विद्वत्ता, धार्मिक ग्रंथांचा अभ्यास आणि भक्तिप्रीतीची तळमळ पाहून त्यांना ' श्रीगुरुचरित्र ' या मूळग्रंथावरून ' श्रीगुरुलीलामृत ' लिहिण्याची प्रेरणा देऊन श्रावण सोमवार कृष्णपक्ष चतुर्दशी शके १८१७ पासून त्यांच्याकडून लिहिवून घेण्यास आरंभ केला. गोपाळराव विद्वांस आपल्या नोकरींतून वेळ काढून ठाण्यास येत आणि श्रीदत्तमंदिरांत महाराज त्यांना लिहावयास सांगत असत. याप्रमाणें विघ्नहर्त्तां गजानन, ब्रम्हा, विष्णु महेश, सद्‌गुरु, संत आणि सज्जन लोक, तसेंच माता-पिता यांच्या नमनाचा पहिला अध्याय पूर्ण झाला. परंतु पुढें गोपाळरावांना त्यांच्या प्रापंचिक अडचणी-मुळे आणि नोकरीतील गांवोगांवीं बदलीच्या सत्रामध्यें पुढें ग्रंथ पहिल्याच अध्यायानंतर तसाच अपूर्ण ठेवावा लागला. अशाप्रकारें सहा वर्षे तशीच निघून गेली.

**' मग अठराशें तेवीस सालीं । श्रावणमासारंभ कालीं**
**ग्रंथ पुनः लाविला चालीं । मोह अथवा निरसोनी ॥(अ२१-९)**

त्यानंतर मात्र विद्वांसांच्या वरील सर्व संकटांचा आणि अडचणींचा परिहार झाला आणि पुन्हां त्यांना महाराजांच्याकडे ग्रंथाच्या पूर्ततेकरितां यावयास मिळूं लागलें. त्यामुळें शके १८२३ च्या पुन्हां श्रावण महिन्यांत ग्रंथलेखनास आरंभ झाला आणि अवघ्या श्रावण, भाद्रपद, आश्विन आणि कार्तिक ह्या चारच महिन्यांत ' श्रीगुरुलीलामृता ' चें पंधरा अध्यायमहारा-जांनीं विद्वांसांच्याकरवीं पूर्ण केलें. " श्रीगुरुलीलामृता " तील पंधरावा अध्याय समाधीयोगावरील आहे. हा अध्याय संपत असतांच महाराजांना आपली अवतार संपविण्याची घटिका जवळ आल्याचें वाटूं लागलें. महाराज सहज एकदां विद्वांसांना म्हणाले, " गोपाळराव, माझें जीवितकार्य आतां संपलें. आतां माझ्या समाधीनंतर हे ग्रंथलेखनाचें कार्य लौकर उरका. "

तेंव्हा विद्वांस बोलले, " पण महाराज आपण समाधीं घेतल्यानंतर मीं हे कार्य कसें उरकून टाकणार ? माझ्यासारख्या पामराला कोण मार्गदर्शक लाभणार ? " महाराजांनी त्यांची समजूत घातली, " तुम्हीं अगदी त्यांबाबतीत निश्चित असा. परमेश्वराच्या कृपेनें ' श्रीगुरूलीलामृत ' लौकर पूर्ण होईल. "

' श्रीगुरुलीलामृता ' चा पंधरावा अध्याय पूर्ण झाल्यानंतर गोपाळराव विद्वांसाचीं बदली अहमदाबादेस आकस्मितपणें झाल्यानें ते तिकडे गेलें आणि पुढें चंपाषष्ठीसच महाराजांनीं देहत्याग केला. त्यांच्या एका स्नेह्यानें गोपाळरावांच्या ऑफिसला तार करुन त्यांना ही दुःखद वार्ता कळविली. तार वाचतांच गोपाळरावांना रडूं कोसळलें. दुःखातिरेकामळें त्यांना जागचें उठवेनाहि. त्याच अवस्थेंत त्यांनीं त्या तारेच्या मागील बाजूस महाराजांची आरती लिहिली आणि तार आपल्या आधिकाऱ्यांना दाखवून रजा घेऊन ते महाराजांच्या अंत्य दर्शनास आणि समाधी बांधून घेण्याच्या उद्देशानें ठाण्यांस आलें. ठाण्यास आल्यानंतर–

**' विवेकें जरी ऐसें वाटे । तरी चित्तवृत्ती पालटे ॥**
**निराधार आपण एकटे । गमे ऐसें गुरुविण ॥'** ( अ. २१-१३ )

अशी त्यांची शोचनीय स्थिति झाली.

## श्री सद्‌गुरूंची अवतार समाप्ती

मार्गशीर्ष शुद्ध पंचमी शके १८२३ सोमवारीं रात्रीं श्री आनंदभारती महाराजांनीं आपल्या सर्व शिष्यांना आणि भक्तमंडळींना बोलाविलें आणि श्रीदत्तमंदिरांत मोठ्या आनंदानें भजन केलें. त्यानंतर सर्व शिष्यांना आपण अवतार समाप्ति करणार असल्याचें सांगून सर्वांचा मोठ्या प्रेमानें निरोप घेतला. त्यानंतर त्यांनीं परमेश्वराची आणि श्रीसद्‌गुरू स्वामी समर्थ महाराजांची प्रार्थना केली, आरती म्हटली, सर्वांना पुन्हां एकदां हात जोडलें आणि महाराज स्वर्गस्थ झालें. सर्व शिष्य आणि भक्तमंडळींनीं रडून एकच आकांत केला. महाराज म्हणजे प्रत्येकाच्या जिवाभावाची एकच वात्सल्यमूर्ति ! आतां यापुढें आपल्यावर जिवापाड प्रेम करणारी श्रीसद्‌गुरूंची मूर्ति आपणास लाभणार नाही, ह्याचें प्रत्येकांस अतोनात दुःख झालें.



- महाराजाचें महानिर्वाण -
बाजूस गोपाळराव ठाणकर आणि द्वारकाबाई.


दुसऱ्या दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध शुद्ध षष्ठी 'चंपाषष्ठी' होती. सर्व भक्त मंडळींनीं हल्लीच्या श्रीदत्तमंदिरासमोर जो स्तंभ (दीपमाळ) आहे, त्या ठिकाणीं महाराजांची समाधी बांधण्याचें ठरविलें. पण ही शुभवार्ता ठाण्यांतील कांहीं नास्तिक मताच्या विघ्नसंतोषी आणि दुष्ट लोकांना समजली. त्यांनीं सर्वांनीं भरवस्तींत श्रीदत्तमंदिरासमोर महाराजांची समाधी बांधू नये म्हणून ताबडतोब हरकत करण्यासंबंधीचा अर्ज त्यावेळच्या ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिला. त्याच सुमारास त्या ठिकाणीं गोपाळराव विद्वांस अहमदाबादेहून आलें होतें. सुदैवानें त्यावेळचे ठाण्याचे जिल्हाअधिकारी गोपाळराव विद्वांस यांचें एका काळचे अधिकारी असल्यामुळें त्यांच्याशीं त्यांचें संबध चांगलें होतें. त्यामुळें ह्या दुष्ट लोकांच्या भानगडीसाठीं गोपाळराव स्वत:, गोपाळराव नाना ठाणकर, नारायण पांडू नाखवा हिरा पाटील (चंचल भारती) वगैरे मंडळींना घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना जाऊन भेटलें. त्यावेळीं जिल्हाधिकारी त्यांना बोलले, "महाराजांसारख्या अवतारी पुरुषाची समाधी श्रीदत्तमंदिरासमोर बांधण्यास तशी कोणतीच कायदेशीर हरकत नाहीं, परंतु ती समाधी त्या ठिकाणी बांधण्यास कांहीं लोकांची हरकत आहे. तरी तुम्हीं तीं त्याठिकाणी कशाला बांधतां ? निष्कारण वादविवाद होऊन भांडणतंटें कशाला होऊं देतां ? त्यापेक्षां दुसरीकडे कोठेहि बांधा." अशाप्रकारे सर्व मंडळींची जिल्हाधिकाऱ्यानीं समजूत घातली.

महाराजांची समाधी कोठें बांधावी ह्या विचारांत ही सर्व मंडळी होती. तोंच श्रीदत्तमंदिरांत महाराजांच्या समाधिस्थ देहाजवळ बसून असलेल्या दोन भंडारी स्त्रियांनीं आपली जागा समाधीस देऊं केलीं. हल्ली नवापाडा ( नौपाडा ) ठाणें येथें जे, श्रीलक्ष्मीनारायण मंदिर' आहे, तेथें त्यावेळीं दाट झाडी होती, आजुबाजूस भाताचीं शेतें होतीं. आसपास कोणीच राहात नव्हतें. त्या स्त्रियांची तेथें जागा होती पण जागा घ्यायची कोणाची ? शेवटी एकशे एक चिठ्ठ्या बनविल्या, एकावर एका बाईचें व दुसऱ्यावर दुसऱ्या बाईचे नांव लिहिलें आणि त्या चिठ्ठ्या दत्तात्रेयाच्या मूर्तीसमोर ठेवून एका लहान मुलास उचलण्यास सांगितलें त्यानें जीं चिठ्ठी प्रथम उचलली. तींवर जमुनाबाई बारे यांचें नांव होतें. त्यामुळें त्यांचीच जागा समाधीस घ्यावयाचें

ठरवून लोक त्या ठिकाणीं गेले. त्यांनीं हल्लीच्या श्रीलक्ष्मीनारायण मंदिरां-तील मूर्तीच्या खालील जागा खणून समाधीकरितां जागा तयार केली. त्यानंतर त्याच दिवशीं चंपाषष्ठीस गोपाळराव विद्वांस, गोपाळराव ठाणकर वगैरे प्रभृतींनीं पुढाकार घेऊन महाराजांचा देह मिरवणुकीनें श्रीदत्तमंदिरां-तून त्या समाधीच्या जागीं आणला. हल्लीं ज्या ठिकाणीं श्रीलक्ष्मीनाराय-णाच्या मूर्ति आहेत त्या ठिकाणीं समाधीसाठीं जागा खणून झाल्यानतर सर्व भक्त मंडळीनीं मोठ्या प्रमाणांत भजन केले, त्या वेळीं गोपाळराव ठाणक-रांनीं महाराजांनीं केलेलें कटाव आणि स्वतः महाराजांच्यावर केलेले अभंग गायिलें. शेवटीं सर्वांनीं मोठ्या भक्तिभावानें महाराजांची आरती म्हटली, तीर्थप्रसाद घेऊन मंडळीं आपापल्या घरीं गेली.

## मूर्ति प्रतिष्ठापनेबद्दल दृष्टान्त

एकदां गोपाळराव विद्वांस, नारायण नाखवा, गोपाळराव ठाणकर व माधवराव गाडगीळांच्या जवळ आपण समाधी घेतल्यानंतर त्या ठिकाणीं श्री लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति आणून त्यांची स्थापना करावी, असें महाराज बोललें होतें. त्याप्रमाणें महाराजांची समाधी बांधून झाल्यावर ही भक्तमंडळीं श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्तीच्या स्थापनेच्या प्रयत्नास लागली. त्याप्रमाणें त्यांनीं मुंबईच्या भुलेश्वर येथील एका प्रसिद्ध मूर्तिकारास श्रीलक्ष्मीनाराय-णाच्या मूर्ति तयार करण्यास सांगितलें. कांहीं दिवसांत मूर्ति तयार झाल्या. पण त्यांची प्रतिष्ठापना करण्याचें बरेंच दिवस तसेंच राहून गेलें. कोण-त्याहि देवाच्या मूर्ति स्थापना करणाऱ्याचा निर्वंश होतो, अशी साधारण एक जुनीं समजूत आहे. त्यामुळें मूर्ति आपल्या हस्ते स्थापिण्यास माधवराव गाडगीळांनीं नकार दिला. गोपाळराव विद्वांसांच्या पत्नी त्यावेळीं गरोदर असल्यामुळें त्यांना पण मूर्तीची स्थापना करतां येणें अशक्य होतें. त्यामुळें मूर्तीची स्थापना कधीं करावयाची ह्याच्याच विचारांत सर्व जण होते. ह्या विचारांत असतांनाच गोपाळरावांना एके दिवशी रात्रीं दृष्टांत झाला आणि महाराजांनीं त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्यास जाऊन पुण्यांतील श्रीमा-र्कंडेश्वराचें मदिरांत जाऊन त्या ठिकाणीं येणाऱ्या काळेशास्त्रींना भेटण्यास सांगितलें.



- श्री आनंद भारती महाराजांची समाधी -
त्यावरील लक्ष्मी नारायणाच्या मूर्ती

त्याच वेळीं पुण्यास काळेशास्त्रींना पण दृष्टान्त झाला आणि दृष्टान्तांत महाराजांनीं त्यांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्रीमार्कंडेश्वराच्या मंदिरांत जाऊन ठाण्याहून येणाऱ्या गोपाळराव विद्वांसांना भेटण्यास सांगितलें. दृष्टान्ताप्रमाणें गोपाळराव विद्वांस ठाण्याहून रात्रीच्या गाडीनें निघून पुण्यास सकाळीं जाऊन पोंहचले. त्यांचीं आणि काळेशास्त्रीं यांची श्रीमार्कंडेश्वराच्या मंदिरांत भेट झाली दोघांनीं परस्परांना दृष्टान्त सांगितलें. त्यानंतर काळेशास्त्री आपल्या हस्तें ठाण्यास महाराजांच्या समाधीच्या जागीं श्री लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति स्थापण्यास तयार झालें. त्याप्रमाणें त्यांनीं एक दोन दिवसांतच ठाण्याला येण्याचें गोपाळराव विद्वांसांना सांगितलें.

## तुम्हीं संत मायबाप कृपावंत

**" तुम्हीं संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति वर्णु ।**
**अवतार तुम्हा धराया कारण । उद्धाराया जन जड जिवा ॥**


श्रीसद्गुरु आनंदभारती महाराजांच्या सारखे थोर संत जगाच्या कल्याणासाठींच जगांत अवतार घेत असतात. त्यांच्या थोरपणाच्या गोष्टीं सांगाव्या तरी किती ? पुण्याचें काळेशास्त्री त्यांचें भक्त कसें बनलें ही पण एक मोठी चत्मकृतिजनक घटना आहे .

काळेशास्त्री यांची घरची परिस्थिती गरीबीची होती. पुण्याच्या श्री ओंकारेश्वराच्या देवळांतते पोथीवाचन करीत असत. भटभिक्षुकीवर त्यांचा ससार चालत असे. त्यांतून त्यांनी पै-पैसा करुन बँकेत आपल्या नांवें अँकौंट उघडून शंभर रुपये डिपॉझिट ठेवले होते. एकदां त्यांच्या पत्नीनें त्यांना न कळत त्या १०० वर आणखी एक शून्य देऊन १०० चें १००० रुपये केलें. पुढें काळेशास्त्री बुक घेऊन बँकेंत पैसें काढावयास गेले. काळेशास्त्रींची ( म्हणजे त्यांच्या पत्नीनें केलेली ) लबाडी बँकेच्या कॅशियरच्या लक्षांत आली. कॅशियरने काळेशास्त्रींची लबाडीं त्यांना दाखवून देऊन त्यांच्या ह्या गुन्ह्याबद्दल त्यांना तुरुंग भोगावा लागणार असल्याची धमकी दिली. काळेशास्त्रींच्या भोळ्या भाबड्या स्वभावामुळें त्यांच्या जिवाचें पाणी झालें त्यांना घाबरलेल्या स्थितींत घरीं आलेलें पाहून त्यांच्या पत्नीनें त्यांना आपण केलेला खरा प्रकार सांगितला. त्यापूर्वी काळेशास्त्रींच्या घरीं श्रीआनंदभारती

महाराजांची तसबीर असून ते त्यांना भजन असत. काळेशास्त्रीनीं महाराजांची मनोमन प्रार्थना करून त्यांना आपणांस सर्व संकटांतून वांचविण्याची पण प्रार्थना केली. सुदैवानें त्यांची एकनिष्ठ भक्तिभावाने केलेली प्रार्थना महाराजांच्या चरणीं रुजू होऊन महाराज त्याना पावलें. दुसऱ्या दिवशीं बँकेच्या मॅनेजरनीं कोणत्याहि प्रकारे कांहीं न बोलतां त्यांची चूकी त्यांना दुरुस्त करावयास लावून त्यांच्या खात्यावरील शंभर रुपये त्यांना देऊन टाकलें. त्या दिवसापासून तर दिवसांतून किती तरी वेळां ते महाराजांची प्रार्थना करीत असत.

## श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्तीची स्थापना

श्रीलक्ष्मी नारायणाच्या मूर्ति तयार झाल्या. काळेशास्त्री त्या मंदिरांत समाधीच्या जागीं स्थापण्यास तयार झाले.परंतु महाराजांच्या ज्या समाधीच्या जागेवर त्या मूर्ति स्थापन करण्याच्या ठरविल्या गेल्या होत्या, त्या जागेवर त्यांची स्थापना करुं नये, म्हणून फार मोठा वाद माजला ठाण्यांतील कित्येक ब्राम्हण मंडळीं, कोळी, भंडारी वगैरे समाजांतील लोकांनींहि त्या ठिकाणी मूर्ति स्थापूं नये म्हणून विरोध केला. लोकाची समजूत पटविण्याकरितां, त्यांना महाराजांच्या अलौकिक थोरवीचें महत्व समजाविण्यासाठीं आणि मूर्ति स्थापिण्याची महाराजांची इच्छा पूर्ण करण्यासाठी गोपाळराव विद्वांसांनी श्री क्षेत्र काशीहून विद्वान ब्राह्मण धर्मपंडितांना बोलावून घेतलें. त्यांनीं सर्व विरोधकांना महाराजांच्या अलौकिक चारित्र्याची थोरवी सांगितली आणि महाराजाच्या समाधीच्या जागीं मूर्ति स्थापिण्यास कोणत्याहि प्रकारची विरोधक मंडळींनीं हरकत न घेतां त्याच ठिकाणीं त्या स्थापन करण्यांत मोठेपणा व गौरव असल्याचें मंडळींनां परोपरीनें पटविलें. सर्व विरोधक मंडळींना आपला अपराध समजून चुकला, त्यांनीं महाराजांच्या समाधीजवळ पश्चातापदग्ध अंतःकरणानें महाराजांची क्षमा मागितली. महाराजांच्या भक्तजणांना आनंद वाटला आणि मग मोठ्या आनंदानें आणि अति उत्साहानें काळेशास्त्रींच्या हस्तें समाधीच्या जागीं श्रीलक्ष्मी नारायणाच्या मूर्ति स्थापिल्या गेल्या. हा आनंदाचा सोहळा मोठ्या आनंदानें आपल्या उघड्या डोळयांनीं महाराजांच्या काशी गाईनें आणि कल्याणी कुत्रीनें पाहिला



श्री लक्ष्मीनारायण मंदीर, नौपाडा, ठाणे

आणि महाराजांच्या समाधीजवळ जाऊन समाधीस भक्तिभावानें वंदन करून त्यांनीं आपल्या देहाचा त्याग केला. मुक जनावरांचीहि महाराजांच्यावरील निःसीम भक्ति पाहून जमलेल्या लोकांचें डोळें पाणावले. त्यांनीं त्यांचीहि महाराजांच्या समाधीसमोरील जागेंतच– कल्याणी कुत्रीची उजव्या बाजूस व काशी गायीची डाव्या बाजूस समाधी बांधली. पुढें लोकांनीं आजुबाजूची झाडी तोडून काढून त्या जागीं मंदिर बांधून काढलें. आज महाराजांची समाधी असलेले हे मंदिर ठाण्यामध्यें "श्रीलक्ष्मी- नारायण मंदिर" म्हणूनच प्रसिद्ध आहे.

## सहानींना घडलेला दृष्टान्त

श्री आनंद भारती महाराजांच्या भक्तगणांत भंडारी जातींतील लोकांप्रमाणेंच अनेक ब्राह्मणमंडळींहि होती. त्यांत ठाण्याचें भास्कर रामकृष्ण सहानी म्हणून एक अत्यंत धार्मिक विनयशील सद्गृहस्थ होतें. ठाण्यांतील श्रीदत्तमंदिरांत जाऊन श्रीदत्तात्रेयांची पूजा–अर्चा, प्रार्थना, महाराजांचें दर्शन वगैरे त्यांचा नित्यक्रम असें. श्रीसद्गुरुंनीं समाधी घेतली, त्यानंतरहि सहानींचा नित्यनियम चालूंच होता. पुढें पुढें ते पहांटे चारचें सुमारास श्रीदत्तमंदिरांत येऊन समोरील पिंपळाच्या पारास प्रदक्षिणा घालत असत.

नेहमीप्रमाणें एकदां भास्कर सहानी पहांटे चाराच्या सुमारास पारास प्रदक्षिणा घालत असतां श्रीदत्तमंदिराकडील बाजूस श्रीआनंद भारती महाराज आपल्या कल्याणी गायीची धार काढीत असलेले सहानींना दिसलें. महाराजांना समाधी घेऊन बरेंच दिवस झालें होतें आणि म्हणून महाराजांचा दृष्टान्त झालेला पाहून सहानी दिग्मूढ झाले, त्यांना कांहींच सुचेना. ते कितीतरी वेळ तसाच विमनस्क अवस्थेत उभें होतें, पण कांहीं वेळानें महाराज आणि त्यांची गायहि तेथून अदृश्य झाल्याचें सहानींना दिसलें. त्यांनीं आपल्या प्रदक्षिणा पूर्ण केल्या आणि मंदिरांत द्वारकाबाई बसल्या होत्या, त्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं द्वारकाबाईना आपणांस घडलेला दृष्टान्त सांगितला. द्वारकाबाई गहिंवरल्या आणि म्हणाल्या, " तुमची अखंड आणि निःसीम भक्ति पाहून प्रसन्न होऊन तुमचा उद्धार करण्यासाठीं परमेश्वर तुमच्याकडे आला होता, तुम्हांस महाराज जेव्हां दिसलें, तेंव्हां तुम्हीं त्यांचें पाय धरलें

असतें तर तुमचें जन्मोजन्मीं कल्याण झालें असतें.आतां काय,वेळ निघून गेली." महानींना पण ह्या गोष्टीचें वाईट वाटलें. महाराजांच्या आशीर्वादानें भास्कर सहानींचें कल्याणच झालें. इहलोकीं सुखसमाधानांत आणि परमेश्वराच्या उपासनेंत काल कंठून ते निजधामीं गेले.

## ह. भ. प. गोपाळराव नाना ठाणकर

'संत तेचि देव-देव तेचि संत' असा संतांचा गौरव केला जातो, तो यथार्थच आहे. संत होऊन गेलें नसतें, तर जगामध्यें परमेश्वर नामसंकीर्तनाची जी आत्यंतिक श्रद्धा निर्माण झाली आहे, ती झाली नसती. दुःखाच्या-संकटाच्या- अडीअडणींच्या वेळीं परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठीं एकनिष्ठेनें प्रार्थना करण्याची तळमळ जगाला लागली नसती. एवढेंच काय पण पाप-अधर्म- अनीतीनें पछाडलेल्या ह्या जगांत संत झालें नसतें, तर परमेश्वराचें अस्तित्वहि कोणी मानलें नसतें- शिल्लक ठेविलें नसतें. संतांनीं केलेल्या ह्या पुण्यकर्मामुळेंच ते देवपदाला पोंहचले- देव झालें. देवाची सत्कीर्ति नांदविण्याचें कार्य जसें संतांनीं केलें, तसेंच ह्या संतांना जगापुढें आणण्याचें- त्यांच्या हातून जगाचा उद्धार घडविण्याचें कार्य त्या संतांना लाभलेल्या सद्भक्तांनीं आणि सत्शिष्यांनींच केलें आहे.

सर्वश्री बाळाप्पा, चोळाप्पा, स्वामीसुत वगैरे सत्शिष्यांनीं ज्याप्रमाणें श्रीस्वामी समर्थ महाराजांचें सत्कार्य, त्यांचा मोठेपणा जगाच्या निदर्शनास आणून त्यांना असंख्य सत्शिष्यांच्या सांप्रदाय मिळवून दिला, त्याप्रमाणें श्री आनंद भारती महाराजांचा मोठेपणा जगाला सांगण्याचें जे सत्कार्य त्यांच्या सद्भक्तांनीं केलें, त्यांत गोपाळराव नाना ठाणकरांनीं केलेलें कार्य अलौकिक होतें.

श्री आनंदभारती महाराज ज्यावेळीं संसारांतून मुक्त होऊन भक्ति-मार्गाकडें वळलें, त्यावेळीं ठाण्यामध्यें श्री चंद्राजी लक्ष्मण नाखवा ह्या प्रतिष्ठित गृहस्थांचें ( गोपाळराव ठाणकराचें श्वसूर ) चिरंजीव श्री. वामन चंद्राजी महाराजाची सद्भक्ति पाहून महाराजांच्या नादीं लागलें. ते त्यावेळीं ठाण्यामधील एक श्रेष्ठ आयुर्वेदतज्ञ म्हणून सुप्रसिद्ध होतें. त्यांना गाई पाळण्याचा मोठा छंद होता. महाराजांकडे असलेली 'काशी' गाय

त्यांच्याकडीलच. महाराजांच्या कृपेनें वामनराव सर्वप्रकारे सुखी होतें. त्यांच्याबरोबर गोपाळराव पण महाराजांच्याकडें जात येत असत. त्यांनांहि महाराजांची कृपा लाभली आणि एक्साईज खात्यांत साधी नोकरी करणारे गोपाळराव ठाणकर पुढे एक्साईज इन्स्पेक्टर झालें. अनेक अडचणींतून व संकटांतून महाराजांच्या कृपेनें ते तरून गेलें, त्यामुळें महाराजांवर त्याची अत्यत श्रद्धा बसली. महाराजांचें ते निःसीम भक्त बनलें. त्याचा गांवांत चांगलाच दरारा होता त्यामुळे त्यांचें महाराजांकडे सतत जाणें–येणें असल्यामुळें अर्थातच महाराजांची निंदा–चेष्टा करणारी कांहीं विरोधक मंडळीं त्यामुळें थड झाली. श्री. गोपाळराव सभ्य– सुशिक्षित लोकांमध्यें प्रतिष्ठित म्हणून मानलें जात असल्यामुळें त्यांच्याबरोबरच सुशिक्षित लोकहि महाराजांचें भक्त बनलें. मॅजिस्ट्रेट गोविंदराव, माधवराव गाडगीळ, बाबुराव उर्फ महादेव रघुनाथ राजे, बापुजी बदलापूरकर, केशवराव काका वगैरे त्यावेळची ठाण्यांतील बडी मंडळींहि गोपाळराव ठाणकर व गोपाळराव विद्वांस यांच्यामुळें महाराजांच्या भक्तमडळींत होती.

गोपाळराव ठाणकर आपल्या नोकरीनिमित्त नेहमीं गांवोगांवीं दुरवर असत, तरीहि अधुनमधून महाराजांचें दर्शन घेऊन जात असत. महाराजांच्या निर्वाणाची तार मिळतांच ते ( त्यावेळीं दोंडामार्ग येथें होते ) आपल्या नोकरीच्या ठिकाणाहून तावडतोब ठाण्यास आलें आणि त्यांनीं पुढील सर्व तयारी केली. महाराजांची समाधी बांधण्यांत गोपाळराव विद्वांसांच्या बरोबरीनें त्यांनीं पुढाकार घेतला होता. सन १९२१ मध्यें ते नोकरीवरून सेवानिवृत झाले. त्यानंतर रोज महाराजांच्या पादुकाची पुजा–अर्चा करण्यांत आणि परमेश्वर चिंतनांत त्यांनीं आपलें उर्वरित आयुष्य घालविले त्यांना लेखनाची अत्यंत आवड होतीं.त्यावेळीं मुंबईहून प्रसिद्ध होत असलेल्या 'कोळी-शिष्ट' मासिकांत त्यांनीं महाराजांच्या चरित्रावर दोन लेखांक लिहून प्रसिद्ध केलें होतें. त्यांचें इतर अभंग, कटाव, कविताहि त्यांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. असें हे महाराजांचें सद्‌भक्त– सत्‌शिष्य गोपाळराव ठाणकर महाराजांचें नामसकीर्तिन करीत करीतच आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षी हृदय क्रीया बंद पडून वैकुंठास गेलें.

—००—

## श्री आनंद भारती समाज

आज ठाण्यामध्यें चेंदणी कोळीवाडा येथें असलेली 'श्री आनंद भारती समाज' ही भव्य इमारत म्हणजे श्री आनंद भारती महाराजाचें ठाण्याच्या कोळी समाजानें उभारलेलें एक थोर दिव्य स्मारकच होय. ही इमारत महाराजांच्या स्मारकाप्रित्यर्थ बांधून कोळी समाजानें महाराजांचेंविषयीं जी नम्र कृतज्ञता व्यक्त केली आहे, ती खरोखर गौरवास्पद अशीच आहे.

समाजोन्नति आणि राष्ट्रोन्नतीनें प्रेरित होऊन ठिकठिकाणीं गांवों-गांवांत संस्था स्थापून त्याकरवीं कार्य करीत राहाण्याची जी क्रांतीची लाट त्यावेळी भारतांत पसरली होती, तिचें लोण ठाण्यांतहि आलें आणि त्यावेळीं सन १९१० मध्ये दगडु पांडु नाखवा, द्वारकानाथ हरि नाखवा, रामभाऊ तनपुरे, गजानन गोविंद नाईक, हरिभाऊ घाणेकर, कारेकर मास्तर वगैरे पुढारी मंडळींनीं एकत्र होऊन ' चेंदणी कोळीवाडा असोसिएशन ' म्हणून एक संस्था स्थापिली. श्री आनंद भारती महाराजांच्या स्मारकाप्रित्यर्थ ह्या संस्थेंसच पुढें सन १९२१ सालीं ' श्री आनंद भारती समाज' असें नामाभिधान दिले गेलें. आणि पुढें १२-१०--१९२८ रोजी इमारत बांधून पूर्ण केली. त्यानंतर पुढें श्री यशवंत लक्ष्मण नाखवा यांनीं स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर व लोकांच्या सहकार्यानें ह्या संस्थेची सर्वप्रकारें भरभराट केली. आज ह्या संस्थेमध्यें भजन, पुस्तकालय, व्यायामशाळा, क्रिकेट, पतपेढी, महिला मंडळ, बँड, देशी खेळ, शुश्रुषा-पथक, मासिक, कला-विकास वगैरे अकरा पोटमंडळे जोरदारपणें कार्य करीत आहेत. ह्या संस्थेंतून आनंद भारती महाराजांच्या कृपेनें अनेकानेक कर्तबगार लोक पुढें येऊन आज विविध क्षेत्रांत अलौकिक कार्य करीत आहेत. दरवर्षी चंपाषष्ठीस आनंद भारती महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव ह्या संस्थेतर्फे फार मोठ्या उत्साहांत व मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो.

—※—

## –: श्री आनंद भारती चरित्र :–

## –: समाप्त :–



महाराजांची अवतार समाप्ति
द्वारकाबाईकडून अंत्यसंस्कार

# ❀ श्री गुरुलीलामृत ❀

## =: संक्षिप्त सार :=

## ❋ अध्याय पाहिला ❋

### --: नमन :--

ऐशी हे योग विभूती । नाम जया आनंद भारती
सदानंदी असे वृत्ती । वास साष्टीमाजीं पैं ॥
तयेंच मना दिधली स्फूर्ती । प्रेमभावें आज्ञापिति
गुरुवर्ये अक्कलकोटीं । लीला दाविली वर्णावया ॥ (अ १-३७)

श्रीआनंदभारती महाराजांच्या प्रेरणेनें आणि स्फूर्तीनेंच गोपाळराव विद्वांस यांनीं ' श्रीगुरुलीलामृत' लिहिलें. जगामध्यें सत्य--अहिंसा- धर्म-नीति नष्ट होऊं लागली, अन्याय--अधर्म फैलावूं लागला कीं, परमेश्वराला सज्ज-नांच्या संरक्षणासाठीं आणि दुर्जनांचें निर्दालन करुन जगाचा उद्धार करण्यासाठीं जगामध्यें अवतार घ्यावें लागतात. त्या सच्चिदानंद परब्रम्ह परमात्म्यानें ' श्रीदत्तावतार ' घेऊन दत्तसांप्रदाय निर्माण करुन आपल्या श्रीदत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती व श्री स्वामी समर्थ ह्या चार अवतारांत जीं लोकोत्तर सत्कृत्यें केलीं आहेत, जगाला जो भक्तीचा मार्ग दाखविला आहे, तो अज्ञ जणांना समजून त्याचें जीवनहि परमेश्वर उपासनेंत सार्थकी लागावें, या उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन 'श्रीगुरुलीलामृत' लिहिले गेलें आहे.

' श्रीगुरुलीलामृत ' चा पहिला अध्याय ' नमनाध्याय ' आहे. ह्या अध्यायामध्यें ग्रंथकर्त्यांनीं देव दैवतांना नमन करुन त्यांचा आशीर्वाद घेतला आहे. श्री गणेश, श्रीसच्चिदानंद, श्रीदत्तगुरु, माता-पिता यांना आदरानें

वंदन करुन लेखकांनी ग्रंथलेखनास आरंभ केला. सुरवातीस सकल सिद्धींचा नायक गणपती- विघ्नहर्ता- मंगलकर्ता गजाननास वंदन केलें. त्यानंतर विश्व-माता आदिशक्ति जी पार्वती तिला वंदन केलें आहे. साक्षात् परब्रम्ह निराकार निर्गुण जो श्रीसच्चिदानंद त्यालाहि वंदन केलें आहे

**सत्व रज तम गुण । मायायोगें झालें तीन**
**तयें झालें ब्रम्ह सगुण । अवतीर्ण त्रिमूर्ती ॥**(अ १-१११)

अशा त्या ब्रम्हा विष्णु महेशाला वंदन केलें आहे. त्यानंतर महर्षि अत्रींची पत्नी महासाध्वी अनुसूयेच्या उदरीं दीनोद्धारासाठीं ज्या त्रिमूर्तींनीं एकरुप होऊन अवतार घेतला. त्या श्रीदत्तगुरुंना भक्तिभावपूर्वक वंदन केलें आहे. त्या श्रीदत्तप्रभूंनीं गाणगापूर येथें श्री नृसिह सरस्वतीचा अवतार घेऊन गाणगापूर पावन केलें आणि अनेक भक्तजणांचा उद्धार केला. पुढें कर्दळी वनांत ते गुप्त झालें आणि त्यानंतर अक्कलकोट येथें श्रीस्वामी समर्थांच्या रुपामध्यें प्रकटलें. त्यांचें सत्शिष्य श्री आनंद भारती महाराज यांच्याच निवेदनावरून विद्वांसांनीं हा ग्रंथ लिहिला. त्यामुळें श्री आनंद भारती महा-राजांची आज्ञा व आशीर्वाद घेऊन लेखकानीं ग्रंथलेखनांस आरंभ केला आहे. त्यानंतर त्यांनीं आपल्या माता-पित्यांना, ज्ञानदेव तुकाराम प्रभृती साधुसंतांना आदरानें वंदन केले आहे आणि श्रीस्वामी समर्थ महाराजांची अक्षय कृपादृष्टि लाभून ग्रंथ पूर्ण व्हावा अशी त्यांची प्रार्थना करून पहिला ‘ नमन-अध्याय ’ पूर्ण केला आहे.

# ❋ अध्याय दुसरा ❋

## श्री दत्तावतार वर्णन

ह्या दुसऱ्या अध्यायामध्यें श्रीदत्तावताराचें लेखकांनी वर्णन केलें आहे. हा अध्याय लिहित असतां गुरु महिमाच्या सामर्थ्यानें विद्वांसांचें डोळे दिपून गेले ! त्यांना पहिला अध्याय पूर्ण झाल्यानंतर पुढें कांहींच लिहावयास जमेना, म्हणून त्यांनीं आपलें सद्गुरू श्रीआनंदभारती महाराज यांना-

**परि तुझिया कृपेविना । कैवि होय पूर्ण कामना**
**तरि ममहस्त धरोनि जाणा । ग्रंथ लिहविला पाहिजे ॥** ( अ.२-३३)

अशी प्रार्थना करून त्यांच्या निवेदनावरून पुढें ग्रंथलेखन सुरू केलें आणि—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
दि: ....4.12..72..

हरिभक्त प्रश्नकर्ता । आनंद भारती निवेदिता
ग्रंथारंभ करितां आतां । निर्भय चित्तें करोनी ॥ (अ २-४०)

विद्वासांनीं प्रश्न विचारावयाचा आणि श्री आनंद भारती महाराजांनीं निवेदन करावयाचें अशा प्रकारें ग्रंथलेखन पुढें चालविले. ज्यावेळीं ही सर्व सृष्टि अस्तित्वात नव्हती, चंद्रसूर्य नव्हतें, पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश ही पचमहाभूतेंहि नव्हती, त्यावेळीं शद्ब– रुप– रस– गंधरहित निर्विकार निर्गुण– निराकार असें शुद्ध सच्चिदानंद सत्व अस्तित्वात होतें. अशा त्या शून्य ठिकाणीं ‘ अहम् ’ असा ध्वनि उठला आणि आदिमाया प्रकट झाली. तिनेंच ते निर्विकार परब्रम्ह सगुण बनविलें आणि त्यांतून श्रीमहाविष्णु प्रकटलें. सत्वगुणानें विष्णुरुप घेतलें. रजोगुणानें ब्रम्हदेवाचे रूप घेतलें आणि तमोगुणानें शिव प्रकटलें. ब्रम्हदेवानें छत्तीस हजार वर्षे महाघोर तप केलें आणि सृष्टिरचनेचें ज्ञान मिळविलें. त्यानंतर त्यांनीं पंचतत्वांपासून पंचमहाभूतें निर्माण केली. त्याच पंचतत्वांपासून त्यांनीं सर्व जिव-जिवाणु निर्माण केले. प्रजोत्पादनासाठीं ब्रम्हदेवाने सनकादि पुत्रांना जन्म दिला, पण ते सर्वजण परमेश्वर चिंतनातच रंगले. त्यानंतर ब्रम्हदेवानें मरिचादि ऋषींना जन्म दिला आणि अशा रीतीने प्रजा वाढू लागली. पण पुढें पाप आणि अधर्मंहि वाढू लागला. त्यामुळें मग परमेश्वराला अवतार घेणें भाग पडलें.

अनसूयेऐशी सती । विरळा आढळे अवनीवरती ।
धन्य धन्य तो काल निश्चितीं । ऐशीं रत्नें जैं होतीं ॥ (अ.२-७६)

अशाप्रकारें अत्रिमुनींचीं पत्नी सति अनुसूयेची कीर्ति स्वर्गातहि पोंहचली. सावित्री, लक्ष्मी, पार्वतीस अनुसूयाच्या पातिवृत्याचा मत्सर वाटला. त्यांनी आपलें पति ब्रम्हा, विष्णु आणि महेश यांना अनुसूयेला व्रतभ्रष्ट करण्यासाठीं पाठविलें. तें तेथें ब्राम्हणाच्य वेषांत अनुसूयेच्या घरीं अत्रिऋषी गंगास्नानास गेल्याचें पाहून प्रभात समयींच प्रकटलें. त्यांनीं तिला नग्न होऊन भोजन वाढण्यास सांगितलें. अनुसूयेनें आपल्या पातिवृत्याच्या प्रभावानें त्यांच्या अंगावर उदक शिंपडून त्यांना लहान बालकाचें रुप दिलें आणि आपलें स्तनपान दिलें. हे वर्तमान नारदमुनींनीं सावित्री, लक्ष्मी व पार्वतीस सांगितलें. त्यांनीं अनुसूयेची क्षमा मागितली. अत्रिमुनींनीं पुन्हां ब्रम्हा,

विष्णु, महेशास आपल्या तपोबलानें पूर्व स्वरुप प्राप्त करुन दिले. त्यानंतर ही त्रिमूर्ति दत्तरूप घेऊन अनुसूयेच्या घरीं अवतरली, येथें हा 'श्रीदत्तावतार वर्णन ' करणारा दुसरा अध्याय समाप्त झाला आहे.

# * अध्याय तिसरा *

## श्रीपाद श्रीवल्लभावतार निरुपण

'श्रीगुरुलीलामृता ' च्या या तिसऱ्या अध्यायांत 'श्रीपाद श्रीवल्लभ ' अवताराचें निरुपण केले आहे. श्रीदत्तगुरुनीं अवतार घेतल्यानंतर दीनोद्धारासाठीं ते भ्रमण करीत करीत पूर्व दिशेस पाठीपूर नामक नगरीत आलें. तेथें राजा नांवाचा एक ब्राम्हण आपल्या पतिव्रता सुमती नांवाच्या स्त्रीसह राहात असें. श्रीदत्ताची उपासना आणि अतिथींची पूजा-अर्चा यांत दोघांचा वेळ जात असें. एकदां अमावस्येच्या दिवशीं त्यांच्या घरी श्राद्ध होतें, त्याच दिवशीं श्रीदत्तात्रेय त्यांच्या घरीं अतिथीच्या वेषांत येऊन भिक्षा मागूं लागलें. ब्राम्हणांची भोजनें व्हायची होतीं, तरी पण सुमतीनें त्यांना जेवू घातलें. श्रीदत्तात्रेय प्रसन्न झालें आणि त्यांनीं तिला वर मागण्यास सांगितलें.

**ममोदरीं जन्म वहिलें । घेई प्रभो दयाळा ॥**

म्हणून तिनें वर मागितला. ' दीनोध्दारक सुपुत्र तुझ्या उदरीं जन्म घेईल,' असा वर देऊन श्रीदत्तात्रेय अंतर्धान पावलें. त्यानतर तिनें घडलेली सर्व हकीकत आपल्या पतीस सांगितलीं. पुढें श्रीदत्तप्रभूनींच त्यांच्या उदरीं ' श्रीपाद ' नांवाने अवतार घेतला.

श्रीपाद सात वर्षांचें झाल्यावर त्यांचें मौजीबंधन झालें, त्यावेळीं वेद, अठरा पुराणें, न्याय, व्याकरण, तर्क वगैरे शास्त्रें त्यांची मुखोद्गत झाली· ते पाहून–

**विस्मय थोर सर्वां जाण । म्हणती हा अवतारी पूर्ण ॥**

विद्वान लोक त्यांना अवतारी पुरूष समजूं लागले. ते सोळा वर्षांचें झाल्यानंतर त्यांचे आईवडील त्यांचे लग्न करण्याचा विचार करु लागलें, पण त्यांनीं आपलें लग्न विरक्तींशीं झालें असून आपणांस ब्रह्मचर्यव्रतानें

पालन करावयाचें असून उत्तरेकडे जावयाचें असल्याचें सांगितलें. म्हातारपणीं आपणांस परमेश्वर कृपेनें लाभलेला आधारहि आपणापासून दूर होणार याचें त्यांच्या आई–वडिलांना अतिशय दुःख झालें. त्यांना दुसरे दोन पुत्र होतें. पण एक आंधळा तर दुसरा पांगळा; शिवाय दोघेंहि मूर्ख. तेंव्हा आईने श्रीपादांच्याजवळ करुणा भाकली, ' बाळा, तूंच आमचा आधार. तूंच आम्हां वृद्ध माता पित्यास सोडून निघून गेलास, तर आमचा सभाळ कोण करणार ?'' मातृहृदयाची करुणा ऐकून श्रीपाद अवतारीं दत्तप्रभु गहिवरले. त्यानीं आंधळ्या भावंडास डोळें दिलें, पांगळ्यास पाय दिलें आणि आपल्या अमृतदृष्टीनें त्यांच्याकडें पाहून त्यांना सर्वशास्त्रांत महाज्ञानी पंडित बनविलें आणि त्यांना मातापित्यांना काळजीपूर्वक पाहण्यास सांगून स्वतः उत्तरेकडे गेलें. उत्तरेंकडे प्रथम काशीस राहून नंतर ते बद्रीवनास गेलें आणि त्यानंतर गोकर्ण क्षेत्राकडे गेलें. येथें हा तिसरा अध्याय समाप्त झाला आहे.

# * अध्याय चौथा *

## अंबिका पूर्वजन्म व प्रदोषव्रत

अबिकेच्या पूर्वजन्माचा इतिहास व ' प्रदोष ' व्रताचें महात्म्य या अध्यायांत कथन केले आहे. श्रीपाद वल्लभ उत्तरेकडे गोकर्ण क्षेत्रीं आल्यानंतर तेथें ते तीन वर्षे गुप्तरुपांतच राहिलें. त्यानंतर ते गिरीवर चार महिनें राहून पुढें निवृत्ति संगमाच्या स्थळीं गेलें. तेथून दीन जनांच्या उद्धारार्थ त्यांना दक्षिणेस कृष्णातीरावरील कुरवपुरी नगरांत यावें लागलें. तेथें एक वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हण पंडित राहात होतें, त्याची पत्नी अंबिका ही महान पतिव्रता स्त्री होती. आपल्या पतीच्या सेवेंत आणि भक्तीत तिनें आपलें सर्व जीवन वेंचलें होतें. तिला पुष्कळ पुत्र झालें, पण ते मरण पावलें. त्यामुळें तिचें मन सदैव दुःखी कष्टी होते. पुढें काहीं दिवसानंतर तिला एक पुत्र झाला. पण तो बुद्धिहीन असा गोळा होता, तेव्हां अशा पुत्रापेक्षां आपण निपुत्रिक राहिलो असतों तर बरे झालें असतें, असें अंबिकेला वाटू लागलें. सातव्या वर्षी पुत्राचा व्रतबंध केला. पण अभ्यासांत त्याची बुद्धी चालेना. पित्यानें अध्यापनासाठीं पुष्कळ प्रयत्न केलें, पण त्या मंदबुद्धीपुढें कांहीं

उपाय चालेना. तो दु:खी दुर्दैवी ब्राम्हण पुत्राला पत्नीच्या स्वाधीन करून निजधामाला गेला. तो मदबुद्धि पुत्र भिक्षेसाठीं आळोआळीं फिरूं लागला. पण लोक त्याच्या मंदबुद्धीची चेष्टा करूं लागले, पोटाला कोठे अन्नहि मिळेना. शेवटीं तो आपल्या मातेकडे गेला व यापुढें आपणांस जगामध्यें जगणें अशक्य असून आपण गंगा नदीमध्यें जलसमाधी घ्यावयास चाललों आहों, असें त्यानें सांगितलें. माताहि त्याच्याबरोबर जलसमाधी घेण्यास गंगेवर आली. इतक्यांत काय चमत्कार झाला, श्रीपादवल्लभ यतीश्वर त्या ठिकाणीं स्नानास प्रकटले. अंबिकेने त्यांचें पाय धरलें आणि आत्महत्त्येच्या पातकांतून आपली मुक्तता करण्यांस सांगितलें. श्रीपाद वल्लभ प्रसन्न झालें. त्यांनीं वर मागण्यास सांगितलें, तेव्हां अंबिकेनें—

**ऐसा व्हावा पुत्र सुगुणी । देई गती पितरांसी ॥**

असा वर मागितला स्वामीनीं तिला प्रदोष व्रत करुन शंकराची उपासना करण्यास सांगितलें. प्रदोष व्रत शनिदेवाचें व शंकराचें असून त्यायोगे सर्व संकटें नाश पावतात, असें स्वामींनीं तिला सांगितलें.

उज्जयनीचा राजा चद्रसेन यानें आपण सकटांतून मुक्त व्हावें म्हणून एकदां प्रदोष पूजा चालविली होती. त्या ठिकाणीं एक गोपी आपल्या पांच वर्षाच्या मुलाला घेऊन आली. मुल पूजा कौतुकानें पाहूं लागलें. त्यानंतर त्या गोपीच्या मुलानें घरी आल्यानंतर पाषाणालाच लिंग समजून आणि मातीलाच गंध-फुलें समजून शंकराची पूजा चालू केली. त्याची आई त्यास जेवणासाठीं बोलावूं लागली, पण ते उठेना. त्यांच्या आईनें पूजा मोडून फेकून दिली, तें पाहातांच त्या मुलास मुर्च्छा आली. तात्काळ त्या ठिकाणीं भगवान श्रीशंकर प्रकट झालें आणि त्यांनीं त्या बालकास—

**तुज देतो वरदान । होसी महा भाग्यवान**
**तुझे कुळी श्रीभगवान । महाविष्णु अवतरेल ॥** (अ. ४-१०७)

असा आशीर्वाद दिला. त्या पूजास्थानीं शिवालय दिसूं लागलें. ती जीर्ण-शीर्ण झोंपडीं सोन्याची होऊन धनधान्यांनीं सजली. त्या गोपीस भगवानांनीं दर्शन दिलें. तिनें परमेश्वराची माफी मागितली. श्रीभगवान आशीर्वाद देऊन अंतर्धान पावलें.

अशाप्रकारें श्रीपादवल्लभांनीं अंबिकेस प्रदोषव्रताचा महिमा सांगून पूजाविधीहि सांगितला आणि तिच्या मूर्ख पुत्राच्या शिरावर आपला वरद-हस्त ठेवून त्यास वेदशास्त्रसंपन्न केले. पुढें त्याचा विवाह होऊन सर्व सुखें त्यास लाभली. पुत्र पौत्रादि सर्व ऐश्वर्याचा उपभोग घेऊन पुढें तो मोक्षपदास पोहचला या ठिकाणीं चतुर्थ अध्याय संपलेला आहे.

# * अध्याय पांचवा *

## श्री नृसिंहसरस्वती अवतार

**गुरु प्रत्यक्ष परब्रम्ह । गुरु दयेचा आश्रम**
**गुरु महिमा अगाध परम । न कळे ठाव ब्रम्हादिकां ॥**(अ. ५-७)

श्री आनंदभारती महाराजांना गोपाळराव विद्वांसांनीं श्रीपादवल्लभाचें पुढील वृत्त कथन करण्याची प्रार्थना केल्यानंतर महाराज पुढें सांगू लागले. श्रीपादवल्लभ कुरवपुरीं गुप्तरुपानें राहात असत, तरीहि आपल्या भक्तांच्या अडीअडचणींच्या प्रसंगीं ते प्रकट होत असत. त्यांनीं प्रदोषव्रताचा महिमा व पूजा विधी अंबिकेस सांगितल्यापासून त्या व्रताचा महिमा वाढू लागला. त्यांना भक्तहि चांगले मिळालें, परंतु त्यांची अवतारमर्यादा संपली. त्यानंतर कुरवपूरांत ते गुप्त झालें. त्यांनीं अंबिकेला पुढील जन्मी तिच्या उदरीं प्रत्यक्ष परमेश्वर अवतार घेईल म्हणून वचन दिले होतें. अंबिका पुढे मरण पावल्यानंतर ती उत्तरेकडील करंज गांवांत एका ब्राम्हणाच्या घरीं ' अंबाभवानी ' म्हणून जन्मास आली.

त्याच गांवांतील माधव नांवाच्या वेदशास्त्रसंपन्न शिवभक्तांशी पुढें अंबाभवानीचें लग्न झालें. पुढें श्रीदत्तप्रभुनीं त्यांच्या उदरीं दीनोद्धाराकरितां अवतार घेतला. त्यावेळीं ज्योतिषांनीं भविष्य वर्तविले-

**" याचेनि योगें भक्तिज्ञान । जगीं वाढेल आत्मसाधन**
**दीक्षा देवोनी भक्ता पावन । करील कीं हा पुण्यपुरुष ॥**

परंतु पुढें सात वर्षांचें वय झालें तरी ह्या सद्गुरू बाळास बोलतां येईना. आईबापाला दुःख वाटू लागलें. पण बाळानें आपलें मौंजीबंधन करावें मग मी बोलावयास लागेन, असें खुणावून सांगितलें. आईबापांनीं मोठ्या

उत्साहानें मोठ-मोठे पंडित बोलावून मौंजीबंधन केलें. तो काय आश्चर्य! – बाळानें चार वेद व सर्व शास्त्रें मंजुळ आवाजांत तोंडपाठ म्हणून दाखविली! तेथें जमलेलें सर्व विद्वान त्यांच्या चरणीं लागलें. आईबापाला अतिशय आनंद वाटला.

परंतु बाळानें आपण ब्रम्हचारी असून आपणांस तीर्थाटनास जाण्यासाठीं आज्ञा द्यावी म्हणून आईच्या आज्ञेची भिक्षा मागितली. आईस पुन्हां वाईट वाटले. बऱ्याच वर्षानंतर तूं जन्मास येऊनहि तुझ्या मुकपणामुळे बोबडे बोल ऐकावयास मिळालें नाहींत. सात वर्षानंतर मौंजीबंधन केल्यानंतर विनाभ्यासानें तूं वेदशास्त्रसंपन्न महापंडित झालास. तुझ्यामुळें जिव धन्य झाला. आणि आतां तूं मला सोडून जाणार, तर मग जगांत जगून तरी माझा काय उपयोग ?' अशाप्रकारें अंबाभवानीनें आपल्या पुत्राची करुणा भाकली. श्रीनृसिंह गुरुचें मनहि द्रवलें. शेवटीं त्यांनीं आपल्या आईस वेदशास्त्रसंपन्न चार पुत्र होतील असा आशीर्वाद देऊन व दोन पुत्र होईपर्यंत आपण घरीं राहूं असें वचन देऊन आपल्या माता पित्यास उपदेश केला.

श्रीसद्गुरूंच्या भक्तीच्या प्रभावाने अंबेला दोन जुळें पुत्र झाले. त्यानंतर त्यांनीं आपल्या माता पित्यास प्रत्यक्ष श्रीदत्तमूर्तीचें दर्शन घडवून सर्वांचा निरोप घेऊन व स्मरण कराल त्यावेळीं प्रकट होऊं असें माता पित्यास सांगून बदरीवनाचा मार्ग धरला. तेथून ते आनंदवनांत गेलें. आणि पुढें श्रीकाशीक्षेत्रीं प्रकटलें. सद्गुरु स्वयंसिद्ध होतें. असें असूनहि त्यांनीं योगसिद्धीच्या प्राप्तीसाठीं जपतपादि अनुष्ठानें तेथें राहून केलीं. त्यांचें तेज पाहून सर्व यति त्यांच्या चरणीं लागलें. लोकानुग्रहासाठीं त्यांनीं तेथील वृद्ध यतिराज श्रीकृष्णसरस्वती यांना गुरु मानून त्यांच्याकडून संन्यास दीक्षा घेऊन 'श्रीनृसिंहसरस्वती' असें नांव धारण केलें. त्यानंतर त्यांनीं श्रीबदरी-केदार तीर्थाकडें प्रयाण केले आणि परत येते वेळीं वाटेंत जीं जीं तीर्थे होती, तीं तीं पावन करून ते पुन्हां करंज गांवीं येऊन आपल्या माता-पित्यास भेटलें. तेथें थोडें दिवस राहून ते श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरला गेलें. तेथून नाशिक वगैरे ठिकाणच्या तीर्थयात्रा करीत करीत थेट कृष्णातीरीं औदुंबर क्षेत्रीं राहिलें. तेथें अनेक भक्तांचा आणि दीनजनांचा उद्धार करून ते भीमा-अमरजा संगमाच्या गाणगापूर क्षेत्रीं प्रगट झालें. औदुंबराप्रमाणेंच

तेथेहि त्यांनीं एक चमत्कार घडवून आणून गाणगापूरचा महिमा वाढविला. तेथें तर सर्व जातीचें लोक त्यांचे शिष्य बनलें.

त्यानतर श्रीसद्गुरु माघ महिन्यांतील कृष्णपक्ष शुक्रवारीं ( बहुधान्य संवत्सर शिशिर ऋतु ) पुण्यनौकेत आसन घालून बसून संगमाच्या पैल-तीरावर गेले आणि तेथून ते श्रीशैलमल्लिकार्जुन पर्वतयात्रेस जाण्याचें आहे असें सांगून कर्दळीवनांत गुप्त झालें. त्यांनीं—

**आम्हीं जातो श्रीशैला । कल्याण असो सर्वांसी ॥**

असें सांगून शिष्यांना व भक्तगणांना आशिर्वाद दिला. त्यानंतर तीरास आलेली प्रसाद पुष्पे भक्तांनीं मठांत नेली. श्रीशैलमल्लिकार्जुनाच्या कर्दळीं-वनांत समाधिस्त अवस्थेंत गुप्तरूपानें ते राहिलें. या ठिकाणीं पांचवा अध्याय समाप्त झाला आहे

# * अध्याय सहावा *

## श्रीनृसिंह सरस्वती भ्रमण

**आतां अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ तेजोराशी**
**सद्गुरू असे जो आम्हासी । लीला तयाची गाईन ॥** (अ. ५–२०६)

असें सद्गुरू आनंद भारती महाराजांनीं पाचव्या अध्यायाच्या समाप्तीच्या वेळीं विद्वांसांना आश्वासन दिलें होतें. त्याप्रमाणें त्यांनी पुढील कथाभाग सांगण्यास सुरवात केली. अति सुंदर अशा कर्दळी वनांत ‘श्रीशैलमल्लिकार्जुन’ नांवाच्या एका पुण्यस्थानीं श्रीसद्गुरु गुप्तरूपानें समाधी योगाची साधना करीत होतें. तरीहि भक्तांच्या उद्धारासाठीं ते गाणगा-पूरासहि प्रकटून दर्शन देत असत. असाच कांहीं वर्षाचा काल गेला. पुढें देशांतील यवनाचें बल वाढूं लागलें, धर्मश्रद्धा नष्ट होऊं लागली आणि-

**किंच्येक राहिलें भाविक । तयां जे भेटती साधु दांभिक**
**नीति धर्मोपदेशक । तेही परस्त्रीलंपट ।** ( अ. ६-२५ )

अशी स्थिती होऊं लागली. ही परिस्थिती अंतर्ज्ञानानें जाणून त्यांनीं आपल्या समाधीचा भंग करून कर्दळीवन सोडलें आणि ते पुन्हा उत्तरपंथास चालले. मार्गांत जेवढीं क्षेत्रे लागली त्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं लोकांना पावन केलें. कलकत्त्यास जाऊन त्यांनी आदिमाया कालि मातेचें दर्शन

घेतलें आणि ते गंगानदीच्या किनाऱ्यावरील तपोवनांत योग्य स्थान पाहून समाधी लावून बसले. ते ज्या वृक्षाच्या तळाशी समाधीं लावून बसलें होतें, त्या जागीं त्यांच्या अंगाभोवती संपूर्ण वारूळ वाढलें. त्या ठिकाणी पुढें एके दिवशीं एक लाकूडतोडया आला. त्यानें वृक्षावर कुऱ्हाडीचा घाव घातला परंतु घावासरशी रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या, त्यामुळें तो भयभित झाला. त्यानें अलगदपणें वारूळ बाजूस केलें. तो आंत–तेजःपुंज अशा विभूतीच्या हृदयावर लागलेल्या कुऱ्हाडीच्या घावांतून जमिनीवर रक्त गळत राहिले होतें, पण ती विभुति समाधिस्त झालेली होती. आतां हे यतिराज समाधीतून उठल्यावर आपणांस आपल्या अपराधाची क्षमा करतील कीं, आपणांस शापानें भस्म करतील या विचारानें लाकुतोडया गर्भगळित झाला. इतक्यांत सद्गुरूंची समाधी विसर्जित झाली. लाकुडतोड्यानें क्षमस्व म्हणून त्यांचें पाय धरलें श्री सद्गुरूंनीं 'तुज करोनि कारण समाधि केली विसर्जन' म्हणून त्याला सांगून अभय दिलें आणि 'पुत्रपौत्रासह तूं सुखनें नांदशील' असा त्याला आशिर्वाद दिला. तेथून स्वामी निघाले ते काशीस गेलें. तेथें कांहीं काल राहून उत्तर दिशेस त्यांनीं गंगोत्री, हरिद्वार, बदरीकेदार वगैरे अनेक तीर्थांच्या यात्रा केल्या आणि ते गोदावरी नदीच्या किनारीं आलें मध्यंतरीं देवळग्रामांत त्यांनीं स्वतःच्या पादुका स्थापून त्या स्थानाचा महिमा वाढविला. त्यानंतर मोंगलांच्या भागानगरांत (हैद्राबादेंत) राहून तेथें त्यांनीं अनेक भक्तांचा उद्धार केला. पुढें तेथून ते राजुर गांवीं गेलें आणि तेथें त्यांनीं मठाची स्थापना केली. तेथें त्यांना पुष्कळ मोठा शिष्यसांप्रदाय मिळाला. स्वामी त्या ठिकाणीं 'चंचल भारती' या नांवानें प्रसिद्ध होते.

त्यानंतर तेथून निघून मार्गांत उपरी कृष्णापुरी क्षेत्रांचें दर्शन घेऊन स्वामी मगळवेढ्यास आले. त्या ठिकाणीं 'दिगंबर' नाम धारण करून त्यांनी अनेक चमत्कार केलें. एके दिवशीं अगदीं प्रभात समयीं ते एका दरिद्री ब्राम्हणाच्या घरीं गेलें आणि दशमी मागूं लागलें. ब्राम्हणाची गाय अत्यंत रोड झाली होती, तशांत तिला खाण्यासहि चारा मिळत नव्हता आणि ती दुभतीहि नव्हती. तेव्हां दारीं आलेल्या अतिथीस दशमी कशी द्यायची म्हणून ब्राम्हण ओशाळला. तेंव्हां स्वामींनीं गाईजवळ जाऊन तिच्या

कडे कृपादृष्टीनें पाहून तिच्या पाठीवरुन हात फिरविला. त्यांनीं ब्राम्हणास संध्याकाळीं गाईची धार काढून दशमी बनवून ठेवण्यास सांगितलें आणि आपण दोन घटका रात्र झाल्यानंतर येऊन फराळ करूं म्हणून सांगितलें. सायंकाळीं ब्राम्हण गायीची धार काढण्यास बसला– तो काय आश्चर्य ! गायीनें अमाप दुध दिलें. ब्राम्हणाने सद्‌गुरुस धन्यवाद दिलें ! आणि रात्रीं सद्‌गुरू येतांच त्यांचे पाय धरलें. त्यांनी त्याला आशिर्वाद दिला आणि मोठ्या आनंदाने फराळ केला. अशा प्रकारे मंगळवेढें स्वामीच्या पुण्याईनें पावन झालें आणि लोक भक्तिमार्गाकडें लागलें. येथें 'श्रीनृसिंहसरस्वती' नामक सहावा अध्याय समाप्त झाला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५२६७

## ❋ अध्याय सातवा ❋

### बसाप्पाख्यान

या सातव्या अध्यायामध्यें 'बसाप्पाअख्याना'चें वर्णन केलेलें आहे. मंगळवेढ्यामध्यें बसाप्पा नांवाचा एक कुटुंबवत्सल धार्मिक तेली रहात होता. तो अतिशय दरिद्री होता, पण तरीहि भगवद्‌भक्तीत तो कधींहि खंड पडूं देत नसे. एकदां तो वनांत गेला असतां त्यानें श्रीनृसिंहस्वामींना कांट्यांच्या शय्येवर समाधिस्त होऊन पडलेले पाहिलें. स्वामींची समाधी उतरल्यानंतर त्यानें त्यांचें चरण धरलें आणि स्वामींची सेवा करीत तो त्यांच्याजवळच राहूं लागला. त्याच्या घरीं अठरा विश्वें दारिद्र्य होतें, त्यामुळें त्याची बायको मोलमजूरी करून कसें तरीं मुलाचें पोट भरत होती. बसाप्पाची एकनिष्ठ सेवा पाहून स्वामी गहिंवरलें आणि प्रसन्न होऊन त्यांचें दैन्य कायमचें नष्ट करण्यासाठीं त्याला घेऊन एके दिवशीं प्रभातकाळींच वनांत निघालें. त्या निबिड वनांत हिंस्र श्वापदे इतस्तत: फिरत होती. जमिनीवर तर मोठ-मोठें सर्पच सर्प पसरलें होतें, त्यामुळें बसाप्पा अतिशय बावरला. त्याला घाम फुटला. त्यानें सद्‌गुरूचें चरण धरलें, सद्‌गुरूनीं त्याला सांगितलें कीं, धीर धरून जेवढें सर्प घेतां येतील तेवढें घे. अशी वेळ पुन्हां येणार नाहीं. बसाप्पानें वस्त्र टाकून एक सर्प धरला आणि काखोटीस मारला. थोड्या वेळानें सर्व सर्प गुप्त झालें. त्यानंतर ते दोघें मंगळवेढ्यास

परत आलें. स्वामीनें त्याला काखोटीस मारून आणलेलें घरीं बायकोस नेऊन द्यायला सांगितलें.

आपला नवरा घरीं परत आल्याचें पाहून बसाप्पाच्या बायकोस आनंद झाला. बसाप्पाने काखोटीचें वस्त्र जमिनीवर सोडले, तो काय आश्चर्य ! त्यांतून सोन्याची लगडी खाली पडली. ही सद्गुरूची कृपा असे समजून दोघेहि त्यांच्या दर्शनास गेलें. सद्गुरूनीं त्यांना आशीर्वाद दिला. पुढें उभयतांनीं सुखानें संसार केला. त्यांना तीन मुलगे झाल्यानतर बसाप्पाची बायको निवर्तली. त्यावेळीं स्वामी अक्कलकोटास गेलें होतें. बायको वारल्यापासून बसाप्पाची दरिद्री अवस्था पुन्हां वाढूं लागली. आता तो वृद्ध झाला होता. त्यामुळें ' जाऊनि पडूं गुरुचरणी ' असा विचार करुन त्यानें एका मुलांस बरोबर घेतलें आणि तो अक्कलकोटास गेला. त्याठिकाणीं स्वामींच्या दर्शनास एक वृद्ध ब्राम्हण आपल्या राधाबाई नांवाच्या नूतन तरुण बायकोस घेऊन कोकणांतून आला होता. त्याला मुल होत नव्हतें. त्या तरुण स्त्रीस सद्गुरुनीं तिचा पूर्वजन्मींचा वृत्तान्त सांगितला. ' गेल्या जन्मीं तूं लिंबी नांवाची तेलीण होतीस, हा माझा भक्त बसाप्पाच त्यावेळीं तुझा नवरा होता. तुम्हीं दोघांनीं माझी पुष्कळ सेवा केली. तुला तीन पुत्र झालें, पण तिसरा मुलगा लहान असतांना तूं मरण पावलीस. तुझ्या हातून एक पाप घडलें आहे. निर्धन बसाप्पाला आम्हीं दिलेल्या धनांतून पुष्कळसें धन तूं बसाप्पाला चोरून घरांतील पश्चिम बाजूच्या रंगीत खांबाखालीं तांब्याच्या हुडयांत घालून पुरुन ठेविलें आहेम. ते तावडतोब काढून बसाप्पाला दे म्हणजे तुला सुलक्षणी पुत्र प्राप्त होईल."

सद्गुरूच्या तोंडून हा वृतान्त ऐकून सर्वजण आश्चर्यचकीत झाले. हा चमत्कार पाहण्यास सर्वजण मंगळवेढयाम गेलें. बसाप्पाच्या घरीं त्या जागीं खणून पहातां सोन्यानें भरलेला एक हुंडा सांपडला. त्या ब्राम्हण तरुणीनें तो बसाप्पास दिला. बसप्पाने सर्वांना भोजन दिलें बसाप्पा आतां धनवान झाला. ब्राम्हण आपल्या तरुण पत्नीस घेऊन पुन्हां अक्कलकोटास स्वामींच्या दर्शनास आला. स्वामींनीं त्या उभयतांना महाभाग्यवंत सुपुत्र होईल असा आशीर्वाद दिला. पुढें लौकरच त्या स्त्रीस पुत्र प्राप्ती झाली आणि ते उभयतां सुखानें कालक्रमणा करूं लागलें.

गुरुकृपा जयीं होय । मग तया उणें काय
सद्‌गुरू असती जगन्माय । जाण सत्य हरिभक्ता ॥

असें श्रीआनंद भारती महाराज गोपाळराव विद्वांसांना म्हणतात. येथें हा वराप्पा– आख्यानाचा सहावा अध्याय संपलेला आहे.

# * अध्याय आठवा *

## यवनोद्धार वर्णन

आनंदगुरू म्हणे परिसा । कथाभाग सांगतो सरसा
स्वस्थ करोनि निजमानसा । सावधान असावें ॥ (अ ८-७)

असें म्हणून श्री सद्‌गूरू आनंदभारती महाराजांनी पुढें ' यवनोद्धार ' वर्णन नांवाचा आठवा अध्याय सांगण्यास सुरूवात केली. मंगळवेढयामध्यें श्रीस्वामी समर्थांनीं अनेक अद्‌भुत चमत्कार करून लोकांना भक्तिमार्गास लाविलें. एके दिवशी सद्‌गुरू फिरत फिरत ' चळावें ' या गांवीं आलें. तेथें असलेला एक मठ पाहून त्या ठिकाणी आपण विश्रांति घेऊं असा विचार करून ते मठांत गेले. मठाधिपति रामदासी अत्यंत पुण्यवान आणि स्वामीभक्त होता. त्यानें सद्‌गुरूचें मोठ्या प्रेमानें भक्ति–युक्त अंतःकरणानें स्वागत करून त्यांना सुग्रास भोजन करून जेवूं घातलें. त्यानंतर सद्‌गुरू वामकुक्षी करितां पहुडलें. त्या मठाधिपति ब्राह्मणास कांहीं कामानिमित्त बाहेर जावयाचें होते, पण सद्‌गुरू झोपेंतून उठल्यानंतर अवचित आपणांस सोडून निघून गेले, तर त्यांची कृपा आपणास लाभणार नाहीं, ह्या विचारानें तो श्रीस्वामी समर्थांना आंत कोंडून व मठाच्या दरवाजास कडी–कुलूप घालून थोडया वेळांतच आपलें काम आटपून परत येण्याचा विचार करून निघाला. श्रीस्वामी समर्थांनीं त्यांच्या मनांतील विचार ओळखला आणि त्यास अद्‌भुत चमत्कार करून दाखविण्याचें ठरविलें. भीमा नदीच्या तटीं लहान मुलें वाळवंटांत खेळत होती. त्यांच्यामध्यें जाऊन श्रीस्वामी मिसळलें. श्रीस्वामींना तेथें पाहातांच तो मठाधिपति आश्चर्यानें थक्क झाला, मठास आपण बाहेरून कुलूप लाविले असून बाहेर येण्यास दरवाजा पण दुसरा नाही, मग स्वामी बाहेर येणार

तरी कसें ? हे दुसरे कोणी संन्यासी असतील, असा मठाधिपतीनें विचार केला. पण तरीहि तो मठाकडे परत आला. कुलूप उघडून पाहातों तों स्वामी मठामध्यें नाहींत. तो तसाच स्वामींच्याकडे धांवत गेला आणि चरणांवर मिठ्ठी घालून क्षमा मागूं लागला. त्यानें स्वामींना परत घरीं आणलें. पुढें–

**मंगळवेढीं तप एक । स्वामी राहिले भक्ततारक**
**चमत्कार दाविती आणिक । भक्तिमार्ग वाढवावया ॥** (अ. ८-५८)

मंगळवेढ्यामध्यें एक यवन राहात होता. तो सदा सर्वदा स्वामींना धुम्रपान करण्यास देत असें. स्वामींच्या भक्तीशिवाय तो इतरत्र लक्ष देत नसें. पुढें स्वामींनीं त्यास अनुग्रह करून जन्म–मरणापासून मुक्त केलें. त्यानंतर स्वामी मगळवेढ्याहून मोहोळला निघालें. वाटेंत पंढरपूरास जाऊन त्यांनीं श्रीविठ्ठलाचें दर्शन घेतले. मोहोळला श्री नवेस्वामीं हे लिंगायत वणिज समाजांतील पंचाहत्तर वर्षाचें वृद्ध महान योगी जमिनीपासून अधांतरी योगसाधना करीत होतें, श्रीसद्गुरूदर्शनार्थ हटयोगादि यागांचा अवलंब करून त्यांनीं स्वतः क्लेश करून घेऊं नयें म्हणून श्री स्वामी समर्थांनीं त्यांना आपलें दर्शन घडविलें.

त्यानतर श्रीस्वामी समर्थ तेथून सोलापूरला गेलें. तेथें चिंतोपंत टोळ त्यांचे भक्त झालें. ते दोघेंहि पिता–पुत्र स्वामींची सेवा करीत असत. एके दिवशीं भोजनाच्या वेळीं स्वामी चिंतोपंताच्या घरी गेलें. चिंतोपंतानें स्वामींना स्नान घातलें त्यांची यथासांग पूजा केली आणि त्यांना पात्रावर नेऊन बसविलें. पण स्वामींच्या पुढें भोजन ठेवूनहि स्वामी भोजन करेनात. चिंतोपंताचा मुलगा विष्णुपंत जिल्हाधिकारी कचेरींत कारकून होता, त्यांस कचेरींत जाण्यास उशीर होऊं लागला. शेवटीं निरूपाय म्हणून चिंतोपंतानीं विष्णुपंतास स्वयंपाक घरांत जाऊन भोजन करून सत्त्वर जाण्यास सांगितलें. विष्णुपंत स्वामीभक्त होता, उशीर झाला तरी स्वामींच्याबरोबरच भोजन करण्याचे त्यांनें ठरविलें, शेवटी स्वामी भोजन करुं लागलें, त्यांच्याबरोबर भोजन आटपून कचेरींत जाण्यास विष्णुपंतास एक तास उशीर झाला. आपणांस उशीर झाल्याबद्दल विष्णुपंतानें वरिष्ठाची माफी मागितली. पण वरिष्ठ म्हणालें, " अहो, तुम्ही माझ्यापूर्वीच कचेरींत येऊन हजरी पत्रकांत

रवतच्या हातानें सही केलीत आणि माफी कसली मागतां? " सद्गुरुंची लीला पाहून विष्णुपंत भांबावून गेला—

**भक्त दामाजी जेंवि तारिला । तैशीच गति झाली ही ॥**

असें म्हणून ते सद्गुरुंच्या भजनीं लागलें. स्वामींच्या कृपेनें चिंतोपंत पुढें अक्कलकोट संस्थानचें दिवाण झालें. ज्या गुरुवारी चिंतोपंतांना दिवाण नेमण्यांत आल्याचे आज्ञापत्र मिळालें, त्या दिवशीं त्यांनीं स्वामीनीं आपणाबरोबर अक्कलकोटास चलावें म्हणून विणावणी केली. पण ह्या उन्हाळयांत न येतां स्वामीनीं त्यांना पावसाळयांत येतो म्हणून सांगितलें पुढें आषाढांत अक्कलकोटचें राजे शहाजी मरण पावलें, त्यानंतर कार्तिकांत पाऊस चांगला होऊन धान्यहि चांगले पिकलें आणि राज्यपद मालोजीस मिळाले. त्यावेळीं श्रीस्वामी समर्थ अक्कलकोटास गेलें. तेथें पुष्कळ वर्षें राहून त्यांनीं दीनांचा उद्धार केला आणि लोकांना भक्तीमार्गास लाविलें. या ठिकाणीं हा आठवा अध्याय समाप्त झाला आहे.

# ※ अध्याय नववा ※

## बुद्धिपुरागमन

**स्वामी समर्थ अक्कलकोटी लीला अनेक दाविल्या असती ।**

**त्यातूनि कित्येक तुजप्रती । करितों निवेदन हरिभक्ता ॥**

असें श्रीआनंदभारती महाराजांनीं विद्वांसांना सांगून एकेक लीला या ठिकाणी सांगण्यास सुरुवात केली. श्री समर्थ महाराज अक्कलकोटला आल्यानंतर चिंतोपंतानीं महाराजांनीं आपल्या घरीं येऊन रहावें म्हणून त्यांची पुष्कळ विणवणी केली पण महाराज गांवाबाहेर ध्वजस्थानाजवळ एका फाटकाजळ बसलें. त्यांनीं तेथें तीन दिवस निराहार काढलें. पुढें तेथील एका यवन रक्षकानें त्यांची चेष्टा करण्याच्या उद्देशानें एका रिकाम्या चिलमीवर विस्तव ठेवून त्याना ती ओढण्यास दिली. महाराजांनीं ती रिकामी चिलीम तोंडास लाविली आणि धूराचें लोटच्या लोट बाहेर येऊं लागलें. हा अद्भुत प्रकार पाहून तो यवन स्वामींच्या चरणीं लागला. स्वामीं तीन दिवस उपवासी असल्याचें पाहून त्या यवनानें त्यांना चोळण्या

नांवाच्या ब्राम्हणाच्या घरीं नेऊन त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. त्या-वेळपासून चोळप्पा स्वामीचा भक्त बनला.

उत्तर सातारा जिल्ह्यांत तांदुळवाडी म्हणून एक गांव आहे. त्या गांवांत एक भाविक गृहस्थ रहात होते. पंढरपूरच्या आषाढी–कार्तिकी अशा दोन्हीं वाऱ्या तें करित असत. ते अत्यंत मधूर आवाजांत भजन गात असत. त्यांच्या कानीं स्वामी समर्थांची कीर्ति गेल्यानें ते त्यांच्या दर्शनास आले आणि त्यांच्या जवळ येऊन राहिलें. स्वामींच्या चरणसेवेंत त्यांची पंढरीची वारी पण चुकलीं. एकदां स्वामींच्या समवेत भजनें म्हणत असतां त्यांना स्वामींनीं विठ्ठलाच्या रूपांत दर्शन दिलें. त्यामुळें ते एक तासभर जणु समाधी लागल्याप्रमाणें विठ्ठलाचें दर्शच घेत उभें राहिलें नंतर त्यांनीं जेव्हां हा चमत्कार इतर लोकांना सांगितला, तेव्हां लोकांच्या आश्चर्यास पारावार उरला नाहीं. अशा प्रकारें त्या भाविकाचा स्वामीनीं उद्धार केला. या ठिकाणीं " बुद्धिपुरागमन " नांवाचा नववा अध्याय समाप्त झालेला आहे.

## * अध्याय दहावा *

### विष्णुबाबा दर्पहरण

**स्वयें त्यागुनि सन्मार्ग । इतत्र जाउनी लाविती आग**
**भक्तासि अभक्त दुर्गम । करिती मोहिनी घालोनी (अ१०-८)**

अशा प्रभृतीच्या मांत्रिकांना आणि स्वतःस योगी समजणाऱ्यांना योग्य मार्ग दाखवून ताळ्यावर आणावयाचें कार्यहि स्वामी समर्थांनी आपल्या अव–तारांत केले आहे. त्यावेळीं मुंबईमध्यें विष्णुबाबा नांवाचें एक स्वतःस विद्वान वेदांती समजणारे ब्रह्मचारी गृहस्थ रहात होतें. त्यांना स्वतःच्या विद्व-त्तेचा विलक्षण गर्व होता. विष्णुबाबा नेहमीं साधुसंतांची अवहेलना करीत असत. विष्णुबाबांची वेदांतावर असलेल्या अजोड प्रभुत्वाची कीर्ति अक्कल-कोटच्या मालोजी राजांच्या कानीं गेली. त्यांनीं बाबांना बोलावून त्यांच्या-कडून वेदांत श्रवण करण्यास सुरवात केली. त्यांनीं एकें दिवशीं स्वामींपाशीं वेदात चर्चा करावी, असें विष्णुबावांच्या मनांत आलें. आपल्याबरोबर तीन पारशी जातीच्या गृहस्थांना घेऊन ते स्वामींच्याकडें गेलें. स्वामींना त्यांनी

' ब्रह्मतदाकारवृत्तीचें साधन कोणतें ? ' असा प्रश्न केला, पण स्वामींनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यामुळें स्वामींची निर्भत्सना करून बाबा तसेंच परतले.

त्याच दिवशीं मध्य रात्रीं बाबांना एक भयंकर स्वप्न पडलें. स्वप्नामध्यें लक्षावधीं विंचू त्यांना इतस्तत: दिसूं लागले. इतक्यांत त्यांतून एक भली मोठी इंगळी त्यांना दंश करण्यासाठीं त्यांच्या पायाकडे येऊं लागली. ताबडतोब जागे होऊन बाबा बोंब मारीत उठले आणि ' मेलों मेलों ' असें ओरडत इतस्तत: पळूं लागले. बाजूस झोपलेले पारशी लोक जागे झाले आणि त्यांनीं बाबांना सावध केलें. नंतर आपणास पडलेलें भयंकर स्वप्न त्यांनीं त्यांना सांगितलें, परंतु बाबांना इतकी जबरदस्त धडकी भरली होती कीं, सर्व रात्र त्यांनीं जागरण करून काढली. दुसऱ्या दिवशीं आपल्या दिनचर्येत त्यांना त्या स्वप्नाचें विस्मरण झालें. संध्याकाळीं ते पुन्हां पारशी लोकांना घेऊन वेदांतावर चर्चा करण्यासाठीं स्वामींच्याकडे गेले.

विष्णुबाबांनीं पुन्हां स्वामींना ' ब्रह्मतादात्म्यवृत्तीचें साधन कोणतें?' म्हणून प्रश्न विचारला. स्वामी एकदम खवळले आणि त्यास बोलले, " मूर्खा-तूं विद्वत्तेच्या गर्वानें धुंद झाला आहेस. संतजनांची तूं अवहेलना करतोस; रात्रीं स्वप्नांत विंचू दिसताच घाबरतोस आणि त्यांतील एक इंगळी डसूं लागतांच बोंब मारतोस. तुझ्यासारख्या कोरड्या पाषाणानें ब्रह्म ते काय बोलावें ? " आपलें स्वप्न स्वामींना कसें कळलें कीं, त्यांनींच तें स्वप्न पाडलें, असा संभ्रम बाबांच्या मनांत उत्पन्न झाला. स्वामींचें सत्य बोल ऐकून बाबांना पश्चाताप झाला. त्यांनीं स्वामींचे पाय धरून त्यांची अंत:करणपूर्वक क्षमा मागितली आणि ते त्यांच्या भजनी लागले. येथें ' विष्णुबाबा ब्रह्मचारिदर्पहरण' नांवाचा दहावा अध्याय समाप्त झाला आहे.

## ॥ अध्याय अकरावा ॥

### अतिथितृप्तिद्वारा स्वामीक्षुधाशमन

जे जें करणें असे कर्म । तें तें करावें निष्काम
तेणें लाभे कैवल्यधाम । अनुभव होईल प्रत्यक्ष ॥(अ.११-११)

हा सदुपदेश त्या अध्यायामध्यें सद्गुरू श्रीस्वामी समर्थांनीं आपल्या भक्तोत्तम ब्राह्मण दांपत्यास व इतर भक्तांना केला आहे. अहमदनगरांतील एक ब्राम्हण आपल्या पत्नीसह स्वामींच्या दर्शनास अक्कलकोटास आला. त्यानें सुग्रास अन्न तयार करून त्याचा नैवेद्य स्वामींना अर्पण करण्याची आपली इच्छा असल्याचें सांगितलें. स्वमींनीं त्याला खीर, कढवोळी, आमटी, भजी वगैरे पदार्थ तयार करण्यास सांगितलें. ब्राम्हणाने शिधा सामुग्री जमविली, दोघांनीं स्नानें उरकलीं. ब्राम्हण पत्नीनें स्वयंपाकास सुरूवात केली. ब्राम्हणानें आपले नित्यक्रम उरकले आणि तो स्वामींना भोजनास बोलाविण्यास गेला. प्रथम ब्राम्हणांची जेवणें होऊं देन मग आपण जेवणास बसूं, असे स्वामींनी त्यास सांगितलें. ब्राम्हणानें घरीं येऊन आमंत्रित ब्राम्हणांचीं पवित भोजनास बसविली. भोजनोत्तर तांबुल दक्षिणा घेऊन ब्राम्हण आपापल्या घरीं परतले.

त्यानंतर स्वामी व ब्राम्हण पति-पत्नी असें तिघेंच जेवण करावयाचें राहिले होतें. ब्राम्हणानें तीन पानें वाढून ठेवून शिल्लक राहिलेलें अन्न सर्वांना वाटून टाकले त्यानंतर स्वामींना बोलावण्यासाठीं तो ब्राम्हण निघाला. इतक्यांत तेथें तीन दिवस पोटांत अन्नाचा कणहि न गेलेले दोन दरिद्री पांथस्थ आलें. त्यांनीं जेवण घालण्यास ब्राम्हणास काकुळतीनें विनंती केली. ब्राम्हणानें आपलें व पत्नीचें अशी दोन्हीं पानें त्यांना वाढली, पण तरीहि त्यांचें पोट भरलें नाहीं. पुन्हां जेवण पोटभर वाढण्यास ते सांगूं लागले. ब्राम्हणानें शेवटीं स्वामीकरितां काढलेलें पानहि त्यांना वाढलें, ते पांथस्थ समाधानानें जेवून उभयतांस आशीर्वाद देवून निघून गेलें.

जरी झाला स्वामिरोष। चरणीं नम्र होता विशेष।
शांत होतील लवलाही॥

असा विचार करून दोघेंहि पति-पत्नी स्वामींच्याकडें गेलें आणि त्यांचे चरण धरलें. त्यांच्याकडें दृष्टी टाकून हंसून स्वामींनीं अगदीं भरपूर जेवल्याप्रमाणें आपल्या पोटावर हात फिरवून ढेकर दिला आणि त्यांच्या शेजारीं जेवून येवून बसलेल्या भक्त मंडळीना ते सांगूं लागले, "आपण आज अगदी यथेच्छ जेवलो. स्वयंपाक तर अगदी नामी झाला होता! खीर

उत्तम झाली होती. पण थोडी वेलची अधिक पडली होती. पुरणपोळी अगदी नाजुक आणि सुरेख झाली होती. कडबोळी स्वादिष्ट होती, पण जरा तिखट झाल्यानें चरचरीत वाटत होती." स्वामींनीं आपलें भोजन न घेता ते पदार्थांची रूची सांगत असल्याचे पाहून ब्राम्हण सद्‌गदित् होऊन अश्रू ढाळूं लागला. त्यावर सद्‌गुरू त्याला म्हणालें, "तुझा प्रसाद खरोखरच मला पावला. तूं दुःख कमले करतोंस? आणि तरीहि तुला मी प्रसाद द्यावा अशी इच्छा असेल तर घरीं जा आणि कोनाडयांत कांही शिल्लक असेल तर घेऊन ये."

ब्राम्हणाची पत्नी सरस्वती घरी गेली. अन्नाचा कणहि शिल्लक नसतानां तिला सद्‌गुरूंच्या कृपेनें एका कोनाडयांत अन्नच अन्न सांपडलें, सद्‌गुरूंची अद्‌भुत लीला पाहून ब्राम्हण पति-पत्नी आश्चर्यानें भांवावून गेलें. त्यांनीं अन्न घेऊन स्वामींच्याकडे येऊन त्यांना प्रेमानें जेवूं घातलें. त्यानंतर परमेश्वराने गीतेंत सांगितलेला उपदेश - निष्काम कर्म करीत जा म्हणजे फलप्राप्ती होईलच- सद्‌गुरूंनीं ब्राम्हणास केला. दुसऱ्या दिवशीं पारण्याचें भोजन होऊन ब्राम्हण उभयतां स्वामींची आज्ञा घेऊन आपल्या गांवी गेला. येथें "अतिथितृप्तिद्वारा स्वामीक्षुधाशमन" नांवाचा अकरावा अध्याय सपलेला आहे.

## ❋ अध्याय बारावा ❋

### रावणा- द्विजपुत्र संजीवन

**शवासि केलें जिवंत । चहूंकडे पसरली मात**
**जन येतो धांवत । आश्चर्य अद्‌भुत पहावया ॥ (अ. १२-९१)**

सद्‌गुरूंच्या चमत्काराची कथा ह्या बाराव्या अध्यायामध्यें श्री आनंद भारती महाराजांनीं विद्वांसांना सांगितली आहे.

एकदां सद्‌गुरू अक्कलकोटजवळच्या बागेहाली गांवी सकाळीच जाऊन पोंहचलें. त्यानंतर त्यांनीं बरोबरच्या सर्व भक्तमडळींना गंमत दाखवितो असें सांगून आपणाबरोबर बाहेर चलण्यास सांगितलें. पण भर दुपारची वेळ होती. उन्हाचा ताप मी म्हणत होता, पाय जमिनीवर नुसतें पोळत होतें.

त्या उन्हांत रस्त्यांवरून चालणें केवळ असह्य होतें. कांहीं मंडळी सद्‌गुरूबरोबर निघाली, पण उन्हाचा ताप असह्य होऊन परतली. जाधवादि मंडळीं मात्र सद्‌गुरूंबरोबर राहिली. तिसऱ्या प्रहरीं ते सर्व जण इटगी नांवाच्या गांवी आलें. तेथे गांवाबाहेरच्या मारुतीच्या मंदिरांत जाऊन स्वामी निद्रा घेऊं लागले. त्याच वेळीं त्या गांवांतील रावण्णा नांवाच्या वैश्यास–तो आपल्या शेतांत नांगर धरीत असतां वारूळांतील एक साप डसला. त्याच्यावर सर्पाच्या विषाचा तात्काळ परिणाम होऊन तोंडांतून एकसारखा फेंस येऊन तो मूर्च्छित होऊन पडला. त्याच्यावर मंत्र औषधें वगरे पुष्कळ उपाय केले, पण त्याला शुद्धी कांही येईना. तेव्हां लोकांनीं त्याला ज्या ठिकाणीं स्वामी बसलें होतें, त्या मारुतीच्या देवळांत नेऊन ठेविलें. पण एवढें होईपर्यंत रावण्णाच्या सर्वांगांत विष भिनले आणि तो मरण पावला. सर्व जण निराश झाले. पण स्वामींचें परम शिष्य बावा जाधवांनीं स्वामींना वंदन करून त्यांच्या पादुका हातीं घेऊन त्या मृत वैश्याच्या शिरांस स्पर्श केल्या. स्वामी जागें झालें आणि प्राण निघून गेलेल्या वैश्याच्या शिरास आपल्या पादुकांचा स्पर्श केल्याबद्दल जाधवरावावर संतापलें. परंतु क्षणार्धांतच त्यांचा कोप शांत झाला आणि त्यांनीं जाधवरावास त्या वैश्याच्या कानाजवळ जाऊन 'रावण्णा' म्हणून हांक मारण्यास सांगितलें. वैश्य जिवंत होऊन डोळें उघडून इकडे तिकडे पाहूं लागला.

मृतासी केला जिवंत । धन्य सद्‌गुरू स्वामी समर्थ
अगाध महिमा केला अद्‌भुत । न कळे कवणा स्वामींची ॥

मृत रावण्णा जिवंत झाल्याचें पाहून सर्वांना आनंद झाला. सर्वांनीं स्वामींचा जयजयकार केला.

बुद्धीनगराजवळ एक गांव होते. त्या गांवांत एक विधवा स्त्री राहात होती. तिला एकुलता एक मुलगा होता, पण तो रोगानें अगदी जर्जर होऊन मरणोन्मुख झाला होता. पुष्कळ उपाय केलें, तरी त्याला गुण येईना; म्हणून ती स्त्री मुलास खांद्यांवर टाकून स्वामींच्याकडे आली. पण मुलास खांद्यावरून उतरतांच मुलाचें प्राण निघून गेलें. स्वामींच्या कृपेनें मुल बरे न होतां त्यांच्याजवळ येतांच मरण पावलें. ती स्त्री शोक करूं लागली.

ते पाहून स्वामीनांहि कळवळा आली. त्यांनीं उठून त्या मुलाच्या प्रेताच्या पायास धरून त्यास गरगरा फिरविलें आणि दूर एका चराकडे भिरकावून दिलें. त्याबरोबर ते मुल जिवंत होऊन रडूं लागलें. मातेला अत्यानंद झाला आणि तिनें धांवत जाऊन मुलाला पोटाशीं धरलें. सर्वांनीं स्वामींचा जयघोष केला. स्वामींच्या कृपेनें प्रेत जिवत झाल्याचें वर्तमान चहूंकडे पसरून त्यांची कीर्ति वाढत गेली. येथें हा 'रावण्णाद्विजपुत्र संजीवन' नांवाचा बारावा अध्याय समाप्त झाला आहे.

# ※ अध्याय तेरावा ※

## किमयागार स्वामीकथानक

ऐसें किमया आख्यान । नर करिती श्रवण पठण
सद्गुरू तया आत्मज्ञान । मार्ग दाविती वात्सल्यें ॥ (अ. १३-४७)

असें श्री आनंदभारती महाराजांनीं या अध्यायाविषयीं म्हटलें आहे. या तेराव्या अध्यायांत 'किमयागार स्वामीकथानका'चें निरूपण केले आहे.

जे श्री क्षेत्र नाशिक श्रीरामचंद्रप्रभूंच्या वस्तीस्थानामुळें पावन झालें आहे, त्या नाशिक नगरीचें प्राचीन नाव ' जनस्थान ' असे होतें. त्या नाशिकमधून गोदावरी नदी वाहात असून तिच्या दोन्हीं तटास घाट असून स्नानसंध्येसाठीं कुंडेंहि विपुल आहेत आणि ठिकठिकाणीं अनेक देवालयें आहेत. अशा या पवित्र ठिकाणीं पुष्कळ साधुसंत येऊन राहात असत. त्यांत जसे कांहीं दिव्य योगी असत तसेंच कांहीं दांभीकहि असत. महाप्रयत्नानें आपणांस सिद्धी प्राप्त झाली आहे, अशी आत्मप्रशंसा करणारा आणि आपणाजवळ पुष्कळ स्तुतिपाठकांचा लवाजमा बाळगणारा एक दांभिकहि तेथें राहात असे. यतिधर्माचा आणि कर्तव्याचा अवमान करून त्या छांदिष्ट किमयागारानें नाना किमयांचे खेळ करून आपलें तीस वर्षांचें आयुष्य फुकट घालविलें होतें. तो कृतघ्न दुराचारी होता. एकहि दिवस तो मिष्टान्नावांचून घालवित नसे. त्याच्या किमयेच्या ढोंगानें पुष्कळ लोक त्याच्या नादीं लागलें त्याची किमया ढोंगीपणाची आहे, असे कोणी म्हटलें तर तो त्याच्या अंगावर मारण्यास धांवत असे.

एकदां श्रीस्वामी समर्थ महाराजांचें कांही शिष्य तीर्थयात्रा करीत करीत नाशिक क्षेत्रीं आलें त्यांनीं गोदावरींत स्नान करून देवदर्शन घेतलें. पंचवटी, सीतागुंफा वगैरे स्थळें पाहून त्यांनीं कपालेश्वराचेंहि दर्शन घेतलें. प्रसिद्ध पुण्यमूर्ति श्री घोलप स्वामी त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि त्यांनीं विचारल्यावरून स्वामी समर्थांचें कुशल वर्तमान त्यांना सांगितलें. शेवटीं चार घटका परस्परांशीं प्रेमानें बोलून झाल्यानतर घोलप स्वामींनीं त्यांना आशीर्वाद दिला आणि नगरींतील दुसरे प्रसिद्ध स्वामी किमयागार यांचें दर्शन घेण्याबद्दल स्वामींनीं सर्व भक्तजणांस गमतीनें सांगितलें.

त्यानंतर तेथून ते सर्व स्वामीभक्त किमयागाराच्या दर्शनास गेलें आणि त्याच्याजवळ बसलें. त्याठिकाणीं कांहीं विद्वान मंडळी बसलेली होती, पण यति महाराजांची विद्वता त्यांना कळून चुकली होती. परंतु ते मौन धारण करून बसलें होतें. किमयागारानें आपलें 'किमयाख्यान' चालू केलें, " सर्व देव किमयाविद्येस मान देतात. प्रत्यक्ष विष्णु भगवान सागरांत बसून किमयेनें पदार्थ निर्माण करतात. शंकरानें तर आपल्या विलमींतून सोनें, चांदी, रत्ने वगैरे निर्मिली. ब्रम्हदेवानें किमयेने रामकृष्णादि निर्माण केलें. किमयेसाठीं श्रीदत्तगुरु भूतलीं अवतीर्ण झालें आणि किमयेनेंच मच्छिंद्र, गोरख निर्माण झालें. आम्हीं पण किमयेनें सोने निर्माण करतो." त्याच्या या वल्गना आणि 'अगाध ज्ञान' पाहून सर्वांना शीण झाला. स्वामीभक्तांनी त्याला चार प्रश्न विचारलें. "संन्यास ग्रहणाचें कारण कोणतें? नित्य भोजन कोठें होतें? किमयाशद्बाचा अर्थ काय? तो शद्ब कसा बनला? धातुंच्या स्पर्शानें संन्यस्त वृत्तीस बाधा येत नाहीं काय? तेव्हां त्यानें स्वामी भक्तांस त्यांचा गुरु कोण म्हणून रागावून विचारलें. श्री स्वामी समर्थ महाराज आपलें गुरु म्हणून सांगून स्वामीभक्तांनीं आपल्या गुरुंची स्तुति करून त्यांचा जयजयकार केला. किमयागार संतापून त्यांना मारावयास धावूं लागला, तेव्हां-

**अक्कलकोटी एकवेळां । जाऊनि पहावा सद्गुरु डोळा**

असें सांगून स्वामीभक्तांनीं त्यास स्वामींची चरणें धरावयास सांगितलें.

तेव्हां तो त्यांस म्हणाला, "असें ढोंगी आम्ही पुष्कळ पाहिलेंत. तुमचें सद्गुरू समर्थ असतील तर येथेंच चमत्कार दाखवतील." "तुझी वेळच आली असेल तर तुझा मद उतरायला सद्गुरू आतांहि चमत्कार दाखवितील." एवढें बोलून स्वामीभक्त उठले.

त्यानंतर स्वामीभक्तांनीं श्री घोलपस्वामींना भेटून सर्व वृत्तांत सांगितला. तेंव्हां त्यांना त्यांनीं,–

**शासन होई तया निश्चित । चिंता मानसीं न करावी ॥**

असें सांगून निरोप दिला. दुसऱ्या दिवशीं पड्या आंत बसून किमयागार सोनें तयार करण्याची किमया करूं लागला, पण त्याला पुष्कळ प्रयत्न करूनहि ती कांहीं साधली नाहीं. त्यामुळें आपल्या शिष्यांना व भक्तांना शिवीगाळ करून तो मारण्यास धांवूं लागला. सर्व लोक त्यास सोडून गेलें. फक्त 'रामचरण' नांवाचा एक शिष्य मात्र त्याच्याजवळ राहिला.

दुपारच्या वेळीं स्वामीभक्त देवदर्शनास चाललें असतां त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्यांना मारावयास हातांत मोठ–मोठें दगड घेऊन तो त्याच्यामागें धांवूं लागला. स्वामीभक्तांनीं ते पाहून स्वामींचा नामघोष चालविला. आणि काय आश्चर्य त्याच्याच शिरांवर दगडाचा मार बसल्या–प्रमाणें किमयागार मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला! पुढें स्वामीभक्तांनीं चालविलेल्या स्वामींच्या नामगजरानें त्यास लौकरच शुद्ध आली. आपण चुकल्याचें कबूल करून त्यानें स्वामींचा मोठेपणा मान्य केला. त्यानतर यतिसह सर्वांनीं गंगा स्नान केले. पण आतां सद्गुरूदर्शनावांचून आपण अन्न ग्रहण करणार नाहीं, असे यतीनें सांगितलें.

यथावकाश यतिसह सर्वजण अक्कलकोटला पोंहचलें. त्यावेळीं श्रीस्वामी समर्थ तेथील खासबागेंत आपल्या सर्व शिष्यसमुदायासह बाल-लीला करण्यांत गर्क झालें होतें. यतिमहाराजांनीं स्वामींच्या पुढें फळें वगैरे ठेवून त्यांना नमस्कार घातला. तेव्हां त्यास एका वृक्षाच्या पलिकडें आपली किमया पाहण्यास सद्गुरूंनीं सांगितलें. तेव्हां तिकडें पाहातांच यतीस त्याबाजूच्या लिंबाच्या झाडांतून सोन्याचा रस स्त्रवत असून सर्वच भूमि सोन्याची झाली असल्याची दिसली. त्याचा अंगातील अहंभाव नष्ट झाला आणि त्याच्या हृदयांत "सच्चिदानंद प्रकट झालें. स्वामींनीं त्याच्यावर

अनुग्रह करून त्यास भगवें वस्त्र व मृगाजीन अर्पण करून माहुरगडी जाऊन राहण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें तो माहुरगडी निघून गेला. येथें हा 'किमयागार स्वामीकथानक' तेरावा अध्याय पूर्ण झाला आहे.

# ॐ अध्याय चौदावा ॐ

## अन्नपूर्णासिद्धीदर्शन

**स्वामीलीला अनंती अनंत । सरतां न ऐकता जन्म शत ॥**

श्री स्वामी समर्थांच्या अनंत लीला आपण ऐकत राहिलों आणि आपलें शभर जन्महि सरलें, तरीहि त्या लीला ऐकून सपणार नाहींत असें श्री आनंद भारती महाराज म्हणतात.

आपल्या भक्तांची संकटें दूर करीत आणि त्यांचा उद्धार करीत श्रीस्वामीसमर्थ रामपूर नांवाच्या गांवीं आले. त्यांनीं त्या गांवीं सोळा दिवस मुक्काम केला. तेथें पाटील रावजी नांवाचा एक ब्राम्हण स्वामीभक्त होता. त्याची नातेवाईक विठाबाईचीहि स्वामींवर भक्ति होती पूर्वी एकदा त्या ब्राम्हणानें श्रीस्वामींच्या प्रित्यर्थ चाळीस ब्राम्हणांना भोजन घालण्याचा नवस केला होता. स्वामी आपल्या गांवीं आल्यानें आतां अनायसे आपणास नवस फेडण्याची संधी लाभल्याची पाहून त्याला आनंद झाला परंतु गांवातील सर्व ब्राम्हण धरून चाळीस झाले त्या गांवांत अधीक कोणी ब्राम्हण नव्हतेच

दुसरे दिवशीं प्रभात समयीं विठाबाईने स्नान करून स्वयपाकाची तयारी केली आणि मध्यान्हापर्यंत स्वयपाकहि तयार झाला. त्यानंतर स्वामींना बोलावून आणून त्यांना मंगलस्नान घालून त्यांची षोडशोपचारे पूजा केली आणि त्यांच्यापुढे नैवद्य आणून ठेवला. परंतु तोपर्यंत निमंत्रित चाळीस ब्राम्हणांच्या दुप्पट ब्राम्हण आले आणि त्यांची संख्या वाढतच चालली. आजुबाजूच्या खेड्यातील आणि सोलापूरहूनहीं लोक श्रीस्वामींच्या दर्शनास येऊं लागलें. पण श्रीस्वामींनीं प्रथम सर्वांस अन्न घाला, नंतर आपण जेवणास बसूं म्हणून सांगितलें. स्वयपाक चाळीस लोकांचाच केला होता, तो एवढ्या लोकांना कसा पुरणार याची पाटीलांस चिंता पडली. स्वामी समर्थांनीं त्याच्या मनांतील चिंता जाणली आणि विठाबाईस

बोलावून तिच्याकडून एक टोपली आणली. त्यानंतर त्या टोपलीमध्यें स्वयंपाकगृहांत तयार केलेले भात, भाज्या, वरण, तूप, खीर, वडे, पापड, कुरूडया, पुरणपोळया, चटण्या, कोशिंबिरी, पंचामृत, रायती वगैरे पदार्थ भरलें आणि टोपलीवर देवीची धातूची मूर्ति ठेवून तींजवळ खंडोबादि देवाचें टांकहि मांडलें. त्या अन्नावर शालिग्रामाची स्थापना करून त्यांनी पाटील उभयतांकडून त्या अन्नपुर्णेची पूजा करून घेतली. त्यानंतर तीं टोपलीं विठाबाईच्या डोक्यावर ठेवून त्यांनी तिला तुलसीवृंदावनाभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालण्यास सांगितल्या व ती टोपली आसनाजवळ ठेवण्यास सांगितली. श्रीची आज्ञा घेवून नंतर पंक्ति वाढण्यात आल्या. पहिल्या पंक्तीस चारशें माणसें बसलीं. जेवण वाढतांना पाठीमागें स्वयंपाकगृहाकडे पाहायचें नाहीं म्हणून स्वामींनीं त्यांना सांगितलें. स्वामीनामाचा जयजयकार करून लोकांनीं भोजनास आरंभ केला. पहिली पंक्ति पोटभर जेवून उठल्यानंतर पाटीलांनीं व इतर वाढणाऱ्यांनीं स्वयंपाकगृहांत जाऊन पाहिलें तर जेवढें अन्न शिजविलें होते तेवढें तसेंच शिल्लक होतें. मध्यान्ह रात्रीपर्यंत पंक्तीवर पंक्ती उठत होत्या. त्यानंतर स्वामी, पाटील, विठाबाई, सेवेकरी वगैरेंची जेवणें झालीं. चाळीस पात्रांचें भोजन चार हजारांहून अधिक लोकांना पुरलें शुद्रादिकांना वाटूनहि दिलें, तरीहि उरलें. शेवटीं दुसरें दिवशीं सकाळीं पुन्हा प्रसादास राहिलें.

अशाच प्रकारची दुसरी एक स्वामीसमर्थांची लीला श्रीआनंद भारती महाराजांनी विद्वांसांना निवेदन केली आहे.

भगवंत नांवाचा एक सुतार स्वामींचा निःसीम भक्त होता. स्वामी समर्थ त्याच्या घरीं जाऊन कधी कधी राहात असत. त्यानें आपल्या शेतांत एक नवीन विहिर खोदली, विहिरीस विपुल पाणी लाभलें. सद्गुरूना आपल्या शेतांत नेऊन भोजन घालावें, असा भगवत सुतारानें एकदां विचार केला. त्या प्रमाणें सुतारानें त्यांना आपल्याकडे येण्याविषयीं विणविलें. भगवन अनेक वेळा,स्वामींच्याकडें गेला,पण स्वामी कांहीं आलें नाहीं. शेवटीं म्हसवडकर, सबनीस वगैरे भक्त मंडळींनीं स्वामींना सुताराच्या मळ्यांत आणलें. ब्राम्हणांनी स्नान वगैरे उरकून भोजन तयार केलें. स्वामींना स्नान घालून

त्यांची यथाविधी पूजा करण्यात आली. त्यानंतर पानें वाढण्यात आली. तोच सेतेकरी व इतर भक्त त्या ठिकाणीं आले. आता एवढ्या लोकांना भोजन कसें घालावयाचें याचीं सुतारास काळजी वाटूं लागली. पण स्वामींचें नांव घेऊन त्यानें सर्वांची पानें वाढलीं आणि स्वामीच्या अगाध लीलेनें पांच पात्रांना पुरेल एवढें केलेले अन्न पन्नास लोकांनी पोटभर जेवूनहि उरलें. शेवटीं भगवंत सुनाराने प्रसाद ग्रहण केला. सर्व लोक स्वामीच्या नांवाचा जयजयकार करून आपापल्या घरीं गेलें.

या ठिकाणीं ' अन्नपूर्णासिद्धिदर्शन ' नांवाचा चौदावा अध्याय समाप्त झाला आहे.

## ✱ अध्याय पंधरावा ✱

### समाधियोगसारकथन

**ऐशी अमूल्य योग संपती । लाभेल तो नर धन्य ॥**

अशी अमूल्य योगसंपत्ती श्रीआनदभारती महाराजांनी ह्या ' समाधि-योगसारकथन ' नांवाच्या पंधराव्या अध्यायांत श्री गोपाळराव विद्वांसांकरवी भक्तजणांच्या स्वाधीन केली आहे.

श्री ज्ञानदेवांच्या पुण्याईनें पावन झालेल्या इंद्रायणीच्या कांठावरील आळंदीच्या पुण्यक्षेत्रांत नृसिह सरस्वती नांवाचें सकलशास्त्र प्रवीण थोर यति राहात होतें. योगसाधनेच्या प्राप्तीसाठीं त्यांचे अहर्निश प्रयत्न चालले होतें, त्यांनीं पुष्कळ ज्ञान मपादित केलें, पुष्कळ साधनांचा अभ्यास केला, पण तरीहि त्यांना परिपूर्णता लाभल्याचा आनंद झाला नाहीं. पूर्णता मिळवून देणारें सद्गुरू त्यांना भेटले नाहींत. येथपर्यंत कथा सांगून झाल्यानंतर विद्वांसांनीं सद्गुरू श्री आनंद भारती महाराजांना समाधियोग निश्चित कोणता, मानव शरीर रचना कशी आहे, योगसाधना कशी लावावयाची, प्राण आकर्षण कसें करावयाचें वगैरे विचारलें. सद्गुरू सांग लागलें.

प्रत्यक्ष अनुभवाचा लाभ झाल्यानेंच माणसाला ज्ञान प्राप्त होतें. आकाश, पाणी, अग्नी, वायु व पृथ्वी ह्या पंचमहाभूतांनीं शरीर बनलें आहे.

सर्व प्राणीमात्रांना मूळ आदिशक्तीने निर्माण केलें आहे. आपल्याबरोबर 'सोऽहं' ध्वनी निर्माण करून तिनेंच ब्रम्ह सगुण केलें आणि नाद ब्रम्ह बनविलें. त्या आदिशक्तीनें सगुणाकाशांत मूलांश निर्मून परमाणू बनविलें. अशा परमाणूंनीं सृष्टी रचिली. वायु आकाशतत्त्वांत जन्मला असला तरी आकाश व वायु भिन्न भिन्न आहेत. परमाणूस गति प्राप्त होऊन वायुचा वेग वाढला तसें अग्नितत्त्व किंवा दैदिप्यमान तेज व्यक्त झालें. परमाणू एकत्र येऊन त्यांना जडत्व प्राप्त झालें, ते घनदाट बनलें आणि जलतत्त्व निर्माण झालें. जलांत परमाणूंची घनता वाढत गेली, जडत्वहि वाढूं लागलें, तसे पृथ्वीतत्त्व निर्माण झालें. पंचतत्त्वांचें मिश्रण होऊन सृष्टी निर्माण झाली. चर जिवांना ज्ञान देऊन त्यांना मायेंत, मोहांत व भ्रमांत गुंतविलें, त्यामुळें सर्वव्यापी परमात्मा आपला जिवात्मा असूनहि माणसांना भ्रमामुळें त्याची ओळख पटेना.

नरजन्मामध्यें जन्ममरणाच्या फेऱ्यांतून निरंतर सद्सद्विचार करून मुक्त होतां येतें. माणसांचें चित्त सुस्थिर होतें, तेव्हां त्याच्या जीवनांत समता निर्माण होऊन जिवाशिवाची एकी घडतें. अशा ज्या स्थितींत माणसाला आनंद प्राप्ति होतें, तीच समाधी होय. समाधी सारखा स्वानंदाचा मार्ग जगांत दुसरा कोणता नसल्यानें मुमुक्षुजन समाधी योगाचा अभ्यास करीत असतात. मनांतील असंख्य विचार नष्ट करून मन अगोदर एकाग्र झालें पाहिजें. समाधी हा सर्व विचारांचा मुख्यार्थ बनला पाहिजे. अशाप्रकारे चित्ताच्या एकीकरणास योगसाधन म्हणतात. यमनियम, प्राणायाम, इंद्रियाकर्षण, प्रत्याहारध्यान वगैरे योगसाधनेची अष्ट अंगें असून या अंगांचा दृढ अभ्यास केल्यानें मनुष्य समाधी स्थितीस लौकर पोंहचतों. मानवी शरीर हे अस्थी, मांस, शुक्र, मज्जा, वगैरे सात द्रव्यांनीं बनलें असून त्याचा व्यापार पंचमहाभूतात्मक असतों.

जिव हा 'अहम्' असून शरीर हे त्याचें राव व इद्रियें उमराव आहेत. मनाकडें विचार, चित्ताकडे स्मृतिभांडार व बुद्धीकडे निर्णय अशा विनियोगाची आज्ञा जिव देत असतो या अहंरूपी जिवाचा पिता परमात्मा असून आदिशक्ति ही त्याची माता आहे. गाढ निद्रा अथवा सुषुप्ति अवस्था, स्वप्न अवस्था व जागृति अवस्था अशा शरीराच्या तीन प्रमुख अवस्था

आहेत. या तिन्हींहून समाधी अवस्था भिन्न आहे. पूर्ण समाधी लागल्यानंतर इद्रियांचा व्यापार स्थिरावतों, अहंकारहि नष्ट होतों, रक्तभिसरण थांवतें, त्यामुळें आहार करण्याचीहि आवश्यकता राहात नाहीं. ब्रम्हतादात्म्य समाधीत तर सर्व शरिर काष्ठवत् होऊन अगाभोंवतीं वारूळ वाढतें, तरी जीवात्म्यास त्याचें भान राहात नाहीं, अशा समाधीयोगाची साधना सद्‌गुरूंच्या कृपेवांचून होणें अशक्य होय.

योगसाधनेच्या अष्टांगांत कर्ममार्गास सर्वप्रथम प्राधान्य आहे. मनांतील चंचलता, शरिराची वासना आणि वृत्तीतील अहकार क्षीण होऊं लागलें कीं, शरीर स्थिरावूं लागतें. अशा प्रकारची सिद्धता प्राप्त आसन अणुमात्रहि ढळूं देतां कामा नये. एकांत ठिकाणीं एखादें स्थळ पाहून त्या स्थळाची शुद्धि करावी, नंतर त्यावर दर्भासन घालून त्यावर मृगाजीन घालावें, त्यानतर शरिरशुद्धि करून कार्यसिद्धीसाठीं विधीपूर्वक आसन घालून बसावें; त्यानंतर पद्मासन, कुक्कुटासन वगैरे क्रमवार योगासने करून देह स्थिर करावा, योगाभ्यासाचा जो मूळ वर्म प्राणायाम तो करून वायुस अंकित ठेवतात, त्यानंतर इष्ट ध्यान लावून सुस्थिर होऊन बसतात, या अवस्थेस 'धारणा' म्हणतात. अशाप्रकारें ध्यान करणारा ध्येय आणि ध्यानरूप होऊं लागला कीं, त्यास दिव्य दृष्टि प्राप्त होतें. त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात आणि एका जागीं बसूनहि सर्व विश्वाच्या घडामोडी समजतात. परंतु जोंवर आत्मसौख्य लाभत नाहीं, तोंवर ही समाधी अपूर्णच राहातें. सद्‌गुरुकृपा न झाल्यामुळें कित्येक योगीयांची मजल येथवर येऊन कुंठित झाली आहे.

**ध्याता ध्यान आणि ध्येय । त्रिपुटीचें होवोनि ऐक्य**
**ब्रम्हरंध्रीं प्रवेश निर्भय । होऊं शके जीवात्मा ॥** (अ. १५-६८)

ध्यान आणि ध्येय या द्विदलाचा भेद जाणून ध्यायला सद्‌गुरूचीच कृपा पाहिजे. अशी कृपा झालीं कीं, जीवाशीवाचें द्वैत विरून जाऊन जीव परमेश्वरमय बनतों, तादात्म्य पावतो. आपल्या मनांत ब्रम्हतादात्म्याची कामना ठेवून साधना करणारे योगी सद्‌गुरूकृपेनें 'राजयोगी' बनतात.

येथवर श्री सद्‌गुरू आनंदभारती महाराजांनीं समाधियोग स्थूलपणे सांगून पुढें श्रीनृसिंहस्वामींची राहिलेली कथा पुढें सांगण्यास सुरुवात केली.

आळंदीच्या पुण्यक्षेत्रांत राहणाऱ्या नृसिंहस्वामीनीं स्वप्रयत्नानें योगाभ्यासाची पुष्कळ साधना केली होती, परंतु द्विदल भेद करून त्यांना ब्रम्हरंध्री अभेद प्रवेश करणें साध्य होत नव्हतें, त्यामुळें ते उदासीन झाले होतें. त्याच वेळीं अक्कलकोटनिवासी श्रीदत्तावतार स्वामीसमर्थ महाराजांची कीर्ति त्यांच्या कानीं गेली. तेव्हां ते त्यांच्या दर्शनास अक्कलकोटला गेलें. त्यावेळीं स्वामी समर्थ महाराज 'भंडारखाना' नांवाच्या एका ठिकाणीं बसलें होते. नृसिंह-स्वामींना समोर पाहातांच ते योगविद्येवरील स्पष्टिकरण करणारें श्लोक आकस्मिक म्हणूं लागलें. द्विदल चक्राचा भेद करून ब्रम्हरंध्राची वाट धरून सहस्त्रदलांत प्रवेश कसा करावयाचा याचें गुह्य त्यांनीं प्रकट केलें आणि नृसिंहस्वामींवर आपली कृपादृष्टि टाकली. तात्काळ नृसिंहस्वामींना समाधी लागली. प्रहरानंतर समाधी उतरल्यानतर नृसिंहस्वामींनीं सद्गुरूचें चरण धरलें. त्यानंतर स्वामींची आज्ञा घेऊन ते आळंदीस परतले. येथें 'समाधि-योगसार कथन' हा पंधरावा अध्याय समाप्त झाला आहे.

## * अध्याय सोळावा *

### पंडितगर्वहरण

**सद्गुरूमहिमा अगाध परम । दर्शनमात्रेंचि होय काम**
**निजानंद गुह्य परम । सहज ठाई पडतसे ॥** (अ. १६-१०)

अशाप्रकारें सद्गुरूंचा महिमा सांगून पडिताच्या गर्व हरणाचा कथा-भाग सांगणारा हा सोळावा अध्याय आहे. पंधरा अध्याय श्री गोपाळराव विद्वांसांच्या करवी पूर्ण करून घेतल्यानंतर श्री आनंद भारती महाराजांनीं मार्गशीर्ष शु।। ६ (चंपाषष्ठी) शके १८२३ रोजीं समाधी घेतलीं. श्री. विद्वांस आतां हातीं घेतलेलें कार्य सद्गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय पूर्ण कसें करावयाचें या विवंचनेंत होतें, तोंच एकदां महाराजांनीं त्यांना दृष्टान्त देऊन पुढील सहा अध्याय आपल्या समाधीस्थानीं ( श्री लक्ष्मीनारायण मंदिर, ठाणें, येथें ) पूर्ण करण्यास सांगितलें. तेव्हां पुन्हां शके अठराशें चोवीसच्या आषाढापासून ग्रंथलेखन पुढें चालवून त्यांनीं आषाढ कृष्ण एकादशीस ग्रंथ पूर्ण केला.

श्री स्वामीसमर्थ महाराज एकदा देशमुखांच्या घरीं अक्कलकोट येथें आनंदांत बसलें असतां यांच्या दर्शनार्थ एक वृद्ध मुसलमान आला. तो मोठा धार्मिक असून सत्यशोधक आणि विद्वान असा होता. त्याला स्वजातीविषयीं दुराभिमान नव्हता, तसेंच परजातीबद्दल त्याच्या मनांत द्वेषहि नव्हता. सत्पुरुषांवर त्याची अत्यंत भक्ति होती. त्या निराभिमानी भक्तियुक्त अंत:करणाच्या मुसलमानास पुष्कळ देश पर्यटण करून हि परम शांतीचा लाभ झाला नसल्यामुळें त्याच्या मनास तळमळ लागून राहिली होती. अशा वेळीं सद्गुरू स्वामी समर्थांची कीर्ति त्याच्या कानीं आली. तेंव्हां तो अक्कलकोटला स्वामींच्याकडे आला. स्वामींची आणि त्याची दृष्टभेट होतांच तात्काळ परम शांतीचा लाभ होऊन त्यास समाधी लागली. दोन प्रहरांनंतर पूर्व स्थितीला आल्यानंतर त्याने सद्गुरूचें चरण धरलें आणि आपल्या आनंद अश्रूंचा सद्गुरुंच्या चरणावर अभिषेक केला. सद्गुरूंनीं प्रसन्न होऊन अनुग्रह केला आणि नंतर त्याला गांवीं जाण्याची आज्ञा दिली.

ह्या अध्यायामध्यें दुसरी एक कथा सांगितली आहे. एकदां मोंगल देशांतून एक ब्राम्हण स्त्री आपल्या एकुलत्या एक अंध पुत्रास घेऊन स्वामींच्या दर्शनास आली. तिने आपल्या पुत्रास स्वामींच्या चरणावर घातलें आणि स्वामींच्या चरणांपाशीं बसून ती रडूं लागली. मौजीबंधनापर्यंत आपल्या मुलांस चांगलें दिसत होतें; पण त्यानंतर त्यास अधत्व आलें. तेव्हां स्वामी महाराजांनीं दया दाखवून आपल्या पुत्रास नेत्रदान करावें म्हणून तिनें करुणा भाकली. तेव्हां स्वामीनीं तिला सांगितलें. "तूं दु:ख मुळींच करूं नकोस. आतांच माझ्याकडे मला शास्त्रांत–वादांत पराभत करण्याचा अभिमान बाळगून पांच महापंडित येणार आहेत. त्यावेळीं तुझा पुत्र तात्काळ डोळें उघडील !" कांहीं वेळांतच स्वामीकडे ते पांच पंडित आले, पण त्यांनीं स्वामींना वदन वगैरे कांहीं न करतां ते स्वामींच्या पुढें येऊन बसलें आणि त्यांनीं स्वामींशी वादविवाद सुरू करण्याचा मनांत विचार केला. तोंच स्वामीं त्या अंध मुलास म्हणाले, "हे मुला, तूं ह्या पंडितांच्या मनांतील वादविवादाचे प्रश्न सांगून त्यांची उत्तरेंहि त्यांना देऊन टाक." त्या मुलानें उठून स्वामींचें चरण धरलें आणि तो बोलूं लागला, "स्वामी

महाराज, मी अगोदरच दोन्ही डोळयांनीं अंध झालों आहे, तसोतच मी अज्ञानी व विद्याहीन असा आहे, तेंव्हां ह्या थोर पंडितांशी मी काय आणि कसें बोलूं ? "

स्वामींनीं उठून आपल्या गळयांतील माळ काढून त्या मुलाच्या गळयांत घातली आणि एक झेडूचें फूल घेऊन त्याच्या दोन्हीं डोळयांस लाविलें– तो काय चमत्कार झाला– त्या मुलास दिव्य दृष्टी प्राप्त होऊन तो त्या पंडिताचेंबरोबर वादविवाद करू लागला. पंडितांच्या सर्व प्रश्नांचें त्यांनें खंडण केलें. ते पाहून त्या गर्विष्ट पंडितांनीं आपल्या माना खाली घातल्या आणि सद्गुरूचें चरण धरलें आणि त्यांनीं स्वामींची क्षमा मागितली. सर्वांनीं स्वामींचा जयजयकार केला. त्या ब्राम्हण स्त्रीनें स्वामींना नमस्कार घातला. यथें ' पंडित गर्व हरण ' नांवाचा सोळावा अध्यायसमाप्त झाला आहे.

# ☼ अध्याय सतरावा ☼

## -- भक्त संकट निरसन–

**सद्गुरूमहिमा रसायन । प्रेमें करितां तत्सेवन ।**
**भवरोग तात्काळ होय शमन । नलगे अवधी तयासी ॥**[अ.१७-८]

असा उपदेश श्री आनंद भारती महाराजांनीं दृष्टान्तरूपानें श्री. विद्वांसांना ह्या सतराव्या ' भक्त संकट निरसन ' अध्यायाच्या प्रारंभी केला आहे. आपल्या संसारीक अडीअडचणींनीं आणि व्याधींनीं श्री. विद्वांस अतिशय त्रासलेलें होतें, अशा वेळीं त्यांनीं श्री आनंद भारती महाराजांची करूणा भाकली- त्यावेळीं त्यांना महाराजांनीं तूं सद्गरूलीला श्रवण करींत राहाशील तर इहलोकींच्या सर्व दुःखातून मुक्त होऊन सुखी होशील असें सांगितले आहे.

अक्कलकोटला श्री स्वामीसमर्थ महाराजांचा जाधव नांवाचा एक घरंदाज आणि अत्यंत नम्र असा भक्त होता. त्याची गृहस्थिती मध्यम होती. त्याला पत्नीहि सुदैवाने गुणी लाभली होती, पण पोटी संतान नव्हतें. कालांतरानें त्याची पत्नी मरण पावली, तेंव्हां दुसरे लग्न करून घेण्यासाठीं

त्यानें स्वामींची आज्ञा मागितली, परंतु स्वामींनीं त्याला नकार दिला तेंव्हा आपला संसार ब्राह्मणांना दान करून अंगावरील वस्त्रानिशीं घराबाहेर पडून तो स्वामींच्याकडे आला. जाधवांची भक्ति पाहून त्याच्यावर अनुग्रह करून स्वामींनीं त्याच्याकडून गुरुसेवा घडविली. एकदां सद्गुरूंची सेवा करीत जाधव बसला असतां त्यानें स्वामींना आपल्याला देवाघरचें बोलावणें आल्याचे सांगितलें. तात्काळ जाधवासमोर आक्राळ भेसूर असें यमदूत दिसू लागलें आणि ते त्याच्याभोवतीं आपला मृत्यूपाश आवळण्याच्या तयारींत उभे होते. जाधवानें सद्गुरूचे चरण पकडलें आणि त्यांची पूर्ण सेवा हातून घडल्याशिवाय आपणास निरोप देऊ नये म्हणून आळवणी केली. सद्गुरूनीं प्रसन्न होऊन त्याला पोटाशी धरलें आणि यमदूतांना समोर असणाऱ्या एका बैलास घेऊन जाण्यास सांगितले. तात्काळ तो बैल एक गिरकी घेऊन जमिनीवर कोसळला व गतप्राण झाला. स्वामींचा अगाध महिमा पाहून सर्वांनी त्यांचा जयजयकार केला.

भैदर्गी गांवांत स्वामीचा एक मूसलमान भक्त होता. तो तुरुंगाच्या रक्षकावर जमादार होता. एके दिवशीं सध्याकाळीं रक्षक कैद्यांना तुरुगांत कोंडण्यासाठीं घेऊन आलें. एकेक कैद्याला त्यांनीं तुरुगात कोंडून घातलें, पण त्यांतील एक कैदी कोणालाहि जरा सुद्धां संशय येऊ न देतां सर्वांची नजर चुकवून निसटून पळाला. रात्री सर्व कैदी मोजतांना एक कैदी कमी झाल्याचें समजून आलें. कैदी फरारी झाल्याची जोखीम रक्षकांच्यावर होती, तरीं तो वृद्ध जमादार सर्वस्वी जोखमदार होता. आपल्या वृद्धापकाळपर्यंत चांगल्या प्रकारें नोकरी करून आतां हा भयंकर गुन्हा केल्याचा ठपका आपणावर येणार असल्याचें पाहून जमादार अत्यंत दु:खी–कष्टी झाला. आता स्वमी समर्थांचेंशिवाय आपणांस ह्या संकटातून सोडविण्यासाठीं कोणी त्राता नाही म्हणून जमादारानें स्वामीची आराधाना सुरुं केली. सद्गुरूनीं आपलें हे संकट दूर केलें तर–

**तात्काळ देऊनि राजीनामा । सवेंचि जाइन स्वामी आश्रमा**
**सांपडुनि सद्गुरुप्रेमा राहीन तत्पर सेवनीं ॥**

असा निर्धार करुन जमादार स्वस्थ राहिला.

इकडे तो कैदी तुरुंगापासून खंदकाच्या मार्गानें पळून चालला असतां त्याच्यासमोर एक उग्र स्वरुपाचा महातेजस्वी असा यति येऊन उभा राहिला. त्याला भिऊन जाऊन कैद्यानें दुसरा मार्ग धरला, तेथेंहि समोर पाहातों तो तोच यति ! जिकडून जावें त्या मार्गासमोर तोच यति ! शेवटीं तो घाबरून जाऊन जमिनीवर निश्चेष्ट पडला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं एका रक्षकास तो कैदी तेथें पडलेल्या स्थितीत सांपडला. ताबडतोब त्यानें त्यास पकडून आणून जमादाराच्या स्वाधीन केलें. स्वामीच्या कृपेनेंच आपणांस फरारी झालेला कैदी सांपडल्याचें पाहून तात्काळ जमादारानें आपल्या नोकरीचा राजिनामा देऊन मैंदर्गी सोडून जमादार अक्कलकोटला स्वामींच्याकडे गेला आणि तेथें राहून स्वामींची भक्ती करूं लागला.

त्यावेळीं स्वामींच्याजवळ चोळप्पा नांवाचा एक अत्यंत स्वामिनिष्ठ भक्त होता, तो त्या जमादारास धड जेवूंहि घालेना. त्यानें जमादारास स्वामींच्या पासून दूर बसण्यास सांगितलें. जमादार आपणांपासून दूर बसल्याचें जाणून स्वामींचें मन कळवळलें, त्यांनीं त्यास आपल्या पादुका देऊन मैदर्गीस जाऊन त्यांची स्थापना करून राहाण्यास सांगितले.

चोळप्पा महाराजांचे सर्व शिष्यांत अत्यंत आवडते शिष्य होतें, म्हणूनच महाराज त्यांच्यावर हरघडीं रागावत असत, तसेंच त्यांना प्रेमानें जवळहि करीत. परंतु महाराज रागावलें म्हणून चोळप्पांना कधींहि वाईट वाटत नसें आणि महाराजांनीं त्यांना आपल्या हृदयाशीं कवटाळिलें म्हणून सर्व शिष्यांत आपणच मोठें आहोंत, असा व्यर्थ अहंभावहि त्यांनीं कधीं मिरविला नाहीं. त्यांना महाराजांच्या परम निरपेक्ष सेवेवांचून स्वत:च्या देहाची जिथें आसक्ति राहिली नव्हतीं तिथें इतर गोष्टींबद्दल काय सांगावें ? महाराज स्वत· चोळप्पाच्या घरीं राहून त्यांचीच सेवा मानून घेत असत. महाराजांनीं समाधी पण त्यांच्याच घरीं घेतली. महाराजांच्या नाम-संकीर्तनांतच चोळप्पांनीं पुढें देह ठेविला. आज अक्कलकोट येथील महा-राजांच्या मठांची सेवा चोळप्पांचें पुत्रपौत्र परंपरेनें आणि समर्थांच्या कृपेनें करीत आहेत.

जमादार मैंदर्गीस स्वामींच्या पादुका घेऊन घरीं आला आणि त्यांची आपल्या देव्हाऱ्यांत स्थापना करून नित्यनियमानें पूजा-अर्चा करूं लागला. परतु हिंदुच्या वहाणा आपल्या देव्हाऱ्यांत ठेवल्या तर आपलें ज्ञातिबांधव आपणांस वहिष्कृत करतील म्हणून त्याच्या बायकोनें व मुलानें त्यास त्या पादुकासह घराबाहेर काढलें. शेवटीं गांवाबाहेर एका झोपडीत जाऊन जमादार राहिला आणि तेथें त्यानें त्या पादुका स्थापिल्या. स्वामींच्या कृपेमुळें त्याच्याकडे आधिव्याधिग्रस्त लोक येऊं लागलें. त्यानें पादुका-खालच्या दिलेल्या मातीनेंहि महारोगी बरें होऊं लागलें. तेव्हां त्याची सिद्धपुरुष म्हणून चोंहिकडे कीर्ति पसरूं लागली. जमादार सर्वसगपरित्याग केलेला आसक्ति-विरहित होता, तरी त्याचें भक्त त्याच्यापुढें धनाच्या राशी ओतूं लागलें. पुष्कळ भक्तमंडळीं जमूं लागली. पुढें त्याच्या बायका-मुलांनीं त्यास पादुकासह घरीं नेलें. तो नित्यनियमित अक्कलकोटला जाऊन स्वामींचें दर्शन घेऊन येत असें. स्वामींनीं त्याचें नांव 'पीरसाहेब' असें ठेविलें होतें. या ठिकाणीं 'भक्तसंकट निरसन' नांवाचा सतरावा अध्याय समाप्त झाला आहे.

# अध्याय आठरावा

## — श्री चिदांबर दीक्षिताख्यान —

"जैसा जयाचा अधिकार । तैसाचि तया लाभे साचार
मुमुक्षूसी साक्षात्कार । दावोनि जोडिले अध्यात्मीं ॥
सकामासी काम्यदान । निष्कामासी शांती निधान ।
वांछित जया योगसाधन । मार्ग दाविलें तयांसी ॥"

(अ. १८–१९।२०)

श्री स्वामी समर्थांनी ज्यांच्यावर अनुग्रह करून उद्धार केला, त्या भक्तजणांची हकिकत या अध्यायांत सांगितली आहे.

चोळाप्पा हा स्वामींचा प्रारंभीचा भक्त. एखाद्या सुपुत्रानें आपल्या आईबापांची सेवा करावी तशी त्यानें स्वामींचीं सेवा केली. तो स्वामींच्या कसोटीला उतरला आणि त्यामुळें निर्धनाचा धनवान झाला व तो स्वामींचा एकनिष्ठ भक्त बनला आणि स्वामींच्या अनुग्रहानें त्याचें जीवन कृतार्थ झालें. स्वामींचें बाळाप्पा, नरसाप्पा, श्रीपाद, जाधव आणि भीमराव हेहि परमभक्त होतें. भीमरावाच्या मस्तकावर एक आवाळ वाढलेले होतें, त्यामुळें ' द्वीशीर्ष ' ( दोन डोक्याचा ) म्हणून लोक त्याची चेष्टा करीत असत. सद्‌गुरुनीं स्वप्नांत एकदां त्याच्या मस्तकास स्पर्श करून त्यास एकशीर्षी बनविलें. त्याचेंशिवाय महादेव बाबा यादव, परशुराम, गणपतराव हे पण महाराजांचें भक्त होतें. स्त्री–भक्तांमध्यें शिऊबाई, सुंदराबाई, राणीसाहेब (अक्कलकोट) ह्या भाविक स्त्रीयां स्वामींची भक्ति करीत असत. पूर्वसंचितामुळें सुंदराबाईस स्वामींची कृपा लाभली. पण तिला पुढें लोभाचा हव्यास वाढला आणि ती महाराजांच्या कृपाप्रसादास अंतरली, परंतु तरीहि तिचा उद्धार झाला ! ही संतकृपाच होय !

बाळाप्पा हा चोळप्पाप्रमाणेच महाराजांचा पट्टशिष्य होता. बाळाप्पा हा मुळचा कर्नाटकाच्या धारवाड जिल्ह्याच्या करंजगी तालुक्यांतील हावेरी गांवचा एक सुखवस्तु गृहस्थ. तिन्हींकाळ स्नानसंध्या करणारा आणि अतिथीच्या सेवेंत समाधान मानणारा हा यजुर्वेदी ब्राह्मण होता. त्याचा धंदा सराफाचा असून घरीं संपत्ती आणि संततीचाहि तोटा नव्हता. पण पुढें पुढें त्याचें मन उद्विग्न बनलें. कशांतच रममाण होईना ! आपल्या वयाची चाळीशी सुखासिनतेंत गेली, पण जन्माचें सार्थक कांहीं घडलें नाहीं, याचें त्यास दुःख वाटूं लागलें. त्यानें आपल्या ज्येष्ठ मुलीचा विवाह केला, मुलांचेंहि उपनयन केलें. त्यानंतर सद्‌गुरूभेटीसाठीं घराचा त्याग करून तो निघाला आणि ज्या पुण्यक्षेत्रीं मुरगुड गांवीं दीनोद्धारासाठीं भगवान श्रीशंकरानीं ' चिदांबरदीक्षित ' नामक अवतार घेतला, त्याठिकाणीं बाळाप्पा आला.

श्री चिदांबर दीक्षितांनीं जेव्हां यज्ञ केला आणि ब्राह्मण भोजन घातले, तेव्हां श्रीस्वामीसमर्थांनीं पक्तीस तुप वाढण्याचें काम केलें. मुरगुड गांवांत मल्हार दीक्षित नांवाचें एक वैराग्यशील धार्मिक सुखवस्तु ब्राह्मण होतें. पण पोटी संतान नसल्यामुळें त्यांना दु:ख वाटत असे. पुढें दीक्षित आपल्या गांवाहुन रामेश्वराकडे निघालें, वाटेंत त्यांना चिदांबरेश्वर नांवाचें महापुरातन शंकराचें मंदिर लागलें. शिवधामाचें दर्शन घेतांच दीक्षित अतिशय आनंदलें. मनाचा निर्धार करुन त्यांनीं तेथेंच तप आरंभिलें. बारा वर्षे तप पूर्ण झाल्यानंतर भगवान शंकर त्याच्यावर प्रसन्न झालें आणि त्यास आशिर्वाद देऊन म्हणाले, "तुझी भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहे, मी स्वत:च तुझ्या उदरीं तुझा पुत्र म्हणून अवतार घेईन. माझ्या अवताराची खूण म्हणून तुझ्या पुत्राच्या एका कानांत तुळशीचें पान व दुसऱ्या कानांत बेलाचें पान असेल. तूं इहलोकीं सुख भोगून माझ्याकडे येशील. आतां सुखानें घरीं जा." भगवान अंतर्धान पावलें. दीक्षित घरीं गेला. कांहीं दिवसांनी त्याची बायको गरोदर राहून पुढे पुत्र प्रसविली. जन्मतांच भगवानांनीं सांगितलेली खूण पटली. दीक्षितांनें त्याचें नांव 'चिदांबर' ठेविलें आठव्या वर्षी त्याचें मौंजीबंधन केलें. त्यानें अनेक लीला दाखवून पित्यास धन्य केलें.

एकदां मल्हार दीक्षित एका स्त्रीच्या घरीं गजगौरीव्रताची पूजा सांगण्यास जाणार होतें, परंतु कांहीं कारणानें त्यांना जातां आलें नाहीं, तेव्हां त्या स्त्रीनें चिदांबरास आपल्या घरीं नेलें. चिदांबरानें मातीचा एक हत्ती बनविला आणि पूजा सांगण्यास सुरूवात केली. त्याच्या मंत्रोच्चारानें तो मातीचा निर्जिव हत्ती सजीव झाला. हा अद्भुत चमत्कार पाहून ती स्त्री भयभीत झाली आणि घराबाहेर धांवून लोकांना हांका मारूं लागली. पुष्कळ लोक जमलें. प्रत्यक्ष शंकरांनीच वटुचा अवतार घेऊन जगाच्या उद्धाराचें कार्य हातीं घेतलें असावें असें त्यांना वाटूं लागलें. चिदांबराचा पिता धांवत आला आणि त्यानें वात्सल्यानें आपल्या पुत्रास कवटाळिलें– आईनें येऊन मुलावरून लिंबलोण उतरून टाकिलें आणि ती त्यास घेऊन घरीं गेली.

पुढें चिदांबर प्रौढ झाल्यानंतर त्यानें महायज्ञ केला. असंख्य ब्राम्हणांना भोजन घातलें. कांहीं पंक्ती उठल्यानंतर घरांतील तुप संपलें. तेव्हां भोजन वाढणारी मंडळी काळजीत पडली. 'आतां शंकरच तुप पुरविल', असें त्यांना सांगून चिदांबरानें पाण्याची एक कळशी तुपाच्या भांड्यांत ओतली, तो त्या पाण्याचें सर्व तुप झालें! ही अद्‌भुत लीला पाहून पाहाणारी मंडळी चकीत झाली! यज्ञ केल्यापासून लोक त्यास 'चिदांबर दीक्षित' म्हणूं लागलें.

त्या काळच्या ब्राम्हणी राज्याचा अंतक बाजीराव म्हणून होता, त्यानें प्रजेस अगदी त्राहि भगवान करून सोडलें होतें. त्यानें सूज्ञ मुत्सद्दी आणि शूरवीर यांना दूर करून तोंडपुज्यांना आणि नीचांना जवळ केलें होतें. जेथें राजकारण चालें, तेथें तो नाचरंग करूं लागला. पतिव्रतांच्या ऐवजीं वारांगणांना मान मिळूं लागला. सुविद्या, सात्विकता, दुरदर्शित्व, शौर्य नीति देशोधडीला लागली. नीतिमान लोक आपली अब्रु वांचविण्यासाठीं राज्य सोडून गेलें विद्वान लोकांची वर्षासनें गेली, ती कुटाळक्यांना, नीचांना मिळूं लागली. सुंदर स्त्रीयांची विटंबना होऊं लागली. एकदां हा बाजीराव चिदांबरांना भेटण्यास आपल्या लवाजम्यासह निघाला. ही वार्ता कळतांच इनामें व वर्षासनें जप्त झालेल्या व जुलूम जबरदस्तीनें गांजलेल्या लोकांनीं चिदांबरांच्याकडे धांव घेऊन बाजीरावाकडून आपणांस संरक्षण मिळण्यास त्यांना उपदेश करण्याबद्दल चिदांबरांना विणविलें. ही गोष्ट हेरांकडून बाजीरावास समजली तेव्हां त्यानें एक सप्त कलमबंदी चिदांबरांच्याकडे पाठविली, त्यांत लिहिलें होतें, "कोणाचाहि कैवार घेऊन आम्हांस भीड घालूं नये. आम्हांस तावडतोब भेटीनंतर निरोप द्यावा." चिदांबरांनीं ते मान्य करून श्रीफल प्रसाद घेऊन बाजीरावास बोलविलें. भेट झाल्यानंतर निरोप देतांना चिदांबर म्हणालें, "आपण चार दिवस राज्य करावें अशी आमची इच्छा होती, पण आपण तात्काल निरोप मागितला. जशी आपली इच्छा, तसें त्याचें फळ" निरोप घेऊन परततांच बाजीरावांचें राज्यहरण झालें. सत्पुरुषांचें वचन कधींच खोटें ठरत नाहीं. या ठिकाणीं चिदांबर दीक्षितांचें आत्मचरित्र पूर्ण झालें आहे व 'श्री चिदांबर दीक्षित अख्याना' चा हा अठरावा अध्याय समाप्त झाला आहे.

# अध्याय एकोणिसावा

## बाळाप्पावृत्त कथन--

" सद्गुरुकथा अमृतकुंडे । गुरूकृपेनेंच प्राशन घडे ।। "

( अ. १९-१०८ )

अमृतकुंडांनीं भरलेल्या ह्या सद्गुरूंच्या कथाचें प्राशन घडण्यास खरोखर सद्गुरूंचीच कृपा झाली पाहिजे. ह्या एकोणिसाव्या अध्यायांत बाळाप्पांची हकिकत सांगितलेली आहे.

श्रीनृसिंह सरस्वतीचें पुण्यक्षेत्र जे गाणगापूर तेथें जाऊन श्रींची भक्ति करीत आपलें उर्वरित आयुष्य कंठावें, असा हेतु मनांत धरून बाळाप्पा मुग्गोड गांवांत दोन-तीन दिवस राहून गाणगापूरास जाण्याचा विचार करूं लागला. परंतु श्रीस्वामी समर्थांच्या रूपांत साक्षात् श्रीदत्तगुरू प्रकट झाल्याचें ऐकून बाळाप्पानें गाणगापूराच्या ऐवजीं अक्कलकोटास जाण्याचें ठरविलें. बाळाप्पानें प्रथम योजिल्याप्रमाणें गाणगापूरासच जावें आणि त्यानंतर श्रीसद्गुरूंची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें वागावें, असा त्यास लोकांनीं उपदेश केला. त्याप्रमाणें बाळाप्पा गाणगापूरास गेला. भीमरथी नदीचें पवित्र स्नान, श्रीनृसिंहस्वामींच्या पदांची सेवा, संगमावर माध्यान्हापर्यंत अनुष्ठान रात्रीं गाणगापुरीं निद्रा, पहाटे संगमावर, मध्यान्हीं माधुकरी मागून एकवेळ भोजन अशा प्रकारें एक महिना उग्र अनुष्ठान केल्यानंतर श्रीदत्तगुरुनीं स्वप्नांत येऊन त्यास दर्शन दिलें. दोन महिनें असाच काळ गेल्यानंतर श्री स्वामीसमर्थांनीं त्यास स्वप्नांत येऊन दिगंबररुपांत दर्शन दिलें. त्यापूर्वी पधरा दिवस अगोदर एका ब्राह्मणानें स्वप्नांत येऊन त्यास अक्कलकोटीं जाण्यास सांगितले होतें.

दुसरे दिवशीं बाळाप्पानें अक्कलकोटास जाण्याची तयारी केली. आपलें नित्यक्रम आटपून तो माधुकरी मागण्यास बाहेर पडला. प्रत्येक घरीं त्यास मिष्ठान्न मिळत गेले. हा आपल्या प्रयाणास शुभशकुन समजून नैवेद्य श्रींना अर्पून व स्वतः भोजन करून श्रींना त्यानें साष्टांग नमस्कार

अनुक्रम..... ............... वि:
क्रमांक ....1432.... नों दि

घातला. तो जाण्यास निघाला, तो समोरून दोन सुवासिनी पाण्याच्या घागरीं घेऊन आल्या. मार्गाला लागल्यानंतर कांहीं वेळानें बाळाप्पाचें पाय जड झाल्यानें त्यास पुढें चालवेना. तेव्हां त्यानें श्रीस्वामी समर्थांची प्रार्थना केली. त्याच्या पायांतील जडत्व तात्काल नाहीसें झालें आणि त्यास शक्ति आली. त्यानंतर तो दुधनीं मुक्कामीं आला दुसऱ्या दिवशीं रामनवमीस तो अक्कलकोटला पोंहचला. त्यावेळीं श्रीस्वामी समर्थ खासबागेंत जमिनीवरच निद्रा घेत होतें. बाळाप्पानें त्यांचें चरण धरतांच त्यांनीं उठून त्यास आलिंगन दिलें. त्यानंतर नियमित स्वामीदर्शन घेऊन बाळाप्पा अनुष्ठान करूं लागला. असे दोन महिनें निघून गेलें आणि एकदां फुलें काढीत असतां त्याच्या बोटांत एक कांटा रूतला. त्या कांट्याचा नायटा होऊन त्याच्या बोटास ठणका लागल्या आणि अंगांत ताप येऊं लागल्यामुळें अनुष्ठानहि थांबलें. दुखणें कमी होण्यास कोणताहि उपचार चालेना. तेव्हां स्वामींची प्रार्थना करतांना स्वामींनीं त्यास बोटास म्हैशीचें मूत्र लावण्यास सांगितलें. बाळाप्पानें उपचार करतांच तात्काल सर्व वेदना नष्ट होऊन बाळाप्पा बरा झाला. पुढें बाळाप्पानें समर्थांच्या सेवेस स्वतःस वाहून घेतलें.

पुढें एकदां बाळाप्पाच्या नाभीस्थानांतून कळा लागून रक्तस्त्राव सुरुं झाला आणि नंतर एके दिवशीं नाभींतून शुभ्र पदार्थ बाहेर आला. बाळाप्पास तीन वर्षांपूर्वीं कोणीतरी मिष्टान्नांतून विष घातलें होते, ते स्वामींच्या कृपेनें बाहेर आलें. बाळाप्पाची भक्ति पाहून स्वामींचें त्याच्यावर प्रेम बसलें. बाळाप्पाचा सर्व वेळ सद्‌गुरुंच्या सेवेंत लागला. त्यामुळें सुंदराबाईस मात्र द्रव्यार्जन करण्यास फावलें, परंतु तिनें बाळाप्पाचा छळ सुरुं केला. त्यामुळें स्वामी समर्थांची आज्ञा घेऊन हनुमंताच्या मंदिरांत जाऊन बाळाप्पानें अनुष्ठान सुरुं केलें व तो ' स्वामी समर्थ ' ह्या पंचाक्षरी नामाचा जप करुं लागला. पुढें सुंदराबाईनें स्वामींच्या दर्शनार्थ येणाऱ्या यात्रेकरुकडून पैसे उकळण्यास सुरुं केलें. तेव्हां मुंबई सरकारकडें तक्रार जाऊन व्यवस्थेसाठीं पंच नेमलें गेलें आणि सुंदराबाईस हांकलून देण्यांत आलें. सुंदराबाईचा पापाचा घडा भरल्यानें स्वामी समर्थ तिच्याविषयीं कांहींच बोललें नाहींत. पंचानीं तात्काळ बाळाप्पास व चोळाप्पास

स्वामींच्या सेवेसाठीं बोलवून आणलें, पण व्यवस्था पंचानीं आपणाकडेच ठेवली. बाळाप्पाचें अनुष्ठान पूर्ण झाल्यानें स्वामींनी इतरांकडून ब्राम्हण-भोजन घातलें. पुढें बाळाप्पानें स्वतःस सद्‌गुरु सेवेसच वाहून घेतलें येथें 'श्रीस्वामीभक्त बाळापावृत्त कथन' नांवाचा एकोणीसावा अध्याय समाप्त झाला आहे.

# अध्याय विसावा

## श्री स्वामीसुताख्यान निरूपण--

"स्वामी महिमा अपरंपार । नये ब्रह्मादिकांपार
तेथे मी काय पामर । घालूं नभा गवसणी ।।"

( अ. २०–१९० )

सद्‌गुरुंचा अपरंपार महिमा ब्रह्मादिकांना जेथें समजला नाहीं. तेथें मी पामर तुला समजावून देऊन गगनाला गवसणी ती काय घालणार, असें श्री आनंदभारती महाराज विद्वांसाना सांगतात. ह्या अध्यायांत त्यांनीं 'श्रीस्वामीसुत अख्यान' सांगितलें आहे.

दक्षिण कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापुर तालुक्यांतील इटिया गांवीं एका कुलीन अस्सल घराण्यांत स्वामीसुतांचा जन्म झाला. त्यांचें वडिल दाजीसाहेब आणि आई काकूबाई. त्यांना आठ मुलें आणि चार मुली होत्या, तरीहि त्यांचें कुटुंब सुखवस्तु होतें. आठ वर्षाचें असतांना स्वामींना विद्याभ्यासाकरितां मुंबईस आणण्यांत आलें. सोळा वर्षापर्यंत शिक्षण घेऊन त्यांनीं नोकरी धरली. पण त्यांचें चित्त उदास बनत चाललें. पुढें गोविंद माधवजींनीं त्यांना स्वामीदर्शन घडविलें.

गोविंदराव धनिक होतें, तसेंच मोठें भाविक होतें. त्यांनीं एका कनोजी ब्राम्हणास बरोबर घेऊन पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. ते गाणगापूरला गेलें. पण तेथें गेल्यानंतर त्यांना पुन्हा परत आपल्या गांवीं जाण्याचें विस्मरण झालें. त्यांनीं त्या ठिकाणीं राहून आपली भक्तिसेवा आरंभिली.

एकदां त्यांना दृष्टांत झाला आणि सद्‌गुरुंनीं त्यांना सांगितलें, " गाणगापूर माझेंच स्थान असलें, तरी मी प्रत्यक्ष अवताररुपानें अक्कलकोटला राहात आहे. तेथें माझ्या दर्शनानें तुझ्या सर्व कामना पूर्ण होतील. " सद्‌गुरुंचा दृष्टांत झाल्यानंतर गोविंदराव ब्राम्हणासह अक्कलकोटला गेले आणि तेथें सद्‌गुरुंची सेवा करीत राहू लागलें. ब्राम्हण स्वयंपाक तयार करी, त्यानंतर सद्‌गुरुंना नैवेद्य अर्पण करून दोघेंहि जेवण करीत. एकदां नैवेद्य तयार करून दोघें स्वामी समर्थांना अर्पण करण्यास गेलें असतां, त्या दोघांना गांवाबाहेर मशिदींत एक फकीर आपल्या कुत्र्यासह बसला आहे, त्यास नैवेद्य अर्पण करा म्हणून स्वामींनीं सांगितलें. समर्थांची आज्ञा घेऊन ते दोघें त्या फकिराकडे गेलें. तेव्हां तो फकीर त्याना म्हणाला, " तुम्ही स्वामींच्या कडून आलांत ना, मग आणा तर तो नैवेद्य. " त्यानंतर ब्राम्हणाच्या हातांतील ताट घेऊन फकीर व कुत्रें दोघें एकत्र खाऊं लागलें. थोडेसे अन्न ताटांत ठेवून फकिरानें ताट परत केले. ते दोघें ताट घेऊन स्वामींच्याकडे आले. तेव्हां स्वामीनीं ताटांतील प्रसाद खाण्याला सांगितला. गोविंदरावानें मनांत विकल्प आणून प्रसाद खाल्ला नाहीं, पण त्या ब्राम्हणानें प्रसाद खाल्ला. ब्राम्हणाची श्रद्धा पाहून सद्‌गुरुंनी त्यास मुंबईस गेल्यावर तुला दशसहस्त्र रुपयांचा लाभ होईल म्हणून सांगितले आणि गोविंदरावास अजून तुझी भक्ति कच्ची आहे, तूं ह्या पादुका नेऊन त्यांची स्थापना करून भक्ति कर म्हणून सांगितले आणि दोघांना निरोप दिला.

त्यानंतर ते दोघें मुंबईस आलें. गोविंदरावानें आपल्या घरीं पादुकांची स्थापना करून भक्तिसेवा सुरूं केली. आपणांस दहा हजारांचा लाभ होणार असल्याचें ऐकून ब्राह्मण आनंदला होता. एकदां हा ब्राह्मण एका हवेली खाली उभा राहिला असतां हवेलीच्या दारांत उभ्या असलेल्या एका स्त्रीनें त्यास पाहिले आणि त्यास जवळ बोलावून त्याच्या हातीं एक गुंडाळी दिली आणि त्यास नमस्कार केला. त्या स्त्रीचा नवरा अत्यंत मोठा धनाढ्य व्यापारी होता. तो नुकताच मरण पावला होता. तिनें पुष्कळ दानधर्म केला, त्यांत तिच्या नवऱ्यानें तिला दशसहस्राच्या नोटा गुंडाळून गुप्तदान देण्यास सांगितलें होतें. सकाळीं उठतांच जो ब्राह्मण दृष्टीस पडेल

त्यास तें गुप्तदान देण्याचें तिनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें ह्या ब्राह्मणांस पाहातांच तिनें दान केलें. सद्गुरूंचें वचन सत्य ठरलें. ब्राह्मणांस नोटा पाहातांच अतिशय आनंद झाला. पण कदाचित आपणांवर चोरीचा आरोप येईल, असें समजून ब्राह्मण पुन्हां त्या स्त्रीकडे आला आणि त्या नोटा परत देऊं लागला, तेव्हां स्त्रीनें त्यास ते दान दिल्याचें सांगितलें ब्राह्मणांस अत्यानंद झाला. पुढें संसार थाटून तो सुखानें राहूं लागला.

त्या ब्राम्हणाने हे सर्व वृत गोविंदरावांना सांगितलें, तेव्हां गोविंदरावांना अतिशय आनंद झाला. पुढें त्यांनीं आपल्या तीर्थयात्रेस्तव ब्राम्हण भोजन घातलें. त्यावेळीं लक्ष्मण पंडित नांवाच्या एका गृहस्थास त्यांनीं स्वामींचा सर्व महिमा सांगितला. स्वामींचा महिमा ऐकतांच पंडितास आपण कधीं एकदां स्वामीचें दर्शन घेतों असें झालें. ह्या पंडितास व्यापारांत अत्यंत तोटा आल्यानें तो कर्जबाजारी झाला होता. आपणांस स्वामींनीं कर्जमुक्त करावें, आपण दर्शनास येऊं, असा त्यानें स्वामींना नवस केला. पंडितांचें हरिभाऊ ( हेच स्वामीसुत झालें ) व खत्री नांवाचें दोघें स्नेही होतें, ते म्युनिसिपालटींत नोकरीस होतें; त्या दोघांनी आफिणीचा एक मोठा सट्टा घेतला होता, पण त्याचा भाव उतरल्याचा बोभाटा झाला. तेव्हां आतां आपण दोघांनीं आपलें सर्वस्व घातलें, तरी आपली बेअब्रू होणार याची त्यांना भिती वाटूं लागली. ते दोघें पंडिताकडे आलें आणि पंडितानें पेढीवर जाऊन आपणाकरितां सही देऊन लाभहानीची जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी, अशी त्यांनीं पंडितास विनंती केली. पंडित स्वतः कर्जबाजारी होतें, तरीहि त्या दोघांसाठीं स्वामीचें नांव घेऊन सही करून त्यानें आपल्यावर जबाबदारी घेतली.

पुढे तीन दिवसानंतर संध्याकाळच्या सुमारास ईश्वर नांवाचा एक सुंदर मारवाडी पंडिताच्या घरी आला आणि पंडितास हांका मारूं लागला. पण तो आपणांकडे पैसे वसूल करण्यास आला असावा म्हणून भितीनें पंडितानें त्यास ' ओ ' दिली नाहीं. शेवटीं मारवाडी कंटाळून हरिभाऊ व खत्री यांच्या कचेरींत गेला आणि त्यांस म्हणाला, " पंडिताच्या घरीं गेलों होतों, पण त्यांची गांठ पडली नाहीं, त्यांना दोन हजार रुपये नफा

झाला आहे." त्यानंतर तिघांनीं पंडिताच्या घरीं जाऊन त्यास ही आनंदाची बातमी सांगितली. पंडितानें स्वामींना हात जोडलें आणि आपण ऋणमुक्त होतांच दर्शनास येऊं, असा स्वामी समर्थांना केलेला नवस त्या तिघांना सांगितला. तेव्हां ते हरीभाऊ व खत्रीहि पंडिताबरोबर अक्कलकोटला जाण्यास तयार झालें पुढें कमरमित्ती कापून पंडितास एकोणिसशें रुपये मिळाले. त्यांतील तीनशे रुपये बरोबर घेऊन पंडित हरिभाऊ व खत्री यांच्यासह अक्कलकोटला निघाले हरिभाऊ व खत्री यांनीं पंधरा दिवसाची रजा घेतली होती. स्वामी समर्थांच्याजवळ ते तिघें जेव्हां जाऊन पोंहचले, तेव्हां स्वामी त्यांस म्हणाले, "व्यापारांत तोटा आल्यानें तुम्हीं मला नवस केलांत आणि आतां नफा झाला म्हणूनच ना आलांत ?" सद्‌गुरुंचें वचन ऐकतांच त्यांनीं त्याचे पाय धरलें.

त्यानंतर ते तिघें श्रींची आज्ञा घेऊन आपल्या बिऱ्हाडी गेले. रात्रीं ते झोपी गेल्यानंतर त्यांचें सर्व कपडें, चिजवस्तू चोरांनीं पळवून नेल्या. रोकड पैसे तेवढें त्यांच्या जवळ राहिलें. त्यांनीं सद्‌गुरुंना हे वृत्त सांगितलें. तेव्हां सद्‌गुरुंनीं सुंठीवांचून खोकला गेला, असें सांगून पंडितास रुमाल व खत्री यांस धोतर दिलें आणि हरिभाऊच्या हाताला धरुन आपणाजवळ बसवून त्यास कुळावर पाणी सोडून आपला सुत होण्यास सांगितलें. त्याच्याजवळ असलेले सर्व धन खर्चून चांदीच्या पादुका तयार करण्यास त्याला सांगितलें. तेव्हां तिघेंहि बिऱ्हाडी गेलें. त्यांनी नैवेद्य तयार केला आणि तो स्वामींच्याकडे घेऊन आलें. स्वामींनीं तो प्रेमानें सेवन केला आणि तिघांस एकेक श्लोक सांगितला हरिभाऊस त्यांनीं–

"गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परं ब्रम्ह तस्मै श्रीगुरुवे नमः ॥"

हा श्लोक सांगितला. त्यानंतर तिघांनीं बिऱ्हाडी जाऊन जेवण केलें, त्यानंतर स्वामींच्या आज्ञा घेऊन तिघेंहि मुंबईस परतलें. तिघांनीं पुढें तें सोळाशें रुपयें वांटून घेतलें.

पुढें पंडित आपले कर्ज फेडून कर्जमुक्त झाला. परंतु हरिभाऊला संसारांत चैन पडेना, नोकरींतहि त्यांना गोडी वाटेना सद्‌गुरुंनीं आपणांवर अनुग्रह केल्याशिवाय आपलें जीवन व्यर्थ आहे, असें त्यांना वाटूं लागलें, त्यानंतर त्यांनीं स्वामी आज्ञेप्रमाणें चांदीच्या पादुका वेलबुट्टी काढून व जिल्हई देऊन तयार करून घेतल्या आणि ते अक्कलकोटला गेलें आणि त्यांनीं त्या स्वामींच्या चरणीं घालून स्वामींना वंदन केलें. त्यानंतर पुढें पंधरा दिवसांनीं त्या पादुका आपलें आत्मलिंग समजून त्यांनीं हरिभाऊंना– स्वामीसुतांना दिल्या. स्वामींनीं त्यांना मुंबईत मठाची स्थापना करून त्यामध्यें पादुकांची स्थापना करून राहण्यास सांगितलें. त्या दिवशीं गांवाबाहेर एका ठिकाणीं स्वामीच्याजवळ हरिभाऊ झोपलें होतें. रात्रीं मध्येंच उठून ते स्वामीचें चरण चेपूं लागले. तेव्हां स्वामीनीं एकांत समय पाहून त्यांच्यावर अनुग्रह केला. त्यानंतर छाटी व कफनी परिधान करून स्वामींचा निरोप घेऊन स्वामीसुत मुंबईस परतलें.

मुंबईस आल्यानंतर आपल्या घरांतील होते तेवढें दागदागिने व कपडेलत्ते त्यांनी गोरगरिबांना दान केलें. स्वतःच्या तारका नांवाच्या पत्नीच्या गळ्यांतील मंगलसूत्रही त्यांनीं दान केलें आणि कांदेवाडी येथें स्वामींनीं दिलेल्या आत्मलिंगाची मठ बांधून त्यांत स्थापना केली. पहिली स्वामीजयंति त्यांनी शके १७९२ सालीं स्वामींच्याजवळ जाऊन साजरी केली. त्यानंतर त्यांनीं नगर, पुणें, ठाणें, वसई, रत्नागिरी, नारखे, चिपळूण येथें स्वामीचे मठ स्थापिले. स्वामीसुत मुंबईच्या मठांत पादुकांची सेवा करीत परमेश्वराच्या भजनपूजनांत दंग होऊं लागले. स्वामीचे नांव घेऊन दिलेल्या तीर्थप्रसादानें गोरगरिबांची सकटे दूर करूं लागले.

स्वामीसूत एकदां अक्कलकोटला स्वामींच्याकडे गेले असतां एका रात्रीं स्वामींच्या दर्शनास द्वारकानाथ नांवाचा मुंबईतील एक वकील आला. त्याने स्वामींच्यासमोर पुष्कळसा कापूर आणून जाळला. तेव्हां स्वामी त्यास म्हणाले, "माझ्यासमोर कापूर जाळण्यापेक्षां त्या मुरलीधराचे मदिर जाऊन प्रकाशित करून ये." तेव्हां वकिलाने मुरलीधराचे मंदिरांत दीपच दीप लावून दिवाळीप्रमाणें आरास केली आणि तो परत स्वामींच्याकडे

आला. त्याला मुलबाळ नसल्याचे व तो त्यामुळें दुःखीकष्टी असल्याचे अंतर्ज्ञानाने जाणून स्वामींनी तेवढ्या रात्रीं बाहेरून चणें मागविलें व त्यास प्रसाद म्हणून दिलें. तो प्रसाद वकिलानें पत्नीसह खातांच त्याची पत्नी गरोदर राहिली आणि पुढें कालांतराने पुत्र प्रसुत झाली. पुढें हे वकील मुंबईत नित्य स्वामीसुतांच्या मठांत जाऊं लागलें आणि भक्तिमार्गास लागलें.

त्यानंतर पुढें चारच वर्षांनीं स्वामीसुतांनीं आपला अवतार संपविला. एकदां स्वामीसुत अक्कलकोटला गेलें असतां स्वामी त्यांना म्हणालें, " आम्हीं आतां अल्पकाळांतच आमचा अवतार संपविणार आहोत, तेव्हां आपणच आतां यापुढें आमची गादी चालवावी. " स्वामीसुतांना हे ऐकून अत्यंत दुःख झालें आणि त्यांतच पुढें श्रावण वद्य प्रतिपदेस स्वामीसुतांनीं आपला देह ठेविला. स्वामीसुतांच्या मातोश्री काकुमाई त्यावेळीं अक्कलकोटला होत्या. त्यांना आणि स्वामीसुतांच्या मुंबईतील भक्तांना अतोनात दुःख झाले. पुढें कांहीं दिवसानंतर मुंबईतील मंडळी स्वामींच्याकडे अक्कलकोटला आली. स्वामीसुतांच्या गादीवर कोणास बसवावयाचें म्हणून त्यांना विचारू लागले गादीवर 'मोर पाखरुं' येणार म्हणून स्वामींनीं त्यांना सांगितलें– पुढें काकुमाईचा आठ वर्षांचा मुलगा बाबा उर्फ बाबू स्वामींच्या दर्शनास काकुमाईनी आणला असतां स्वामींनीं त्यासच 'मोर पांखरु' संबोधून स्वामीसुतांची गादी त्यास दिली. आपल्या लहान पुत्रास स्वामीनीं गोसावी बनविल्याचे पाहून काकुमाईना अत्यंत दुख झाले, पण स्वामींनी त्यांची समजूत घातली. हे 'स्वामीसुताख्यान' जे जे भक्तिभावानें श्रवण करतील त्यांना सद्गुरुंची कृपा संतत लाभत जाईल, असें सद्गुरु श्री आनद भारती महाराजांनीं सांगितलें आहे.

# अध्याय एकविसावा

## श्रीस्वामीसमर्थावतार समाप्ति

" कल्पांती अखिल विश्वासीं । जाणेंच आहे समत्वासी ।
परी ऐक्य व्हावया निजरूपासी । जिवा न साधन तुजविण ॥"

( अ. २१–७ )

या नश्वर देहाचा त्याग करून प्रत्येकालाच अंतीं पंचतत्वांत विलिन व्हावयाचें आहे, पण ह्या जिवाला परमेश्वरापाशीं पोंहचविण्यासाठीं–त्याचें अनंत स्वरूपांत विलिन करण्यासाठीं सदगुरुंसारखें साधन जगांत दुसरे कोणतेंहि नाहीं. सद्‌गुरू म्हणजे दुःखी–दुर्दैवी संसारिकांचें विश्रांतिस्थान–सद्‌गुरू म्हणजे मुमुक्षूचें मुक्तीचें साधन आणि योगी पुरुषाचे ज्ञान विधान होय. श्री स्वामी समर्थ सद्‌गुरूंच्या कृपेचा लाभ लाखों–कोटयावधीं लोकांना झाला. गोरगरीबांना त्यांनी अर्थ लाभ करून दिला, कित्येकांना त्यांच्या असाध्य रोगांतून मुक्त केले, पुत्रहिनांना त्यांनी पुत्रप्राप्ति करुन दिली; भक्ति, उपासना आणि आत्मसाधनेसाठी जे थोर लोक त्यांच्याकडे कळकळीनें आले होतें, त्याच्यावर त्यांनी अनुग्रह करून त्यांचें जीवन कृतार्थ केले. त्यांनी नास्तिकांना भक्तिवंत बनविलें--अधर्मियांना धर्मरत केले आणि सर्व धर्मियांच्यावर मातेप्रमाणें प्रेम केले आणि आपला दीनोद्धारासाठीं घेतलेला अवतार त्यांनीं आपले अवतार कार्य संपतांच समाप्त केला.

श्रीशके १८०० बहुधन्य नामक संवत्सराच्या चैत्र कृष्ण चतुर्दशीस त्यांनीं आपल्या अवताराची समाप्ती केली. एके दिवशीं दुपारींच त्यांना अकालीं शौचास झालें, तेव्हां आपणांस पटकी (कॉलरा) झाल्याचें ते सांगू लागलें, त्यांच्या अंगांत ताप भरला व त्यांना वरचेवर रेचहि होऊं लागलें. दुसऱ्या दिवशीं ताप उतरला तेव्हां एका मेण्यांत बसून ते नागणळीच्या आंबेवनांत गेलें. तेथें त्यांनीं अन्नपाणी सर्व वर्ज केलें, त्यामुळें त्यांचा ताप पुन्हां बळावला. त्यांच्या भक्तांनीं त्यांना अक्कलकोटला परत आणलें. पण एवढी प्रकृति बिघडली असतांहि स्वामी हंसतमुख आणि आनंदी दिसत होतें. भक्तांनीं त्यांचें क्षौर करून त्यांना स्नान घालून आसनावर बसविलें आणि त्यांची पूजा केली. त्यानंतर आरती करून नैवेद्य अर्पण केला, परंतु स्वामींनी नैवेद्य स्वीकारला नाहीं. त्यांना आपली अवतार समाप्ती करावयाची होती. स्वामी आतां आपणांस सोडून जाणार, हे समजल्यानें सर्व भक्तजण दुःखीकष्टी झालें, तेव्हां सर्वांस गीतेंत भगवान श्रीकृष्णांनीं सांगितलेला–

"अनन्याश्चिंतयतो मां ये जनाः पुर्युपासते ।
तेषांनित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥"

हा उपदेश केला आणि सांगितलें, " आतां आपला शोक आवरा आणि आपल्या कर्तव्यकर्मास लागा. आम्ही जरी देह सोडून चाललों असलों तरीहि सर्व ठिकाणीं राहूं. जे जे आमचें सद्भक्त आहेत आणि जे निष्काम भक्ति करीत आहेत, त्यांची काळजी आम्हांला आहे. त्यांच्या संकटकाळीं आम्ही धांवत येऊ, " असा त्यांनीं सर्व भक्तांस उपदेश करून त्यांची समजूत घातली आणि मध्यान्हसमयीं पद्मासन घालून स्वामी निजधामास गेलें.

सर्व भक्तांनीं एकच आक्रोशा केला, भक्तांची गुरु माऊली त्यांना सोडून गेली, आतां त्यांना कोणीच वाली राहिले नाहीं. भक्तजणांनीं केलेला शोक इतका अपार होता कीं, तो शब्दांनीं वर्णन करणें अगदी अशक्य होता! त्यानंतर स्वामींच्या भक्तांनी एक दिव्य विमान सजवून त्यांत स्वामींचा पद्मासन घातलेला देह तसाच ठेवून ते उचलून घेऊन अक्कलकोट बाजार पेठेच्या मार्गानें चोळप्पाच्या घराजवळ चोळप्पानें स्वामीकरिता तयार केलेल्या समाधी स्थानाकडे घेऊन चाललें. स्वामींच्या निजधामाची बातमी तारेनें व इतर भक्त मंडळाकडून गांवोगांवी समजली. त्यामुळें पुष्कळ ठिकाणाहून लोकांच्या झुंडीच्या झुंडी स्वामीच्या अंत्यदर्शनास येऊ लागल्या स्वामींच्या अंतयात्रेच्या मिरवणुकीमध्यें सतत फुलें उधळली जात होती परिमल द्रव्यानी वातावरण सुगंधीत झाले होते. मिरवणुकीपुढें समई चौघडा, नौबत, वगैरे मगलवाद्यें वाजत होती. भजनांच्या दिंड्या भजने गात चालल्या होत्या. स्वामींच्या विमानावर भक्तजणांनीं केलेल्या पुष्प वृष्टीनें सर्व मिरवणुकीचा रस्ता पुष्पशय्येनें मढविल्यासारखा दिसत होता. त्यानंतर मिरवणुक चोळाप्पाच्या घराजवळ आली, विमान खाली उतरले गेले. अनेक वाद्यांचा गजर होऊन स्वामीनामाचा जयजयकार झाला. स्वामींची शोडषोपचारे पुजा करण्यांत आली. भक्तजणांनीं आरती गायीली.

त्यानंतर भक्तजणांनीं त्या समाधीच्यावरील चीरा बाजूस काढला आणि स्वामीचा पद्मासन घातलेला देह विमानांतून उतरून घेऊन तो समाधीच्या आंतील आसनावर स्थापिला. त्यावेळीं स्वामींच्या मुखावरचें अलौकिक तेज जणुं त्यांनीं सप्राण समाधी लाविली आहे कीं काय त्याप्रमाणें

दिसत होते ! भक्तांनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि बाहेर येऊन समाधीवर चिरा बसविला. त्यानंतर सर्वांनीं समाधीची पूजा केली. श्री स्वामीसमर्थ सर्वांना चटका लावून आपल्या अवताराची समाप्ती करून गेलें, तरी आपल्या भक्तांच्या कामकाजासाठीं त्यांच्या अडीअडचणी व संकटाच्या निवारणासाठीं नानारूपानें प्रकटून ते त्यांचा उद्धार करूं लागलें. ज्याच्यापाशीं भक्तीचे बळ, निर्मळ उपासना आहे, सद्‌गुरूवर ज्याने आपला भार टाकला आहे, त्याच्यापासून सद्‌गुरू तरी दूर कोठें राहाणार ?

श्रीस्वामीसमर्थांनीं अनेक लीला दाखविल्या आहेत. सर्वच ह्या ठिकाणीं वर्णन करून सांगणें केवळ अशक्य आहे हा ग्रथ श्रीस्वामी समर्थांनींच श्री आनंद भारती महाराजांच्या करवीं विद्वांसानीं पूर्ण करावा म्हणून वदविला. श्री आनंदभारती महाराज शेवटीं ह्या ग्रंथाचें मूल्य सांगतांना म्हणतात, " जे सद्‌गुरुलीला नित्य श्रवण व पठण करतील, ते सुखानें ह्या लोकीं संसार करुन अंती परमेश्वर चरणीं जातील, त्यांच्या जीवनाच्या सर्व आधी-व्याधी नष्ट होऊन इहलोकीची सर्व सुखें त्यांना लाभतील. ' गुरुलीलामृता'ची नित्य पूजा करून जे पठण करतील, त्यांना संतत सद्‌गुरुची कृपा लाभत जाईल. "

' श्रीगुरुलीलामृत ' ग्रथाच्या लेखनास श्रीआनद भारती महाराजांच्या कृपेनें श्रावण कृष्ण चतुर्दशी श्रीशके १८१७ रोजीं पुण्याच्या श्री विद्वांसांनी आरंभ केला. पहिला 'नमनाध्याय' लिहून झाला, त्यानतर सहा वर्षं ग्रथलेखन तसेंच राहिलें, ग्रंथकर्ते विद्वांसांच्या प्रापंचिक अडचणीमुळें त्यांना ग्रथलेखन पुढें चालविणें अशक्य झालें, परंतु आनंदभारती महाराजांनी त्यांच्या अडचणीं दूर केल्या आणि पुन्हां शके १८२३ च्या श्रावण शुद्ध प्रतिपदेस त्यांनीं विद्वासांकरवीं ग्रंथलेखन पुढें चालविलें आणि कार्तिक मासापर्यंत पंधरा अध्याय लिहून पूर्ण झालें. परंतु पुढें मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी (चंपाषष्ठी) शके १८२३ मध्यें श्रीआनंदभारती महाराज निजधामास गेलें, त्यामुळें आनदभारती महाराजांच्या समाधीगमनाच्या दुःखामुळे व त्यांच्या निवेदनाअभावी ग्रथलेखन विद्वांसांना पुढें चालविण्यास सुचेना. पुढें आनंद भारती महाराजांची समाधी बांधून पूर्ण झाल्यानंतर विद्वांसांना आनद भारती

महाराजांनीं दृष्टांत देऊन ग्रंथ पुढें चालविण्यास सांगितला. त्याप्रमाणें त्यांनी आषाढ शके १८२४ पासून पुन्हां ग्रंथलेखन पुढें चालवून आषाढ एकादशीस ग्रंथ पूर्ण केला.

'श्रीगुरुलीलामृता'च्या पहिल्या 'नमन अध्यायांत' विघ्नहर्ता गजानन, प्रकृतिपुरुष, सद्गुरु, सज्जन आणि आई–वडिल यांना वंदन केलें आहे. दुसऱ्यांत' श्री आनंदभारती महाराजांनीं विद्वांसांना प्रेरणा दिली आणि 'श्रीदत्तजन्म आख्यान' निवेदन केले. 'तिसऱ्यांत' श्रीदत्तगुरुंचा दुसरा अवतार श्रीपादवल्लभ त्यांचें आख्यान वर्णिलें आहे. 'चौथ्या'त अंबिकेचें पूर्व जन्माख्यान व प्रदोषव्रताचा महिमा सांगितला आहे. 'पांचव्यां'त श्रीनृसिंह सरस्वती करंजग्रामीं अवतारल्याचें वर्णन आले असून श्रीगुरुचरित्र साराची समाप्ति केली आहे. नृसिंह सरस्वती उत्तर पंथाकडून दक्षिणेस मंगळवेढ्यास दीनोद्धार करीत आल्याचें वर्णन 'सहाव्या' अध्यायांत आले आहे. 'सातव्यां'त वसाप्पाचें आख्यान सांगितलें आहे. 'आठव्या' मध्यें एका यवनाचा उद्धार सद्गुरुंनी केल्याचें वर्णन आले आहे. सद्गुरु मंगळवेढ्याहून सोलापूरास आलें आहेत. 'नवव्या' अध्यायांत भक्तासाठीं सद्गुरू अक्कलकोटला आलें असून त्यांनीं एका भजनीबोवास विठ्ठलरूपानें भेट दिली. 'दहाव्या'त ब्रह्मचारी विष्णुवुवाचा गर्वहरण करून त्याचा उद्धार केला आहे. 'अकराव्या'त सद्गुरूंनीं अतिथी तृप्त करून स्वतःची क्षुधाशांति केली आहे आणि इतरहि लीला दाखविल्या आहेत. 'बाराव्या'त रावण्णा ह्या वैश्यास मृतसंजीवन देऊन एका ब्राम्हण स्त्रिच्या मृत बालकासहि जिवंत केलें. एका किमयागाराचें गर्वहरण करून त्याच्यावर सद्गुरूंनीं अनुग्रह करून सिद्धीदर्शन भक्तजणांना घडविलें आहे. 'पंधराव्या' अध्यायांत अलंकापुरीच्या नृसिंहयतीस समाधी योग सद्गुरूंनीं कथन केला आहे. 'सोळाव्या' अध्यायांत सद्गुरूंच्या मुमुक्षु यवनाचा उद्धार, ब्राम्हण बालकास दृष्टिदान व पंडिताचा गर्वहरण ह्या लीला वर्णिल्या आहेत. 'सतराव्या'त भक्त जाधवास यमाच्या पाशांतून मुक्त केलें आहे आणि जमादारावर अनुग्रह केला आहे. 'अठराव्या'त श्री चिदांवर दीक्षित आख्यान वर्णिले

आहे. 'एकोणीसाव्या'त स्वामींचा परम शिष्य जो बाळाप्पा त्याचें वृत्त कथन केलें आहे. 'विसाव्या'त 'श्रीस्वामीसुत आख्यान' सांगितलें आहे. आणि 'एकविसाव्या' अध्यायांत श्रीस्वामी समर्थांनीं अवतार समाप्ति केल्याचें सांगून ग्रंथ पूर्ण केला आहे.

श्रीआनंद भारती महाराजांनीं विद्वांसावर अनुग्रह करून त्यांचें जीवन कृतार्थ केले. ' श्रीगुरुलीलामृता ' सारखा अलौकिक ग्रंथ त्याच्या करवी लिहवून घेतला तेव्हां विद्वांसांनीं—

" अनुग्रही सद्‌गुरुमूर्ति । स्वामी माझा आनंदभारती
नमस्कार असो तयाप्रती । वारंवार साष्टांग ।।" (अ. २१–४५)

त्यांच्या चरणीं साष्टांग नमस्कार घालून हा ग्रंथ–

" सद्‌गुरुसीच अर्पोनि स्वस्थ । बसतो आतां आनंदे ।।
(अ. २१–५७)

असे म्हणून त्या सद्‌गुरुचरणींच अर्पण केला आहे.

त्या श्रीसच्चिद्‌घन आदिपुरुष नारायण, निर्विकार, निश्चल निर्गुण, विश्वव्यापक विश्वात्म्यास–परमेश्वर, परमोदार, परमानंद, करुणा-सागर विश्वेशास, अनंतकोटी ब्रह्मांडनायकास–आणि प्रकाशाचा प्रकाशक परमात्म्यास भक्तीभावानें प्रार्थून मीहि ह्या ठिकाणीं हा ' श्रीगुरुलीलामृता ' चा अल्पसारांश पूर्ण करून जनता जनार्दनाच्या सेवेंशी सादर करीत आहे.

हरि ओम् तत्सत् । हरि ओम् तत्सत् । हरि ओम् तत्सत् ।।

# श्रीगुरुलीलामृत समाप्त

—:***:—

# दत्त स्वामी माझा !

( श्री आनंद भारती महाराजांनीं स्वत: पुष्कळ अभंग, कटाव लिहिलें होते, ते भजन म्हणूं लागले कीं, स्वत:चे अभंग भजनांत गात असत. त्यांची त्या त्या वेळीं त्यांनीं केलेली रचना कोणी लिहून न ठेवल्यामुळें, ती आज अस्तित्वात नाहीं. तरी पण त्यांचा अत्यंत लोकप्रिय झालेला एक अभंग आज बऱ्याच भक्तजणांच्या मुखोद्गत आहे. तो या ठिकाणीं देत आहे. )

किती सुकुमार रूप हे सुंदर
लोळूं चरणावर प्रेमभावें ॥धृ०॥

पिवळी टोपी शोभे मुकुटाची शोभा
कंठी हार गळां रुद्राक्षांचा ॥१॥

ढवळी ही गाय कुतरा संगती
चर्चिली विभुति दिगंबर ॥२॥

दंडक मडलु शोभे चक्र हाती
डमरू हा शंख वाजवितों ॥३॥

ऐसा हा देखिला योगियांचा राजा
दत्त स्वामी माझा मायबाप ॥४॥

आनंद भारती हेची रूप पाहती
आनंदें नाचती गुण गाती ॥५॥

– श्री आनंद भारती महाराज

# ॥ श्री गुरु स्तवन ॥

★

श्री गुरुचरणीं चित्त ठेवोनी ज्ञानदृष्टि उघडोनि पाही
चिन्मय मूर्ति सदा डोळां भरुनि आत्मस्वरुपीं लिन राही ॥ धृ० ॥

सद्‌गुरुवचनीं भाव धरुनि बोधांजन नयनी लेई
अज्ञान तिमिर मग पटल छेदुनि दिव्य दृष्टी तोची देई ॥
सत्‌समागम धरुनि जगामध्यें सार्थक तूं करुनी घेई
दया धरम कर सत्कीर्तीवर सत्कर्मे संगे नेई ॥
दुष्ट वासना सोडुन मनांतिल हरिगुण आवडीनें गाई
यांतच कांहीं ती मजा समज घर आनंदे परलोका जाई ॥

स्वामी भजनीं रत होऊनी प्रेमरस घट घट पीई ।
चिन्मय मूर्ति सदा डोळां भरुनि आत्मस्वरुपीं लीन राही ॥ १ ॥

काम क्रोध षड्रीपू मर्दुनी सत्वगुणी सादर व्हावे
माया मोह सारा भ्रम पसारा समजुनि सद्‌गुरु नमि भावें ॥
संतति संपत्ती चंचलता समजुनि मिथ्या भासा या सोडावें
अंतर दृष्टि ज्ञान वृष्टि एकाग्र करुनी सद्‌गुरुसी भजावें ॥
नम्रपणा मनीं सदा असावा पाप-अनीतीला भित जावें
कांही विचार तरी करी अंतरीं खरे सांगे त्या जवळ करावे ॥
परधनदारा पाहुनि मनुजा मन–जातां त्या फिरवावे
माते समान परनार समज मनि परधन न मना नच घ्यावे ॥

सद्‌सद् विचार कर मनामध्यें यांतच आहे कांहीं कांहीं
चिन्मय मूर्ति सदा डोळां भरूनि आत्मस्वरुपीं लीन राही ॥२॥

नामरस बहुमधुर तयापुढें काय गोड साखरेचा रवा
भक्तिखवा मिळवा जीवनीं मिळवा सद्गुरुंचा प्रेम मालपवा
खातां तृप्ति होईल प्राण्या सहज मिळ चिन्मय ठेवा
कळिकाळाचे भय नसे त्या अळवि जे देवा देवा ॥
भवसागर उतराया नामाविण नाहीं कली दुसऱ्या नांवा
यांतुनि उतरा करा त्वरा सत्वर या धांवा धांवा ॥
हेतु धरूनी सद्गुरुचरणीं नित्य नेम हरिनाम बळवा
मिळवाया मग कोणी शके तुज धरि दृढ निश्चय मन नच ढळवा ॥

घटका पळपळ आयुष्य जाते जरा करी घाई घाई
चिन्मय मूर्ति सदा डोळां भरूति आत्मस्वरुपी लीन होई ॥३॥

ज्याचा पैसा भाव तयाला कृपा बळें स्वामी देती
सारासार परमार्थ दाऊनि सद्गुरु सद्गतिला नेती ॥
गुरुवांचुनि नाहीं मार्ग समज शरण तया जातां वळतों
कृपादृष्टि करितां दासावर ज्ञानमार्ग सहज कळतां ॥
जागृत होऊनि पाहे मनुजा सुखदाता डोळा भरतां
सदानंदी तृप्त होऊनि आनंदी आनंद वरतों ॥
आनंदसुत लीन गोपु भारती शरण येऊनि गुरु तुज धातों
तव मूर्ति सदा डोळा असावी समुजनि हे तव गुण गातों ॥

सावध होऊति विठू आतां तरी सद्गुरूसी शरण जाई
चिन्मय मूर्ति सदा डोळां आत्मस्वरूपी राही ॥४॥

—गोपाळराव नाना ठाणकर

—★—

# ॥ श्री आनंद भारती स्तोत्र ॥

**
*

श्रींच्या लीन असे अमीत चरणीं प्रेमादरें सत्य हो ।
याचें कारण जो कुळीं निपजला कोळी परी ईश हो ॥
पूर्णानंद पदां स्वयें मुढजनां जो दाखवी विक्रमें ।
त्या स्वामी चरणीं नमूं सकळहि ऐसेंच मातें गमे ॥ १ ॥

किल्ला बेदर जो कृपें बसविला तारावया मानवा ।
जेथें सौख्य अगम्य हर्ष गमतों त्रिकाल लोकार्णवा ॥
मध्यें आत्मज रोखिला अनुसयें दैदिप्य सुसंग्रमें ।
त्या स्वामी चरणीं नमूं सकळहि ऐसेंच मातें गमें ॥ २ ॥

शंभु तोच असे समीप भजनीं नाशीत जा पातकें ।
मार्गे बाग असे मनोहर मना अत्यंत होतीं सुखें ॥
वायुनंदन राबिला भगवती पूर्वेस ती पश्चिमे ।
त्या स्वामी चरणीं नमूं सकळहि ऐसेंच मातें गमे ॥३॥

-★-

... वि. ५.१२.६५
१५३२ ... नों. दि. ८।६।६५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १५२६७

# ॥ श्री आनंद भारती महाराजांची आरती ॥

अक्कल कोटनिवासी स्वामी समर्था ।
रूपें अवनीवरती अवतरले दत्त ॥
ताराया जडजीवा तूंहि अवतरित ।
होऊनि त्यांच्या अंशे आलासी येथ ॥ १ ॥

जय देव जय देव जय सद्गुरु राजा । स्वामी सद्गुरु राजा ।
आनंद भारती स्वामी सच्चिद्घन तेजा ॥ धृ० ॥

दीनोद्धरणासाठीं धीवर कुलीं जन्म ।
प्रेमें अज्ञ जनां दावियेले वर्म ॥
प्रेमें उपदेशीला सकलां निजधर्म ।
ऐसा तूं कनवाळु दीनांचा परम ॥ २ ॥ जयदेव जयदेव ०

त्यागुनी माया कुटुंब जरी तूं विरक्त
कुटुंब नच सुटले तुज सकळ जनही आप्त ॥
चराचर समदृष्टि दीनां उद्धरीत ।
जैसी ज्यांची इच्छा पुरविसी हेत ॥ ३ ॥ जयदेव जयदेव ०

पतित पावन स्वामी सद्गुरु तूं आमुचा ।
तव गुणवर्णन करण्या न शके ही वाचा ॥
भवसागर दुस्तर तर दु:सह हा साचा ।
त्यांतुनीं उद्धरी मेळा बाळगोपाळांचा ॥ ४ ॥ जयदेव जयदेव ०

–★–

ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
.. वि: ..........
१५३४ .. नों: दि: ..........